प्रकरण क्रमांक - १ विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००२-२००३ करिता मा.सभापती स्थायी समिती या पदावर नेमणूक करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक दिनांक :- १६/९/२००२

ठराव :- १

प्रकरण क्रमांक १ पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००२-२००३ या सालाकरिता मा.स्थायी समितीवर असणा-या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणूक करावयाची आहे.

या नेमणूकीसाठी दोन नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिले

१) श्री मोहन मधुकर पाटोल

२) श्री धनराज नंदलाल अग्रवाल

यांनी त्याची नामनिर्देशन पत्रे दाखल केली.

नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या विहित मदतीत व वेळेत वरील दोघांपैकी एकाही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्याने सभापती , स्थायी समिती या पदाकरिता मतदान घेण्यांत आले.

त्यावेळी (१) श्री. मोहन मधुकर पाटील यांना १२ मते तर (२) श्री. धनराज नंदलाल धनराज यांना ४ मते मिळाली पैकी श्री. मोहन मधुकर पाटोल यांना सर्वाधित मते मिळाली असून, ते विजयी झालेले आहेत.

तरी, श्री.मोहन मधुकर पाटोल यांची सन २००२-२००३ सालाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहीर करीत आहे.

ठराव मतदानाद्वारे मंजूर.

पिठासन अधिकारी
स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०९/२००२

प्रकरण क्र. ०२ :- **दि. १६/०९/२००२ रोजीचे मा. स्थायी समिती सभापतीं निवडणुकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. 02 :-

दि. १६/०९/२००२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभापती निवडणुकींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री. हरेश गावंड. **अनुमोदन :- श्रीम. ज्योत्स्ना हंसनाळे.**

ठराव सर्वानुमते मंजुर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. २६/९/2002

ठराव क्रमांक – ३

विषय :- ३ पल्स पोलीओ लसीकरण मोहिमे अंतर्गत व मॉप-अप राऊंड मोहिमेकरिता लागणा-या जीप गाडया भाडयाने घेणे, जाहिरात फलक, कापडी बॅनर व विविध छपाई साहित्य खरेदो करणे कामास मुदतवाढ देणे बाबत.

शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्र भाईंदर / उत्तन व महानगरपालिकेमार्फत दि.२९/९/२००२ रोजी केंद्रावर व दि.३०/९/२००२ ते ५/१०/२००२ पर्यंत घरोघरी फिरुन पल्स पोलीओ लसीकरण मोहिमेचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी मोहिम यशस्वी करण्यासाठी २० जीपगाडया जाहिरात फलक, बॅनर व आवश्यक ते छपाई साहित्य देणेबाबत कळविले आहे.

परंतु सदरकामी नव्याने निविदा मागवून, मंजूरी घेऊन ठेकेदारांना कार्यादेश देणे या बाबींची पर्तता करणेस असलेला अपूरा कालावधी लक्षात घेता सदरकामी यापूर्वीच्या मोहिमेसाठी मंजूर केलेल्या निविदा नुसार कामे करणे योग्य होईल. जीपगाडया भाडे तत्वावर रु.७००/- प्रती दिन प्र.जीप मे.राज टूर ॲन्ड ट्रॅव्हल्स, कापडी बॅनर रु.५/- चौ.फुट मे. ॲडव्हेंचर इंटरप्राईजेस छपाई साहित्य निविदेतील मंजूर दरानुसार मे.श्वेता प्रिटींग प्रेस पुरवठा करणेस तयार आहेत. तशी त्यांनी लेखी संमती दिलेली आहे.

तरी सदरकामी पल्स पोलीओ लसीकरण मोहिमेसाठी तातडीचे काम म्हणून ठेकेदारांना मुदतवाढ देणेस व सदरकामी येणा-या खर्चास देयके अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- श्री महेंद्रसिंह चौहान
अनुमोदक :- श्री हरेश गायड
ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २७/०९/२००२

प्रकरण क्र. ४ :- **दि. २६/०९/२००२ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ०४ **:-**

दि. २६/०९/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी. **अनुमोदन :- श्री. शशिकांत शहा.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका.

" मा. ~~महासभा~~ स्थायीसमिति दि. ३१.१० २००२."

विषय :- ५ गणेश देवळ नगर, भाईंदर [प.] पेणकरपाडा येथील बंद पडलेल्या बालवाडया व नाझरेथ आगार येथे नविन बालवाडी सुरु करणे बाबत..

ठराव क्र. - ५

महानगरपालिकेच्या महानगरपालिका क्षेत्रात २५ बालवाडया सुरु आहेत. त्यामधून २५ बालवाडी सेविका कार्यरत आहेत. त्यांना शासन आदेश क्र. ५/प्रा.शा./१०९७/३१४/९७/प्रा. शि.-२, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ दि. ६. ५. ८८ च्या आदेशा-प्रमाणे रु. ५००/- ठोक मानधन देण्यात येते. त्यांना वरील दिलेल्या ठिकाणी नेमणूक करावयाची आहे. दि. २४. ६. २००२ च्या जाहिरातीनुसार ५ अर्ज आलेले आहेत. त्यापैकी खालील बालवाडी सेविकांची नेमणूक करावयाची आहे.

अ.क्र.	नांव	पत्ता.
१.	२.	३.
१]	कु. रीमा सुधीर कान्हे.	पेणकरपाडा.
२]	श्रीम. रेखा हेमराज पाटील	गणेश देऊळ नगर.
३]	श्रीम. फाल्गुनी धवल श्रॉफ	गणेश देऊळ नगर.
४]	श्रीम. वनिता मनोहर सिंह	नाझरेथ आगार.

वरील प्रमाणे बालवाडी सेविकांची शासन आदेशान्वये रु. ५००/- ठोक मानधनावर नेमणूक करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. महेंद्रसिंग चव्हाण

अनुमोदन :- श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

६

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ३/१०/२००२

विषय :- ६ भाईंदर (पूर्व) येथील जेसल पार्क रेल्वे समांतर रस्त्यावर माती भराव करून खडीकरण व डांबरीकरण करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे

ठराव क्र. ६

शासनाने रु. ५.०० लाखाच्या आतील कोणतेही काम मजूर सोसायटी कडून करुन घेणे बाबत आदेश आहेत. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रु.५.०० लाख रकमेच्या आतील कामे अंदाज पत्रकातील दराने घेण्याकरिता शासनाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था काम वाटप समितीकडे पाठवणे हरकत नसलेबाबत जा.क्र. /जि.ऊ.नि/ठाणे/बी -५/म.का.स./२२३५/ कामवाटप सन २००२ दि. २५/६/२००२ ने कळविले आहे. त्यानुसार पुढील रु. ५.०० लाख रकमेची आतील कामे मजूर सोसायटी कडून अंदाज पत्रक दराने करुन घेण्याकरिता सर्व प्रस्ताव मा.जिल्हा उपनिबंधकाकडे पाठविण्यास व त्यानुसार ठेकेदारांना अंदाजपत्रके दराने काम करुन घेण्यास कार्यादेश देण्यास प्रशासकीय ठराव क्र. १५२ दि. ४/७/२००२ ने मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरचे काम श्री गणेश विसर्जनासाठी अत्यंत तातडीचे असल्याने व धार्मिक कार्यक्रमासाठी दुसरा मार्ग नसल्याने करुन घेण्यात आलेले आहेत. वरील भाईंदर (पूर्व) जेसल पार्क रेल्वे समांतर रस्त्यावर मातीभराव करुन खडीकरण, डांबरीकरण करणे कामास मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांच्याकडील जा.क्र. ठाणे/म.का.स./कामवाटप/१००५/२००२ दि. १८/९/२००२ मंजूरी दिलेली आहे.

वरील कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री तुलशीराम म्हात्रे

अनुमोदन :- हरेश ना. गाविंड (गायकवाड)

ठराव सर्वानुमते मंजूर :-

सभापती
स्थायी समिती
सभा
मिरा-भाईंदर
महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. 3/10/2002

विषय क्र.08 :- विविध विकास कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देणे.

ठराव क्र.:- ८.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम
1)	नवघर स्मशान भुमीपासून डंपींग कडे जाणाऱ्या रस्त्याकरीता माती भराव करणे	रु. 2,91,945/-
2)	मिरा रोड भागातील गटारे लोखंडी कव्हर स्लॅब दुरुस्ती करणे व नविन बसविणे.	रु. 4,90,000/-
3)	मिरा रोड येथील नया नगर अस्मीता हेरीटेज-!!! ते अस्मीता जस्मल येथे सी.सी. गटार बांधणे	रु. 4,95,000/-
4)	घोड बंदर ते राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 कडे जाणाऱ्या रस्त्यावर खचलेल्या भागावर रिटेनिंग वाल बांधणे	रु. 4,95,000/-
5)	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) विभागातील स्मशानभुमि विकास व दुरुस्ती कामे करणे	रु. 4,99,000/-
6)	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) विभागातील स्मशानभुमी कामे करणे.	रु. 4,99,000/-
7)	मिरा भाईंदर महानगरपालिका करीता हिल्टींग लेव्हल स्टॉक, रेजिंग रॉड, इत्यादी उपलब्ध करणे.	रु. 2,00,000/-
8)	भाईंदर (प.) स्मशान भुमी पाठीमागे सी.सी. गटार बांधणे	रु. 5,00,000/-
9)	भाईंदर (प.) स्मशान भुमीत गोडावून बांधणे	रु. 4,95,000/-
10)	भाईंदर (प.) स्मशान भुमीत पाण्याची टाकी व मिटर कॅबीन बांधणे.	रु. 2,00,000/-
11)	भाईंदर (पूर्व) विभागातील विविध नाल्यांवर स्लॅब ड्रेन बांधणे.	रु. 4,99,000/-
12)	भाईंदर (प.) येथील मोतीनगर, शांती अपार्टमेंट येथे सी.सी. गटार बांधुन स्लॅब टाकणे.	रु. 4,95,000/-
13)	भाईंदर (प.) मोतीनगर, भागातील लाकडाच्या वखारीच्या बाजूला नव्याने गटार बांधून स्लॅब टाकणे.	रु. 4,90,000/-

14) भाईंदर (प.) राजेश हॉटेल ते जय अंबे मंदिर येथे गटार बांधणे. — रु. 4,98,000/-

15) भाईंदर (प.) राजेश हॉटेल ते जय अंबे मंदिर येथे गटारावर स्लॅब टाकणे. — रु. 4,97,000/-

16) भाईंदर (प.) अमिता इलोरा इमारतीच्या मागील बाजूस सी.सी. गटार व स्लॅब टाकणे. — रु. 4,90,000/-

वरील पैकी अ.क्र. 12 व 13 ही कामे एकत्र करुन मा. महासभेपुढे ठेवण्यात यावीत. तसेच यापुढे मा. स्थायी समितीपुढे विषय ठेवताना प्रत्येक कामाचा स्वतंत्र गोषवारा व स्वतंत्र विषय घेऊन ठेवण्यात यावा.

वरीलपैकी अ.क्र. 1 ते 11 व 14 ते 16 या कामांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 व प्रकरण 5 मधील तरतुदीन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे. सदरची कामे रु. 5.00 लक्ष रकमेच्या आतील असल्याने मा. जिल्हा उप निबंधक यांच्याकडे पाठवून सदर कामे जिल्हा मजूर सोसायटी मार्फत अंदाजपत्रक दराने करुन घेण्यास व ठेकेदाराची देयके प्रदानास मंजूरी देण्यांत येत आहे.

सूचक :- श्री. मिलन म्हात्रे
अनुमोदन :- श्री. विनेश नलावडे
ठराव सर्वानुमते मंजूर :-

सभापती,
स्थायी समिती सभा,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १०/१०/२००२

प्रकरण क्र. ८ :- दि. ०३/१०/२००२ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ०८ :-

दि. ०३/१०/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री. शशिकांत शहा. **अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. दि.१०/१०/२००२

प्रकरण क्र. ९ विहित नमून्यांमध्ये लेखे ठेवणेबाबत.

ठराव क्र. : ९

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (९३) नुसार महानगरपलिकेचे जमाखर्चाचे लेखे मा.स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल त्यारीतीने व त्या नमुन्यांमध्ये ठेवण्यात आले पाहिजेत. सध्या सर्वत्र महानगरपालिकांमध्ये महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ प्रमाणे लेखे ठेवण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेत महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ प्रमाणेच विहित नमून्यांमध्ये लेखे ठेवण्यास आजची सभा मंजूरी देत आहे.

सूचक :-श्री--------------------- (हरेश गांवड)

अनुमोदक श्री ------------------------ (शशिकांत शहा)

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. 10/10/2002 ठराव क्र. ने मंजूर

विषय क्र. १० :- टाटा मॉडिल एल.पी.टी 709/38 चेसीजवर फायर ब्रिगेड बॉडी बांधणे व त्यावर लागणारे इतर सर्व साहित्य पुरवठा करणे बाबतची निविदा नामंजूर करुन फेरनिविदा मागविणेबाबत.

ठराव क्र. १० :-

महानगरपालिकेने दि. 2/7/2002 रोजी "दै. नवभारत" या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार टाटा मॉडिल एल.पी.टी. 709/38 चेसीजवर फायर ब्रिगेड बॉडी बांधणे व त्यावर लागणारे सर्व साहित्य पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

अ. क्र.	तपशिल	मे. अन्थोनी मोटर्स प्रा.ली.	मे. ॲन्थोनी गॅरेज प्रा.ली.	मे. मनिष मोटर्स
1.	अग्निशमन दलाकरिता टाटा मॉडिल एल.पी.टी. 709/38 चेसीजवर फायर बॉडी बांधणे व गाडी बरोबर लागणारे इतर साहित्य पुरवठा करणे.	एकुण किंमत रु. १३,९९,४५०/-	एकुण किंमत रु. १२,२०,०००/-	एकुण किंमत रु. १४,५५,५००/-

वरिल तुलनात्क तक्ता पाहता मे. ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि. यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत परंतु त्यांची बाजार भावाशी तुलना केली असता ते अवाजवी आहेत. त्यामुळे सदरच्या निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविणेस हि सभा मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73 प्रकरण 5 नुसार मंजुरी देत आहे.

सूचक :- श्री. शरद पाटील. Sharad Patil

अनुमोदन :- श्री. अग्रवाल धनराज नंदलाल. [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. 10/10/2002 ठराव क्र. ने मंजूरी

विषय क्र. 11 :– आरोग्य विभागाच्या ट्रॅक्टर ट्रॉली (ट्रेलर) दुरुस्ती बाबत.

ठराव क्र. :– ९९.

नगरपालिकेने वाहने दुरुस्तीचा वार्षिक ठेका देणेकामी निविदा मागवून त्यास महानगरपालिका प्रशासकिय ठराव क्र. 5 दिनांक 26/3/2002 ने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार मे. अे. डी. मोटार्स यांना स्टॅम्प पेपरवर करारनामा करणेसाठी दि. 26/3/2002 रोजी पत्र दिले असता ते त्यांनी स्विकारले नव्हते तसेच करारनामाही सादर केलेला नव्हता त्यामुळे त्यांना दुरुस्तीसाठी कार्यादेश दिलेला नाही. तसेच त्यांनी पुन्हा दि. 1/6/2002 रोजी कार्यादेश मिळणेबाबत महानगरपालिकेला पत्र दिल्यानंतर वाहन विभागाने दि. 3/6/2002 रोजीच्या अहवालानुसार व मा. अंतर्गत लेखा परिक्षक सो. यांचे दि. 6/6/2002 रोजीचे अभिप्रायानुसार मे. श्री. अे. डी. मोटार्स यांना चर्चेसाठी मा. प्रभारी अधिकारी सो. यांचे कक्षात दि. 16/6/2002 रोजी बोलावले होते व झालेल्या चर्चेनुसार त्यांनी सदरचे पत्र दि. 16/6/2002 रोजी स्विकारले आहे. परंतु त्या पत्रानुसार त्यांनी अद्यापपर्यंत करारनामा सादर केलेला नाही. करिता त्यांनी आजपर्यंत करारनामाही सादर केला नसल्यामुळे दुरुस्ती कार्यादेश देणे शक्य झालेले नाही.

महानगरपालिकेचे दि. 26/3/2002 चे पत्रानुसार मे. अे. डी. मोटार्स यांनी दि. 5/10/2002 रोजी सायंकाळी 5.00 वाजता करारनामा सादर केला आहे. सदरचा करारनामा मे. श्री. ए. डी. मोटर्स यांनी वेळेमध्ये सादर केलेला नाही. त्यामुळे सदरची निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविणेस ही सभा मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 प्रकरण 5 नुसार मंजुरी देत आहे.

सूचक :– श्री. अशोक पाटील.

अनुमोदन :– श्री. शशिकांत शहा.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २४/१०/२००२

प्रकरण क्र. १२ :- **दि. १०/१०/२००२ रोजीचे मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. 92 :-

दि. १०/१०/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे. **अनुमोदन :- श्री. धनराज अग्रवाल.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा दि. २४.१०.२००२ ठराव क्र.

विषय :- ९३ वैद्यकीय खर्चाची प्रतीपूर्ती प्रदान करणे बाबत...

ठराव क्र. - ९३

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायम कर्मचारी यांनी शासन निर्णय क्र. एसएजी/१०९९/प्रक्र. ४०/आरोग्य-३, मंत्रालय मुंबई-३२, दि. २९.७.९९ अंतर्गत तरतुदीनुसार व महाराष्ट्र राज्य लेखा [वैद्यकिय देखभाल] नियम १९६१ मधील तरतुदीच्या अधिन राहून शासन निर्दिष्ट आकस्मिक उदभवणा-या आजारावर शासकीय/खाजगी रुग्णालयात औषोधोउपचरा वरील केलेल्या वैद्यकीय खर्चाची बीले वेतन गटा नुसार सुधारीत मुळ मासीक वेतन रु.८,४००/- पर्यंत वेतन घेणा-या कर्मचाऱ्यांस झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या ९० % वैद्यकिय खर्चाची प्रतीपूर्ती परंतू किमान रु. २०,०००/- च्या कमाल मर्यादित राहून देय असून " मा. प्रशासकीय ठराव क्र. १०३, दि. १३.६.२००२ अन्वये महानगरपालिका. कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती प्रदान करणेस मंजूरी दिलेली आहे.

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	खर्च केलेली नाते.	एकूण खर्च.	देय रक्कम.
१.	२.	३.	४.	५.
१]	श्री. भास्कर शंकर पाटील लिपिक.	कु. धिरज भास्कर पाटील. मुलगा	०३,९४८/-	०३,५५३/-
२]	श्री. क्रिष्णन आरमुगम सफाई कामगार	स्वत:	११,०७७/-	०९,९६९/-
३]	श्री. दोराईराज रामानुजम सफाई कामगार	स्वत:	१४,८३२/-	१३,३४९/-
४]	श्री. [illegible]बाळ कृष्ण वेल्यू सफाई कामगार	कु. उमा बा. वेल्यू मुलगी	२०,२५५/-	१८,२३०/-
५]	श्री. दत्ताराम सिताराम शेलार- सफाईकामगार	स्वत:	२०,५००/-	१८,४५०/-
६]	श्री. जयप्रकाश र. पाटील सफाई कामगार	सौ. ज्योती ज. पाटील पत्नी.	१३,९०६/-	१२,५१५/-
७]	श्री. चंद्रकांत बोरसे लिपिक	सौ. कमल चंद्रकांत बोरसे पत्नी	०७,०४०/-	०६,३३६/-
८]	श्री. जोगिंदर र. पाटील लिपिक	सौ. ज्योती गो. पाटील पत्नी.	२७,३०१/-	२०,०००/-
९]	श्रीम. चित्रा रविंद्र कडू लिपिक.	स्वत:	०४,५०९/-	०४,०५८/-

...

वरील प्रमाणे कर्मचारी यांनी केलेल्या खर्चाची मा. जिल्हाशल्य चिकित्सक, ठाणे. यांचेकडील प्रमाणपत्राचे अधिन राहून शासन निर्णयास अनुसरुन वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती प्रदान करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. शशिकांत शाह
अनुमोदन :- श्री. शरद के. पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २४/१०/२००२

विषय :- १४ लाड समितीच्या शिफारशी नुसार बारसा पध्दतीने सफाई कामगार म्हणून नियुक्ती देणे बाबत.

ठराव क्र. :- १४.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कै. श्री. सनमुगम लक्ष्मण व श्रीम. गंगुबाई जान्या पवार हे कर्मचारी सफाई कामगार म्हणून कार्यरत होते. पैकी श्री. सनमुगम लक्ष्मण यांचे दि. ८.२.२००२ रोजी निधन झाले असुन, श्रीम. गंगुबाई पवार हया दि. ३०.४.२००२ [म.न.] पासुन सेवा निवृत्त झालेल्या आहेत. त्यांच्या वारसानी अनुक्रमे श्रीम. चिन्नपून्नु सनमुगम [पत्नी] व श्री. सुरेश जान्या पवार [मुलगा] यांनी वारसा पध्दतीने महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून नियुक्ती मिळणे बाबत विनंती केली आहे.

सफाईचे काम करणा-या सफाई कामगारांची आर्थिक स्थिती सबळ नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना नोकरीची शास्वती मिळणे अत्यंत आवश्यक असुन सफाई कामगार मयत, सेवानिवृत्त अथवा विकलांग झाल्यास शासन निर्णय क्र. अकंपा/१०००/प्र.क्र. २०/२०००/आठ, दि. २८/३/२००१ व शासन निर्णय क्र. मागास-२२२००२/५१०/प्र.क्र.-५३/२००२/नवि-६/दि. १७.८.२००२ अन्वये अनुकंपा तत्वारील व लाड कमिटीच्या शिफारशी नुसार सफाई कामगारांच्या नियुक्त्या करण्यांची पध्दत चालु ठेवण्या बाबत निदेर्शित केलेले आहे. त्यानुसार श्रीम. चिन्नपून्नू सनमुगम व श्री. सुरेश जान्या पवार यांना वारसा पध्दतीने महानगरपालिका आस्थापनेवर रिक्त सफाई कामगार या पदावर रुपये २५५०-५५-३२०० या वेतन श्रेणीत नेमणूक देण्यास मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी

अनुमोदन :- श्रीमती. जोसफा हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

Ghosamale 24/10/02

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक २४. १०. २००२

विषय क्र.- ९५ नविन विद्युत पुरवठा करणे कामी देयक प्रदान करणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. :- ९५

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा गांव येथे शाळागृह इमारतीचे एक भागाचे बांधकाम पुर्ण झालेले असून सदर ठिकाणी शाळा भरविण्यांत येत आहे.

तसेच भाईंदर [प] रावतलाव येथे तलाव सुशोभिकरणाचे काम अंतीम टप्प्यात असून विद्युत कनेक्शन घ्यावयाचे आहे.

काशिगांव येथे मासळी मार्केट चे काम सुरु असून मे. बी.एस. ई.एस. कं. ने नविन विद्युत कनेक्शन व मीटर करीता खालीलप्रमाणे रकमेची मागणी केलेली आहे.

१]	मिरा गांव शाळा	रु ७,४४०/-
२]	भाईंदर [प] रावतलाव	रु ३,९६०/-
३]	काशिगांव मासळी मार्केट	रु २,०२०/-
		रु १३,४२०/-

वरील देयके मंजूर करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री याकूब कुरेशी

अनुमोदन :- श्री जेम्स कोलासो

ठराव सर्वानुमते मंजूर.......

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महापालिका.

मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ९६ दि. २४/१०/२००२

विषय :-९६. मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळांच्या सन २००२-२००३ सहामाही परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिकां तसेच आवश्यक साहित्य छपाई तुलनात्मक दरपत्रकांस मंजूरी मिळणे बाबत...

अ. क्र.	छपाईचा तपशिल.	साईज.	श्री. प्रिंटर्स,	समता प्रिंटर्स	महावीर ट्रेडर्स,
१.	२.	३.	४.	५.	६.
१]	इ. ३री ते इ. ७ वी प्रश्नपत्रिका पाठपोठ प्रतिपेज[मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दू.]	ए-४	१.३०	१.५०	१.१५
२]	उत्तरपत्रिका १२ पानी[पाठपोठ] प्रति हजारी.	नमुन्याप्रमाणे	१०५०/-	९७५/-	९५०/-
३]	पुरवण्या ४ पानी[पाठपोठ]	नमुन्याप्रमाणे	४५०/-	४७५/-	३६०/-

सहामाही परीक्षेसाठी तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. तरी वरील प्रमाणे तीन निविदा नुसार तुलनात्मक दरपत्रक पाहता. " महावीर ट्रेडर्स, अंबरनाथ." यांची निविदा सर्वात कमी आहे. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस " [illegible] व देयक अदा करणेस हि सभा [illegible] आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री दिनेश नलावडे

अनुमोदन :- श्री [illegible]

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ३१/१०/२००२

प्रकरण क्र. १७ :- **दि. २४/१०/२००२ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. १७ :-

दि. २४/१०/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- हरेश गावंड **अनुमोदन :-** ज्योत्स्ना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय: ४८. मा. नगरसेवकांसाठी नगरसेवक कक्ष देणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्रं :- १८.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मा. नगरसेवकांना नगरसेवक कक्ष मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये तरतूद नसल्याने नगरसेवक कक्ष देता येणार नाही

श्री. महेंद्रसिंग चौव्हाण

सुचक :- [signature]

अनुमोदन :- [signature] Ohasonale

श्रीमं. ज्योत्स्ना हसनाळे

[signature]

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ३१/१० /२००२

प्रकरण क्र. ९९ : मा. महापौर, मा. उपमहापौर यांचे कक्षासाठी फॅक्स मशीन, टेलिफोन इन्स्ट्युमेंट, रिमोट कंट्रोल बेल व टेलिफोन कॉलडायरी खरेदी करणे कामी दरपत्रकास मंजूरी देणे.

ठराव क्र. : १९

महानगरपालिकेने दि. ४/१०/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहीर कोटेशन नोटीसीनुसार मा. महापौर, मा. उपमहापौर यांचे कक्षासाठी फॅक्स मशीन, टेलिफोन इन्स्ट्युमेंट, रिमोट कंट्रोल बेल व टेलिफोन कॉलडायरी पुरवठा करणे कामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. मानत्री इंड.	मे. सुप्रीम इंट.	मे. न्यु फिल्ड
१	२	३	४	५
१.	फॅक्स मशीन (पॅनासॉनिक) मॉडेल नं. KX-FT-71 BX	रू. १४,३५०/- प्र. नग	रू. १५,५५०/- प्र. नग	रू. ११,३५०/- प्र.नग
२.	टेलिफोन इन्स्ट्युमेंट (BPL) मॉडेल नं. 3600 M.M.	रू. ९८५/- प्र. नग	रू.१,०२५/- प्र. नग	रू. ९२५/- प्र.नग
३.	रिमोट कंट्रोल बेल	रू. ९५०/- प्र. नग	रू.६७५/- प्र. नग	रू. ५५०/- प्र.नग
४.	टेलिफोन कॉलडायरी (Beetel) स्टँडर्ड मॉडेल	रू. १,१८५/- प्र. नग	रू.१,२५०/- प्र. नग	रू. १,१३५/- प्र.नग

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. न्यु फिल्ड** यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. दरपत्रकातील सर्वात कमी दरानुसार प्रत्येकी दोन सेट खरेदी करणेस रक्कम रू. २७,९००/- इतका खर्च होणार आहे. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून वरीलप्रमाणे साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक — लिओ कोलासो

अनुमोदन — महेंद्रसिंह चौहान

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.३१/१० /२००२

प्रकरण क्र. २० : **गणेशोत्सव सजावट स्पर्धेसाठी स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र बनवुन घेणे कामी दरपत्रकास मंजूरी देणे.**

ठराव क्र. : 20

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धा - २००२ आयोजित केली होती. सदर स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देणेबाबत दि. ३/१०/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीसी नुसार खालील प्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल	हॉटेल कन्सलटंसी ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर	मे. तन्मय इंट.	पटेल ॲन्ड कंपनी
१	२	३	४	५
१.	**स्मृतीचिन्ह पितळी मोठी साईज** पितळी ट्रॉफी १० १/२"X १ ३/४" पितळी स्टँड ७"X ३ ३/४" लाकडी सेफ ७"X ३" संपूर्ण पितळी गेज १९ ट्रॉफीच्या मागील बाजुस संपूर्ण प्लाय लावून तयार करणे. (६ नग)	प्रथम पारितोषिक २ नग ३,१५०/- द्वितीय पारितोषिक २ नग ३,१५०/- तृतिय पारितोषिक २ नग ३,१५०/-	प्रथम पोरितोषिक प्र. नगास १,६००/- द्वितीय पारितोषिक १,६००/- तृतिय पारितोषिक १,६००/-	प्रथम पोरितोषिक २ नग ३,०००/- द्वितीय पारितोषिक २ नग ३,०००/- तृतिय पारितोषिक २ नग ३,०००/-
२.	स्मृतीचिन्ह (पितळी) लहान साईज पितळी ट्रॉफी ८ १/२"X ७ ३/४" पितळी स्टँड ६"X २ ३/४" लाकडी सेफ ७"X ३" संपूर्ण पितळी गेज १९ ट्रॉफीच्या मागील बाजूस संपूर्ण प्लाय लावून तयार करणे. (२५ नग)	प्रति नगास रू. १,३५०/-	प्रति नगास रू. १,३५०/-	प्रति नगास रू. १,२००/-
३.	प्रमाणपत्र छपाई करणे. स्पेशल प्रिंटींग ग्लॉसी पेपर स्कॅनिंग करून ९ कलरमध्ये प्रिंटींग करणे व स्पेशल लॅमिनेशन करणे १३"X ९" (३५ नग)	प्रति नगास रू. ३७५/-	प्रति नगास रू. ३००/-	प्रति नगास रू. २९०/-

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. पटेल ॲन्ड कंपनी** यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र बनवुन घेणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक — धनराज अग्रवाल

अनुमोदन — मिलन म्हात्रे

अध्यक्ष स्थायी समिती मिरा-भाईंदर महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.३१/१० /२००२

प्रकरण क्र. २९ : महानगरपालिका सभागृहात नविन खुर्च्या खरेदी करणे व खुर्च्यांची किरकोळ दुरूस्ती करणे. कामाचे दरपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्र. : 29.

मिरा-भाईंदर महानगरपालिका सभागृहातील नगरसेवकांना बसण्याकरिता नव्याने खुर्च्या खरेदी व सध्या असलेल्या खुर्च्यांची किरकोळ दुरूस्ती करणे बाबत. दि. ३-१०-२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीस नुसार खालील प्रमाणे ठेकेदारांनी दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. ॲक्यु मेन इंटरप्राईजेस	मे. आर. पी. इंडस्ट्रीज	मे. मोना ऐजन्सीज.
१	२	३	४	५
१.	फॅब्रीक + फोम कुशन रिव्हालविंग चेअरविथ हॅण्डल १९''X१९''X१९'' कलर ब्ल्यु	रू. ३,२५०/- प्र. नग १५.३% रु ४८७/- विक्रीकर	रू. ३,९५०/- प्र. नग १५.३% रु ६०४/- विक्रीकर	रू. ४,३००/- प्र.नग
२.	नविन बेस, व्हिल हॅण्डल स्क्रु रिपेअरिंग	रू. ३,५३५/- (१६ नग)	रू. ६,४००/- (१६ नग)	रू. ४,८००/- (१६ नग)

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. ॲक्युमेन इंटरप्राईजेस** यांचे दरपत्रक सर्वात कमी दराचे असून ते बाजार भावाशी तुलना करता वाजवी आहे. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून खुर्च्या खरेदी व खुर्च्यांची दुरूस्ती करणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक श्री. याकुब कुरेशी.

अनुमोदन श्री. हरेश गोंवडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.३१/१० /२००२

प्रकरण क्र. २२ : महानगरपालिका नवनिर्वाचित सदस्यांकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांची पुस्तके खरेदी करणे कामी मंजुरी देणे.

ठराव क्र. : 22.

महानगरपालिकेने दि. ३/१०/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहीर कोटेशन नोटीसीनुसार "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९" ची पुस्तके पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. मुकुंद प्रकाशन	मे. केदार स्टेशनर्स	मे. मंदार स्टेशनर्स
१	२	३	४	५
१.	मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे पुस्तक	रू. २५०/- प्र. नग	रू. २६०/- प्र. नग	रू. २६५/- प्र.नग

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. मुकंद प्रकाशन** यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून पुस्तके खरेदी करणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक शशीकांत शहा

अनुमोदन दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मा.स्थायी समिती सभा दि.~~२४/१०/२००२~~

ठराव क्र. २३ , दि. ३१/१०/२००२

प्रकरण क्र. २३ माहे जुलै २००२ ते सप्टें.२००२ पर्यंतच्या त्रैमासिक जमा खर्चास मंजूरी मिळणे बाबत.

ठराव क्रं :- २३.

माहे जुलै २००२ ते सप्टें.२००२ पर्यंत झालेली जमा आणि त्यानुसार झालेला खर्च व उर्वरित होणारी जमा माहे मार्च २००३ अखेर पर्यंत वसूल करुन खर्च भागवावा असे ठरले. माहे जुलै २००२ ते सप्टें.२००२ पर्यंत झालेल्या जमा खर्चास आजची सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- (श्री. हरेश गांवड) अनुमोदन :- (श्री. दिनेश नलावडे.)

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष

मा.स्थायी समिती,

मिरा भाईंदर महानगरपालिका

ठराव क्र: - २४

मा.स्थायी समिती सभा दि.३१/१०/२००२

प्रकरण क्र.२४ :- पुर्नविनियोजन पत्रकास मंजूरी देणे

(महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम कलम १०१ (६) व महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम २०)

महानगरपालिका मा.महासभेपुढे सादर करावयाचे पुर्नविनियोजन विवरणपत्र.

अ.क्र.	कडून					कडे					अभिप्राय
	प्रधान,गौण व तपशीलवार लेखाशिर्ष	कामे सेवा इत्यादी	मूळ निधी	अद्यावत खर्च	उपलब्ध शिल्लक	प्रधान,गौण व तपशीलवार लेखाशिर्ष	कामे सेवा इत्यादी	मूळ निधी	अद्यावत खर्च	प्रस्तावित रक्कम	
१	विकास आराखडा अंमलबजावणी भांडवली (लेखा) प्र.क्र.५१ क.७(६)	भाईंदर पूर्व चौपाटो विस्तार करणे. पृ.क्र. ५१	७५००००००/-	--	७५००००००/-	महसुली (लेखा) संकिर्ण पृ.क्र.४३ फ ९	निवडणूकीचा खर्च	५०००००००/-	५०००००००/-	४५००००००/-	भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी विस्तार करणे लेखाशिर्षाखाली रु.७५,००,०००/- एवढी तरतूद केलेली असून सप्टेंबर २००२ अखेर सदर लेखाशिर्षाखाली काहि एक खर्च झालेला नाहि तरी ३१ मार्च २००३ पर्यंत होणारा खर्च गृहित धरता सदर लेखाशिर्षातून रु.४५,००,०००/- एवढी रक्कम निवडणूक खर्च लेखाशिर्षामध्ये वर्ग करण्यास शिफारस आहे

संबंधित रकमा त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद नसलेल्या नव्या बाबीसाठी आवर्ती खर्चापोटी पूर्वविनियोजित केलेल्या नाहीत. ~~तरी वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मा.महासभेपुढे~~ सादर ~~करण्याकरिता शिफारस करण्यात येत~~ आहे. भाईंदर पूर्व येथे चौपाटी विस्तारचे काम त्वरीत करणे कामी निविदा मागविण्यात येणार सदर लेखाशिर्षातून रक्कम काढण्यात येऊ नये

सूचना :- सदर निवडणूक खर्चात रक्कम वाढविण्या करीता अनुमोदन :- बांधकाम विभागाने ह्या लेखाशिर्षातून ३१ मार्च २००३ पर्यंत शिल्लक राहणारी रक्कम पाहून प्रस्ताव ठराव सर्वानुमते मंजूर पुढील स्थायी समिती पुढे ठेवावा.

सुचक :- श्री दिनेश नलावडे [signature] अनुमोदन :- श्री शरद पाटील [signature]

[signature]

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.३१.१०.२००२ ठराव क्र.२५ ची नक्कलप्रत.

विषय क्र. :- मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या आदेश क्र. नप्रसई/१०२०/प्र.क्र.१०२/२००१/७, दि.९/४/२००१ च्या शुद्धीपत्रकातील अट शिथील करणे बाबत.

ठराव क्र. २५

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या ५३८ कर्मचा-यांना मा.संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक एमसीके/१०९७/प्र.क्र.५३८/९७/४ दि.१/६/२००० नुसार तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेने सफाई कामगार म्हणून दि.१/६/२००० पासून नियमित सेवेत सामावून घेतले आहे. या अगोदर वरील कर्मचारी रोजंदारी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. उक्त मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे रोजंदारी कर्मचा-यांना नियतिम सेवेत सामावून घेण्याच्या दि.१/६/२००० चे आदेशातील अट क्र.२ नुसार कायम सेवेत सामावून घेतलेले कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त किंवा अन्य कारणान्वये त्याची पदे रिक्त झाल्यास सदरची पदे शासनाच्या विहीत केलेल्या कार्यपद्धतीने भरण्यात यावी असे निर्दर्शित केलेले आहे.

तथापि मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील शुद्धीपत्रक क्र.नप्रसई/१०२०/प्र.क्र.१०२/२००१/७ दि.९/४/२००१ नुसार रोजंदारी कर्मचा-यांना विशेष बाब म्हणून सामावून घेण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु त्या पदावरील कर्मचा-याची सेवा निवृत्तीमुळे अथवा कोणत्याही कारणात्सव ही पदे रिक्त झाल्यास ही पदे आपोआप व्यपगत होतील व भविष्यांत ही पदे नगरपरिषदेत भरता येणार नाहीत असे निर्देशित केलेले आहे.

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिकेने '' सफाई कामगार '' म्हणून ५३८ कर्मचा-यांना सेवेत नियमित केले असून त्या सफाई कर्मचारी यांना साफ सफाई व घाणीची कामे करावी लागतात. अशा प्रकारची कामे करीत असल्याने त्यांच्या प्रकृती स्वास्थात बिघडण्याचे प्रमाण फ़ार मोठ्या प्रमाणावर दिसून येते. तसेच अशा कामगाराची आर्थिक स्थिती सुद्धा सबळ नसते. त्यामुळे हे कामगार सेवानिवृत्त अथवा मयत झाल्यास त्याच्या कुटुंबीयांस शासनाचे या आदेशानुसार नोकरीची शाश्वती नसल्याने त्यांच्या कुटुंबाची फार बिकट परिस्थिती निर्माण होते. करिता ५३८ सफाई कामगार यांच्या बाबत सहानुभूती व मानवतावादी दृष्टीकोन ठेवून मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे दि.९/४/२००१ चे शुद्धीपत्रकातील अट शिथिल करणे धोरणात्मक बाब असल्याने तसा प्रस्ताव शासनास पाठविणे बाबत मा.महासभेत विचारार्थ पाठविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक : श्री. लिओ कोलासो

अनुमोदन : सौ. ज्योत्सना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा दि. ३१. १०. २००२, ठराव क्र. . २६ ची नक्कल प्रत.

विषय क्र. २६ :- रोजंदारी वेतनाचा दर वाढविणे बाबत...

ठराव क्र. २६.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत श्रीम. रत्नप्रभा एस. मोघे हया सन १९९६ पासून रोजंदारी कर्मचारी म्हणून कार्यरत असून त्या वर्ग-३ मधील "संगणक " चालकाचे काम करीत आहेत. सद्य:स्थिती मध्ये त्यांना रु. १००/- प्रतिदिन वेतन दिले जात असून. त्या कुशल कामगार या व्याखेत मोडत असल्याने शासन नियमाप्रमाणे रोजंदारीचा दर वाढवून मिळणे बाबत. विनंती केली आहे.

पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार वर्ग-३ मधील कुशल कामगार चे वेतनाबाबत. मा. कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग, ठाणे. यांचेकडील दि. ११. १०. २००२ चे पत्रानुसार वर्ग-३ मधील कुशल कामगारचा रोजंदारी दर रुपये १५५/- प्रतिदिन आहे.

तरी श्रीम. रत्नप्रभा एस. मोघे, रोजंदारी कर्मचारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग, ठाणे यांचे कडील पत्राचे अनुषंगाने " कुशल कामगार " म्हणून रु. १५५/- प्रतिदिन रोजंदारी दर माहे नोव्हेंबर-२००२ पासून मंजूर करणेस आर्थिक प्रशासकीय मान्यता देणेंत येते.

सुचक :- श्री. कोळासो लिओ अनुमोदन :- श्री. शशिकांत शहा.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि.३१/१०/२००२

प्रकरण क्र.२७ :- मिरा भाईंदर महानगरपालिका (जुने नगरपरिषद कार्यालय) जुन्या कार्यालयातील वातानुकूलित यंत्रे दुरुस्ती करणे कामाचे देयक प्रदान करणेस मंजूरी देणे.

ठराव क्रमांक :- २८.

मिरा भाईंदर महानगरपालिका (तत्कालिन नगरपरिषद) जुन्या कार्यालयातून नविन कार्यालय इमारत झाल्याने नविन कार्यालयात कामकाज चालत असून जुने कार्यालय रिकामी आहे. सदर जुन्या कार्यालयातील जुनी एकूण चार वातानुकूलित यंत्रे ना दुरुस्त करणे आवश्यक असल्याने सदरची वातानुकूलीत यंत्रे दुरुस्ती करुन सुस्थितीत ठेवण्यांत आलेली आहेत. महानगरपालिकेतील वातानुकूलित यंत्रे वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणारे ठेकेदार मे.टेक्नोकुल इंजिनिअरिंग यांच्याकडून त्यांच्या मजूर दराने सदरची यंत्रे (जुन्या कार्यालयातील) दुरुस्ती करुन घेतलेली आहेत. सदर कामी रु.५०,३९८/- एवढा खर्च झालेला असून ठेकेदाराचे देयक प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री हेरश गावंड   अनुमोदन :- श्री लिओ कोलासो

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १४/११/२००२

प्रकरण क्र. २८ :- **दि. ३१/१०/२००२ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. २८ **:-**

दि. ३१/१०/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.   **अनुमोदन :-** श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.स्थायी समिती सभा दि.१४/११/२००२

प्रकरण क्र. २९ :- अखिल भारतीय स्थानिक संस्था येथे मा.सदस्यांकरिता आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचे व वाहनाचे खर्चास मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. २९

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांना महानगरपालिका सभाकामकाज व प्रशासकीय कामकाज कसे काय चालते याबाबतचे प्रशिक्षण देणेबाबत मा.संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, अंधेरी यांना पत्राद्वारे कळविण्यांत आलेले होते. त्यानुसार दि.१७/१०/२००२ ते १८/१०/२००२ या कालावधीत प्रशिक्षण शिबीर आयोजित करुन प्रशिक्षण देणेंत आलेले होते. सदर प्रशिक्षणात स्टेशनरी, चहानाश्ता, भोजन इत्यादी बाबत त्यांचेकडून व्यवस्था करण्यांत आलेली होती. सदर प्रशिक्षण कालावधीत झालेल्या खर्चाचे देयक त्यांनी सादर केलेले असून प्रशिक्षणाकरिता ६५,९३५/- रुपये खर्च झालेला आहे.

तसेच प्रशिक्षणाच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या नगरसेवकांना घेऊन जाणेसाठी व परत आणण्यासाठी प्रसाद ट्रॅव्हल्स यांजकडून बस क्र.एम.एच.०२/९४३५ ची व्यवस्था करण्यांत आली होती. सदर बसचे एका दिवसाचे भाडे रक्कम रु.२,६००/- इतके ठरविण्यांत आले होते. बस सलग दोन दिवस वापरण्यांत आल्याने दोन दिवसांचे भाडे रु.५,२००/- इतके झालेले आहे. तसेच पार्किंग व टोलटॅक्सचे रक्कम रु.३००/- झालेले आहेत. तरी प्रसाद ट्रॅव्हल्स यांनी सादर केलेले एकूण देयक रक्कम रु.५,५००/- इतके आहे.

तरी वरीलप्रमाणे प्रशिक्षणाकरिता व वाहनाचा खर्च एकूण रक्कम रुपये ७१,४३५/- इतका झालेला आहे. सदर खर्चाचे देयक अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर

14/11/2002

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.१४/११/२००२

प्रकरण क्र. ३० :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २००२ करिता नियुक्त केलेल्या निवडणूक निर्णय अधिका-यांना पारिश्रमिक मानधन देणे बाबत.

ठराव क्र. ३० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २००२, दि.११/८/२००२ रोजी झाली असून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता निवडणूक निर्णय अधिकारी-९ तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी-९ हयांची नियुक्ती केलेली होती. शासन निर्णय क्र.ईएसटी/१०९९/प्र.क्र.२५०/९९/३३, दि.१/११/९९ नुसार नियुक्त अधिका-यांना त्यांच्या एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम पारिश्रमिक मानधन म्हणून देणेस शासनाने मंजूरी दिलेली आहे.

खालील अधिका-यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले आहे.

अ.क्र.	निवडणूक निर्णय अधिका-यांचे नांव	प्रभाग क्र.	सहा.निवडणूक निर्णय अधिका-याचे नांव
१)	श्री.भरत शितोळे	१,१८,१९	श्री.यशवंत भालेराव
२)	श्री.जी.आर.गायकवाड	२,३,४	श्री.एन.आर.शिंदे
३)	श्री.आर.के.कांबळे	५,२१,२६	श्री.बी.एन.पाटोल
४)	श्री.बी.पी.नुक्ते	१६,१७,२०	श्री.एन.के.जाधव
५)	श्री.व्ही.बी.मोरे	६,७,८	श्री.जी.एम.कुदाळे
६)	श्री.मनोज सुर्यवंशी	९,१०,२५	श्री.एम.ए.पितळे
७)	श्री.एस.एम.कुर्तकोटी	२२,२३,२४	श्री.डी.आर.मोहिते
८)	श्री.जे.एस.ठाकूर	१४,१५	श्री.जे.एन.काझी
९)	श्री.ए.बी.गायकवाड	११,१२,१३	श्री.संजय काकडे

वरील निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी हयांच्या व्यतिरिक्त निवडणूक प्रशिक्षणाकरिता व निवडणूकीच्या कामाची माहिती गोळा करणे, निवडणूक आयोगाकडे माहिती पाठविणे याकामी खालील अधिकारी वर्ग आलेले होते.

१)	श्री.चंद्रकांत माने	-	सचिव,कल्याण डोंबिवली महानगरपालिका
२)	श्री.जी.डी.महाजन	-	विशेष अधिकारी भिवंडी महानगरपालिका
३)	श्री.रावळ	-	कार्यकारी अभियंता
४)	श्री.निपुरते	-	जकात विभाग

तरी निवडणूकीकरिता नियुक्त केलेल्या संबंधित अधिका-यांना शासन निर्णयाप्रमाणे एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम पारिश्रमिक मानधन म्हणून देणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. भरत शितोळे नि.नि.अ. यांनी स्वतःच्या जीप मध्ये टाकलेले (मि.भा.म.न.पा. पासून डिझेल ~~खर्चाची~~) रक्कम वजा करुन, उर्वरित रक्कम त्यांना देण्यात यावी.

सुचक :- मिलन म्हात्रे

अनुमोदन :- महेंद्रसिंग चौहान

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.१४/११/२००२ ठराव क्र.   ची नक्कल प्रत

विषय क्र.३१ :- ठेका पध्दतीने लघुलेखक / संगणकचालक यांची नेमणूक करणे बाबत.

ठराव क्र. ३७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि.२८.२.२००२ रोजी स्थापना होऊन जुलै २००२ मध्ये महानगरपिलकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली असून महानगरपालिकेची कायदयानुसार प्रत्येक महिन्याला एक महासभा व प्रत्येक आठवडयाला एक स्थायी समिती सभा घेणे आवश्यक असून भविष्यात प्रभाग समित्या स्थापन होऊन त्यांच्याही सभा होणार असल्याने सदर सभाचे सभा सुरु असते वेळी इतिवृत्तांत लिहिण्यासाठी सध्या सचिव कार्यालयाचे लिपीक काम पहात असल्याने काही वेळा सभेत एकाचवेळी दोनपेक्षा अधिक नगरसेवक एकाच विषयावर चर्चा करीत असल्यास त्यांच्या संभाषणाची नोंद एकाच वेळी लिहून घेणे तसेच काही वेळा इतिवृत्तांत पूर्ण मुद्देसुद लिहिणे शक्य होत नाही. अशाप्रकारे लिपीकाकरवी कच्चे इतिवृत्तांत लिहून घेण्यात काही त्रुटो राहिल्यास गैरसमज निर्माण होतो. त्यामुळे सभावृत्तांत लिहून घेण्यासाठी व सभा कामकाजात सुसूत्रता येण्याचे दृष्टिने महानगरपालिकेकडे लघुलेखक व संगणक चालक पदे मंजूर नसल्याने पदे मंजूर होऊन येईपर्यंत किमान दोन लघुलेखक व सभावृत्तांत संगणकावर टंकलिखित करुन घेण्यासाठी एक संगणक चालक यांना ठेकापध्दतीने जाहिर निविदा मागवून नियुक्ती देण्यास येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. मि[illegible] म्हात्रे   अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

[illegible]
१५/११/२००२

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.१४/११/२००२

प्रकरण क्र.३२ :- महानगरपालिका मुख्य कार्यालय व विभागीय कार्यालयाकरिता नविन वॉटरकुलन खरेदी करणे बाबत.

ठराव क्र. 32

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, विभागीय कार्यालय या ठिकाणी असलेले अधिकारी/ कर्मचारी/पदाधिकारी/ नगरसेवक कार्यालयात येणारे नागरीक यांना पिण्याच्या पाण्यासाठी नविन वॉटर कुलरची मागणी केलेली आहे. याकामी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकांत फर्निचर उपकरण कुलर व विज उपकरण या शिर्षकाखाली रु.२,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. याबाबत शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील पत्र क्र.डब्ल्युक्यूएम/२००१/ ४४७/प्रक्र.२२४/पापु-१२, दि.२०/११/२००१ तसेच उद्योग उर्जा विभागाचे परिपत्रक क्र.एसपीसी/आर-सीटो/वॉटर कुलर/०६/०१/०२/सी-८११ , दि.२ जूलै २००२ ने परिपत्रक सादर केलेले आहे. परिपत्रकांत नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या दर करारानुसार व शासन मान्यते प्रमाणे सुमित्रा या उत्पादक कंपनीकडून वॉटर कुलर खरेदी करावे. असे निर्देश दिलेले आहेत. महानगरपालिकेस एकूण ४ नग वॉटर कुलरची आवश्यकता आहे. त्याकामी रक्कम रुपये ४०,०००/- एवढा खर्च येणार आहे.

तरी चार नग वॉटर कुलर खरेदी करणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे. Voltas कंपनीचा एक वॉटर कुलर लावून घेऊन बाकी कुलर साठी डेमॉन्स्ट्रेशन साठी बोलाविण्यात यावे. व त्यानंतर पुढील काम करावे.

सुचक :- शरद पाटील Sharad. Patil

अनुमोदन :- शांतराज अग्रवाल [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर.

[signature]
अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/११/२००२

प्रकरण क्र. ३३ :- **दि. १४/११/२००२ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. 33 :-

दि. १४/११/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री. हरेश गावंड **अनुमोदन :-** श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

34

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१.११.२००२, ठराव क्र. 34 ची नक्कल प्रत

विषय 34 :- वय क्षमापित करुन निवृत्तीवेतन व इतर प्रदाने मंजूर करणे बाबत.

ठराव क्र. 34 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. सिताराम काशिनाथ पाटील, शिपाई हे दि. ३१.०५.२००२ [म.न] पासुन नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन, प्रथम ते राई-मुर्धे ग्रामपंचायतीमध्ये दि. १.११.१९८८ पासुन ठोक वेतनावर कार्यरत होते. सदर ग्रामपंचायतीचे दि. २३.१.१९९० पासुन तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिकेत विलीनीकरण करण्यांत आले नंतर त्यांना मा. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचेकडील मंजूर आदेशानुसार "शिपाई "पदाची वेतनश्रेणी दि. २३.१.१९९० पासुन लागु करण्यांत आली. त्यांना राई-मुर्धे ग्रामपयांती ने ठोक वेतनावर कामावर घेतले, त्यावेळेस त्यांचे वय ४६ वर्षे पूर्ण होते. परंतू तत्कालीन शासन नियमानुसार सेवा प्रवेशाचे निर्धारीत वय ३० वर्षे होते. त्यांचे जास्तीचे वय तत्कालीन ग्रामपंचायतीने क्षमापित करुन घेणे आवश्यक होते. परंतु तसे केलेले नाही. त्यामुळे त्यांना सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतनापासुन वंचित रहावे लागू नये म्हणून श्री. सिताराम काशिनाथ पाटील, [निवृत्त शिपाई] यांचे जास्तीचे वय क्षमापीत करणे बाबत प्रस्ताव मा. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे जवळ पाठविणेस मंजूरी देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्ती वेतन] नियम १९८२ चे कलम १२६ [६] [ए] व शासन परिपत्रक क्र. सेनिवे/१००१/१५०/सेवा-४, दि. १८.८.२००१ अन्वये तात्पुरते निवृत्ती वेतन व उपदान प्रदान करण्यास मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. महेंद्रसिंग चौहान

अनुमोदन :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/११/२००२, ठराव क्र.   ची
नक्कल प्रत.

विषय३५ :- वनविभागा अंतर्गत संतगाडगे बाबा शहर सफाई अभियान राबविणे बाबत.

ठराव :- ३५

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात संत गाडगेबाबा शहर सफाई अभियान वनविभागा अंतर्गत राबविण्याकरीता महानगरपालिका परिसरात रस्त्या वरील झाडांना रंगाचे पट्टे मारल्यास शहर सफाई अभियांना अंतर्गत दिसण्यास सुंदरता येईल तसेच महानगरपालिकेच्या शाळा, विभागीय कार्यालये व उद्याने यामध्ये मातीच्या कुंडीत शोभिवंत झाडे लावून कुंड्या इमारती व उद्यानाचे दर्शनी बाजूस ठेवल्यास त्यांची शोभा वाढण्यास मदत होईल करीता पुढील प्रमाणे आवश्यक साहित्य खरेदी करणेस येणा-या अंदाजे रु. ~~२०,०००~~ 50,000/- खर्चास आर्थिक मंजूरी देण्यांत येत असुन खर्च सुधारीत तरतुद केल्यावर त्यातून भागविण्यास मंजूरी देण्यांत येते.

१] लालरंग [गेरुवा] - ३०० किलो

२] सफेद रंग [चुना] - २५० किलो

३] पत्र्याच्या बादल्या - १२ नग

४] ब्रश - २४ नग

५] मातीच्या कुंड्या -२०० नग.

६] वनविभागात असलेली अवजारे यांना धार लावणे व पिंजरे दुरुस्ती इ.
[कायते, कुऱ्हाडी, पहारी, कैची व गवत कापण्याच्या मशिन]

सुचक :- श्री. नरेंद्रसिंग चौहान

अनुमोदन ::- श्री. हरेश गावड

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती दि. २१/११/२००२

प्रकरण क्र. ३६ :- ॲम्बेसिडर वाहन क्र.एमएच०४/एएन-५६९ या वाहनांस नविन एक्सट्रा ॲसेसरीज फिटींग करणेकामी दरपत्रकास मंजूरी देणे.

ठराव क्र. ३६

महानगरपालिकेने दि.२५/१०/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीसीनुसार ॲम्बेसिडर वाहन क्र.एमएन-०४/एएन-५६९ या वाहनांस नविन एक्स्ट्रा ॲसेसरीज फिटींग करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके सादर केली आहेत.

अ.क्र	कामाचा तपशिल	मे.साई ऑटो.गॅरेज	मे.संजय ऑटो गॅरेज	मे.इंडिया सर्विस स्टेशन
१	फिल्म	१२००/-	११००/-	११५०/-
२	सिट आणि साईड कव्हर	१२०००/-	१३५००/-	१४०००/-
३	२ नग सीट कव्हर	४०००/-	५०००/-	४५००/-
४	संपूर्ण मॅटीग सेट	१२००/-	११००/-	१२००/-
५	साईड बॉडी पट्टया	८००/-	१२००/-	१०२०/-
६	पायानिर सिस्टीम	११०००/-	११३००/-	१४६००/-
७	२ नग सुशोभित लाईट	१२००/-	१२००/-	१५००/-
८	४ नग मडगार्ड रबर	१८०/-	२२०/-	३००/-
९	मडगार्ड रबर लाईट	१८०/-	२४०/-	३००/-
१०	घडयाळ	६००/-	५००/-	४००/-
११	मंदिर	४००/-	४३०/-	३८०/-
१२	झेंडा	२००/-	२५०/-	३००/-
१३	पट्टया कॅप	७५०/-	६००/-	६००/-
१४	व्हील कॅप	८००/-	८००/-	९००/-
१५	परफयुम	४००/-	४००/-	४५०/-
१६	पाना सेट	४००/-	३२०/-	४००/-
१७	४ नग मडगार्ड पट्टी	९००/-	८००/-	१०००/-
१८	१ नग ॲंटीना	१२००/-	१२८०/-	१२५०/-
१९	२ नग हेडलाईट टोपी	२००/-	३००/-	२४०/-
२०	संपूर्ण ॲसेसिरिज फिटींग	३६००/-	४२००/-	३८००/-
२१	वायर बंडल लेबर चार्ज २ नग साईट आरसे	८००/-	१०००/-	९००/-
	एकूण	४२०१०/-	४५४४०/-	४९४४०/-

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे.साई ऑटो गॅरेज यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारुन काम करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- ज्योत्ना हसनाळे — अनुमोदन :- गुलशनदास म्हात्रे

Ghasnale 21/11/02

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती दि. २१/११/२००२

प्रकरण क्र.३८:- ॲम्बेसिडर वाहन क्र.एमएच०४/एएन-५७० या वाहनांस नविन एक्सट्रा ॲसेसरीज फिटींग करणेकामी दरपत्रकास मंजूरी देणे.

ठराव क्र. ३८

महानगरपालिकेने दि.२५/१०/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीसीनुसार ॲम्बेसिडर वाहन क्र.एमएन-०४/एएन-५७० या वाहनांस नविन एक्स्ट्रा ॲसेसरीज फिटींग करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके सादर केली आहेत.

अ.क्र	कामाचा तपशिल	मे.साई ऑटो.गॅरेज	मे.संजय ऑटो गॅरेज	मे.इंडिया सर्विस स्टेशन
१	फिल्म	१२००/-	११००/-	११५०/-
२	सिट आणि साईड कव्हर	१२०००/-	१३५००/-	१४०००/-
३	२ नग सीट कव्हर	४००६/-	५०००/-	४५००/-
४	संपूर्ण मॅटीग सेट	१२००/-	११००/-	१२००/-
५	साईड बॉडी पट्टया	८००/-	१२००/-	१०२०/-
६	पायानिर सिस्टीम	११०००/-	११३००/-	१४६००/-
७	२ नग सुशोभित लाईट	१२००/-	१२००/-	१५००/-
८	४ नग मडगार्ड रबर	१८०/-	२२०/-	३००/-
९	मडगार्ड रबर लाईट	१८०/-	२४०/-	३००/-
१०	घडयाळ	६००/-	५००/-	४००/-
११	मंदिर	४००/-	४३०/-	३८०/-
१२	झेंडा	२००/-	२५०/-	३००/-
१३	पट्टया कॅप	७५०/-	६००/-	६००/-
१४	व्हील कॅप	८००/-	८००/-	९००/-
१५	परफयुम	४००/-	४००/-	४५०/-
१६	पाना सेट	४००/-	३२०/-	४००/-
१७	४ नग मडगार्ड पट्टी	९००/-	८००/-	१०००/-
१८	१ नग ॲटीना	१२००/-	१२८०/-	१२५०/-
१९	२ नग हेडलाईट टोपी	२००/-	३००/-	२४०/-
२०	संपूर्ण ॲसेसिरिज फिटींग	३६००/-	४२००/-	३८००/-
२१	वायर बंडल लेबर चार्ज २ नग साईट आरसे	८००/-	१०००/-	९००/-
	एकूण	४२०१०/-	४५४४०/-	४९४४०/-

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे.साई ऑटो गॅरेज यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारुन काम करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. दिनेश नलावडे

अनुमोदन :- श्री. हरेश गावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती दि. २१/११/२००२

प्रकरण क्र.३८:- ॲम्बेसिडर वाहन क्र.एमएच०४/एएन-५७१ या वाहनांस नविन एक्सट्रा ॲसेसरीज फिटींग करणेकामी दरपत्रकास मंजूरी देणे.

ठराव क्र. ३८

महानगरपालिकेने दि.२५/११/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीसीनुसार ॲम्बेसिडर वाहन क्र.एमएन-०४/एएन-५७१ या वाहनांस नविन एक्स्ट्रा ॲसेसरीज फिटींग करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके सादर केली आहेत.

अ.क्र	कामाचा तपशिल	मे.साई ऑटो.गॅरेज	मे.संजय ऑटो गॅरेज	मे.इंडिया सर्विस स्टेशन
१	फिल्म	१२००/-	११००/-	११५०/-
२	२ नग सीट कव्हर	४०००/-	४५००/-	५०००/-
३	सिट आणि साईड कव्हर	१२०००/-	१४०००/-	१३५००/-
४	२ नग साईट आरसे	८००/-	९००/-	१०००/-
५	संपूर्ण मॅटींग सेट	१२००/-	१२००/-	११२०/-
६	साईड बॉडी पट्टया	८००/-	१०२०/-	१२००/-
७	पायानिर सिस्टीम	११०००/-	१४६००/-	११३००/-
८	२ नग सुशोभित लाईट	१२००/-	१५००/-	१२००/-
९	४ नग मडगार्ड रबर	१८०/-	३००/-	२२०/-
१०	मडगार्ड रबर लाईट	१८०/-	३००/-	२४०/-
११	घडयाळ	६००/-	४००/-	५००/-
१२	मंदिर	४००/-	३८०/-	४३०/-
१३	झेंडा	२००/-	३००/-	२५०/-
१४	पट्टया कॅप	७५०/-	६७०/-	६००/-
१५	व्हील कॅप	८००/-	९००/-	८००/-
१६	परफयुम	४००/-	४५०/-	४००/-
१७	पाना सेट	४००/-	४००/-	३२०/-
१८	४ नग मडगार्ड पट्टी	९००/-	१०००/-	८००/-
१९	१ नग ॲटीना पावर	१२००/-	१२५०/-	१२८०/-
२०	२ नग हेडलाईट टोपी	२००/-	२४०/-	३००/-
२१	लेबर	३६००/-	३८००/-	४२००/-
	एकूण	४२०१०/-	४५४४०/-	४९४४०/-

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे.साई ऑटो गॅरेज यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारुन काम करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- तुळशीदास म्हात्रे

अनुमोदन :- दिनेश नलावडे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा दि. २१/११/२००२ ठराव क्र. ची नक्कल प्रत

विषय :-३९. **वैद्यकिय खर्चाची प्रतिपर्ती प्रदान करणे बाबत.**

ठराव ३९

मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवरील कायम कर्मचारी यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ठातील कर्मचारी यांनी शासन निर्णय क्र. एम.ए.ज़ी./१०९९/प्र.क्र. ४०/आरोग्य-३/मंत्रालय-मुंबई:३२, दि. २९/७/१९९९ अंतर्गत तरतुदीनुसार व महाराष्ट्र राज्स सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुदीच्या अधीन राहून शासन विनिर्दिष्ट आकस्मीक उद्भवणाऱ्या आजारावर शासकिय / खाजगी रुग्णालयात औषधोपचारावरील केलेल्या वैद्यकीय खर्चाची बीले वेतन गटानुसार मुळ मासिक वेतन रु. ८४००/- पर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% वैद्यकिय खर्चाची प्रतिपर्ती परंतू किमान रु. २०,०००/- च्या कमाल मर्यादेत राहून देय आहे.

खालील कर्मचारी यांनी केलेल्या वैद्यकीय खर्चाची मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचे कडील प्रमाणपत्राचे अनुषंगाने शासन निर्णयास अधिन राहून वैद्यकिय खर्चाची प्रतिपर्ती करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

	कर्मचाऱ्याचे नांव व हुद्दा	वैद्यकीय उपचार घेणाऱ्याचे नांव व नाते	एकुण खर्च	९०% मर्यादेत प्रतिपुर्ती करावयाची रक्कम
१)	रामलिंगम नडेसन स.का	रेवती आर. नडेसन पत्नी	३५४३-००	३१८९-००
२)	श्री. अरुण विठोबा मेहेर लिपिक	स्वतः	१००८८-००	९०७९-००
३)	श्री. राजेश जयराम भोईर लिपिक	कु. अक्षय राजेश भोईर मुलगा	१८३९७-००	१६५५७-००
४)	श्री. क्लिफर्ड परेरा लिपिक	स्वतः	१२०४९-००	१०८४४-००
५)	श्री. किरण म. पाटील स.का.	श्रीम. गंगाबाई मदन पाटील आई	५२७४-००	४७४७-००
६)	श्री. रविंद्र दत्तात्रेय पाटील स.का.	स्वतः	२१८८४-००	१९६९६-००
७)	श्री. सुनिल ग. यादव लिपीक	स्वतः	४४९६-००	४०४६-००
८)	श्री. मणि काशी स.का.	स्वतः	६४४७-००	५८०२-००
९)	सौ. सुलभा वि. म्हात्रे लिपिक	कु. बेबी वि. म्हात्रे मुलगी	१७२१८-००	१५४९६-००

कर्मचाऱ्याचे नांव व हुद्दा	वैद्यकीय उपचार घेणाऱ्याचे नांव व नाते	एकूण खर्च	९०% मर्यादित प्रतिपुर्ती करावयाची रक्कम
१०) श्री. संजय ध. पाटील लिपिक	श्रीम. भानूमती ध. पाटील आई	९४७०-००	८५२३-००
११) श्री. सदानंद रघुनाथ भोईर शिपाई	श्री. रघुनाथ प. भोईर वडील	२६४८२-००	२००००-००
१२) श्री. रामचंद्र डी. आसोदेकर लिपीक	कु. जितेश रा. आसोदेकर मुलगा	२४९४-००	२२४५-००
	एकूण	१३७८४२-००	१२०२२४-००

सुचक :- श्री. याकुब कुरेशी

अनुमोदक :- श्री. तुळशीदास म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मा.स्थायी समिती सभा दि. २१/११/२००२ ठराव क्र. ४० ची नक्कल प्रत.

प्रकरण क्र. ४० :- श्री. कर्पन सुप्रायन सफाई कामगार यांना रुग्णता सेवानिवृत्ती देवून त्यांचे वारसास महानगरपालिका सेवेमध्ये नियुक्ती देणेबाबत.

ठराव क्र. ४०.

महानगरपालिका आस्थापनेवर श्री. कर्पन सुप्रायन हे कायम सफाई कामगार म्हणून दि.१/७/८९ पासून कार्यरत आहेत. ते माहे जून २००१ पासून पक्षघात या विकाराने आजारी असून पुढील सेवेत काम करण्यास अपात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र क्र. १००६२ दि.४/१०/२००२ नुसार मा. जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे यांनी दिलेले आहे.

सफाई कामगार यांची आर्थिक स्थिती सबळ नसल्यामुळे त्यांना नोकरीची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक असून शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२/नवि-६, मंत्रालय , मुंबई दि. ३०/६/१९९४ अंतर्गत लाड कमीटीच्या शिफारशी व शासन निर्णय क्र. मागास २२२००२/५१०/प्र.क्र.५३/२००२/नवि-६, मंत्रालय , मुंबई दि. १७/८/२००२ नुसार श्री.कर्पन सुप्रायन , सफाई कामगार यांना मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्राचे अधिन राहून रुग्णता सेवानिवृत्ती देण्यास मान्यता देण्यात येत असून त्यांनी नामनिर्देशित केलेला त्यांचा मुलगा श्री. सुब्रम्हण्यम कर्पन यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगार म्हणून रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतन श्रेणीवर नेमणूक करण्यांस मंजुरी देण्यात येते.

सूचक :- श्री. दिनेश नलावडे अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

४५

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.२१/११/२००२

प्रकरण क्र.४१ :- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सेवा केंद्रासाठी साहित्य खरेदी करणे.

ठराव क्र. ४१ .

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योनजे अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये चार सेवा केंद्र स्थापन करावयाची आहेत. त्यासाठी खालील प्रमाणे साहित्य खरेदी करावयाचे आहे.

१)	कपाट	--	४ नग
२)	टेबल	--	४ नग
३)	खुर्च्या	--	१६ नग

याप्रमाणे साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी अंदाजित रु.२४,०८०/- खर्च येणार आहे. तरी वरीलप्रमाणे सेवा केंद्र स्थापन करण्यास च त्या सेवा केंद्रासाठी साहित्य खरेदी करण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सूचक:- श्रीमती० ज्योत्स्ना हसनाळे   अनुमोदन :- (महेंद्र सिंग चौहाण)

Ghasemale
21/11/02

ठराव सर्वानूमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती दि.२१/११/२००२

प्रकरण क्र. ४२ :- सन २००१-२००२ मधील झालेल्या नवीन आकारणीवर सन २००२-२००३ च्या बिलात आकारलेले नोटीस फी व व्याजाची रक्कम रद्द करणेबाबत.

ठराव क्र. ४२ .

मिरा भाईदर महानगरपालिकेने (तात्कालीन नगरपालिका) सन २००१-२००२ मध्ये आकारणी न झालेले व नविन मिळकतीचे सर्वेक्षण करुन त्यावर नवीन आकारणी प्रस्तावीत केली होती. अशाप्रकारे नवीन आकारणी झालेल्या खातेदारांवर तत्कालीन नगरपालिका अधिनियमातील कलम ११९ नुसार नोटीसा बजावून संबधितांकडून हरकती मागवल्या होत्या. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या हरकतींवर मा.सहाय्यक संचालक तथा मुल्य निर्धारण अधिकारी सो, नगररचना ठाणे यांचे कडे दि.२९/१/२००२ व दि.३०/१/२००२ रोजी सुनावनी झाली तदनंतर दि.४/२/२००२ रोजी सुनावनी बाबत निर्णय देण्यात आला. सदर निर्णयातील सूचना व मार्गदर्शक तत्वानुसार आकारणीत दुरुस्त्या करुन उपरोक्त आकारणी कायम केली व त्यानंतर सदर मालमत्ता कराची आकारणी व मागणी रजिस्टर तयार करण्यात आली यासर्व कामाची व्याप्ती फार मोठया प्रमाणत होती. सदरची व्याप्ती व नियमीत कराची सुरु असलेली वसूली मोहीम पाहता नविन आकारणीतील खातेदारांना प्रत्यक्ष कराची मागणी बिले बजावण्याचे काम १५ मार्च २००२ नंतर सुरु झाले व सदर काम माहे.एप्रिल २००२ च्या पहिल्या आठवडयापर्यंत सुरु होते. सदर बजावलेल्या बिलांची नियमानुसार भरणा मुदत माहे.एप्रिल २००२ च्या अखेरीस संपत होती. सदर आकारणी झालेल्या मिळकतींवर प्रथमच आकारणी झाली असून ती वापर परवाना किंवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे अगोदरचे असेल या तत्वानुसार पूर्वलक्षी प्रभावाने केली असून ती आकारणी प्रथमच झाल्याने त्या खातेदारांना मालमत्ता कराची मागणी बिले हि प्रथमच बजावण्यात आली होती. सदरची आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने झाली असल्याने त्या खातेदारांना सन २००२-२००३ च्या मागणी बिलात त्या खातेदारांना थकबाकीदार समजून त्यांच्या थकित रक्कमेवर नोटीस फी व व्याजाची आकारणी करण्यात आली सदरची नोटीस फी व व्याजाची आकारणी चुकीने केलेली आहे.

सबब नव्याने कर आकारणी करतांना ज्या खातेदारंना नोटीस फी, व्याज आकारणी करणेंत आलेली आहे ती रद्द करण्यांत तसेच ज्या खातेदारांचनी अशी नोटीस व व्याजाची रक्कम वसुल केलेली आहे. ती परतावा करण्यास आजची सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री.महेद्रसिंग चौहान **अनुमोदक :- श्री.हरेश गावंड**

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१.११.२००२, ठराव क्र. 83 ची नक्कल प्रत.

विषय 83 :- अनुकंपा व वारसा पध्दतीने महानगरपालिका सेवेत नियुक्त्या देणे बाबत.

ठराव क्र. 83 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कायम सेवेतील मयत कर्मचारी [१] कै. श्रीमती मंदा रामराव वेताळ [लिपीक] [२] कै. श्री. मारुती बालू मेमाणे [शिपाई] [३] कै. श्री. विकास मधाळे [शिपाई] व [४] सेवानिवृत्त कर्मचारी श्री. सिताराम का. पाटील यांचे वारस अनुक्रमे [१] श्री. रामराव मारोती वेताळ [पती][२] श्री. लक्ष्मण बालू मेमाणे [भाऊ] [३] कल्पना विकास मधाळे[पत्नी] [४] श्री. कुंजन सितारराम पाटील [मुलगा] यांनी अनुकंपा तत्वावर /वारसा पध्दतीने महानगरपालिका सेवेमध्ये आवश्यक कागदपत्र सादर करुन कामावर घेणेस विनंती केली आहे.

शासन निर्णय क्र. मागास-२२२००२/५१०/प्र. क्र.-५२/२००२/नवि-६, दि. १७.८.२००२ अन्वये सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचा-याच्या वारसाची नियुक्ती करणे, सफाई कामकारांची व अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मयत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या वारसांना महानगरपालिका आस्थापनेवर शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदावर पुढील प्रमाणे नेमणुक करणेस मंजूरी देण्यांत येते.

१] श्री. रामराव मारोती वेताळ,	लिपीक	- ३०५०-७५-३९५०-८०-४५९०
२] श्री. लक्ष्मण बालू मेमाणे,	मजूर	- २५५०-५५-२६६०-६०-३२००
३] श्रीम. कल्पना विकास मधाळे,	शिपाई	- २५५०-५५-२६६०-६०-३२००
४] श्री. कुंजन सितारराम पाटील,	शिपाई	- २५५०-५५-२६६०-६०-३२००

वरील प्रमाणे नेमणुक करण्यास येणा-या खर्चास आर्थिक मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. अशोक पाटील - Pati

अनुमोदन :- श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर. Ghasanale २१/११/०२

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

प्रकरण क्र. ४४ :- **दि. २१/११/२००२ रोजीचे मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ४४ :-

दि. २१/११/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- लिओ कोलासो **अनुमोदन :-** शशिकांत शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२, ठराव क्र. ४५ ची नक्कल प्रत

विषय क्र. ४५ :- ठेका पध्दतीने एक सर्वेअर व स्टेनो टायपीस्ट याची नेमणूक करणेबाबत.

ठराव क्र. :- ४५.

महानगरपालिका आस्थापनेवर सर्व्हेअर हे एकच पद मंजूर आहे. त्यामुळे बांधकाम विभागा अंतर्गत विविध विकासाची कामे पार पाडली जात असतांना विकास कामाच्या प्रत्यक्ष जागेवर लाईन आऊट देणे, डी.पी.नुसार आखणी करणे, रस्ते व गटारे यांच्या लेव्हल घेणे इ. कामे करणेसाठी तांत्रिक कर्मचारी बांधकाम विभागात उपलब्ध नसल्याने दैनंदिन कामकाजात व्यत्यय येवून कामात विलंब होतो. करिता ठेका पध्दतीने जाहीर निविदा "दै.सागर" मध्ये दि. १/११/२००२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे दोनच अर्ज मुदतीत कार्यालयास प्राप्त आहेत.

अ. क्र.	नाव	शैक्षणिक पात्रता	अनुभव	अपेक्षीत वेतन
१.	श्री. मनोज के. सिन्हा सर्वेअर	बारावी उत्तीर्ण [विज्ञान शाखा] सर्वेअर डिप्लोमा	खाजगी संस्थेत ४ वर्ष कामाचा अनुभव	७,५००/-
२.	कु. सुजाता ज. येलवे [स्टेनो टायपीस्ट]	एफ्.वाय.बी कॉम मराठी टंकलेखन ४० श.प्र. मि. इंग्रजी टंकलेखन ५० श. प्र. मि. लघुलेखन १०० श. प्र. मि.	खाजगी संस्थेत १ वर्ष अनुभव	४,०००/-

तरी वरील प्रमाणे दोनच अर्ज अनुक्रमे सर्वेअर व स्टेनो टायपीस्ट या पदासाठी उपलब्ध असल्याने महानगरपालिकेच्या कामकाजाची निकड लक्षात घेता त्यांनाच प्रती महिना २६ दिवसांसाठी दररोज आठ तास याप्रमाणे सर्व्हेअर रु. ७५००/- व स्टेनो टायपिस्टचे रु. ४०००/- प्रति महिना या ठोक वेतनावर करारनामा करून पाच महिन्यासाठी नेमणुक करणेस व येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे

अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

प्रकरण क्र. ४६ : पल्स पोलीओ लसीकरण मोहिमेकामी अल्पोपहार पुरवठा करणेकामी दरपत्रकांस मंजुरी देणे.

ठराव क्र. : ४६

महानगरपालिकेने दि. २५/९/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहीर कोटेशन नोटीसीनुसार पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकामी अल्पोपहार पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल कॅटरर्स	शारदा कॅटरर्स	पुजा कॅटरर्स	श्रीजी कॅटरर्स	साई कॅटरर्स	रशीदखान कॅटरर्स	श्री ॐ अनिरुध्द कॅटरर्स
१	२	३	४	५	६	७	८
१.	पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत अल्पोपहार पुरवठा करणे.	रू. १४/- प्रति प्लेट (पुरी भाजी)	रू. १७.५०/- प्रति प्लेट इडली चटणी वेज बिर्याणी	रू. १२.५०/- प्रति प्लेट इडली चटणी रू. १६.५०/- वेज बिर्याणी	रू. १९/- प्रति प्लेट पुरीभाजी रू. १५.५०/- इडली चटणी रू. २४/- पावभाजी रू. २५/- वेज बिर्याणी	रू. १५/- प्रति प्लेट पुरीभाजी इडली चटणी पुलाव रू. ८/- बटाट वडा	रू. १७/- प्रति प्लेट इडली चटणी

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. शारदा कॅटरर्स** यांचे दरपत्रकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून दिनांक २९/९/२००२ च्या मोहिमेकरिता तसेच दि. १७/११/२००२ च्या मोहिमेसाठी त्याच दराने मे. शारदा कॅटरर्स यांचेकडुन अल्पोपहार घेतलेला आहे. तरी सदर कामी अवलोकन करून दरपत्रक स्विकारण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक तुळशीदास म्हात्रे

अनुमोदन शशिकांत शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

प्रकरण क्र. ४७ : पल्स पोलीओ लसीकरण मोहिमेअंतर्गत जीपगाड्या भाड्याने घेणे, कापडी बॅनर्स बनवुन घेणे व विविध प्रकारची छपाई करणे कामी निविदेस मंजुरी देणे.

ठराव क्र. : ४७

महानगरपालिकेने दि. ३०/१०/२००२ रोजी दैनिक आपला वार्ताहर व साप्ताहिक पुकार या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनूसार पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत जीपगाड्या भाड्याने पुरवठा करणे, कापडी बॅनर्स बनवुन पुरवठा करणे व विविध प्रकारची छपाई करून पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. राज टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स	मे.साईनाथ टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स	मे. विणा ट्रॅव्हल्स
१	२	३	४	५
१.	जीपगाड्या बंदबॉडी (आरमाडा टाटा सुमो, कमांडर व अन्य भाड्याने पुरवठा करणे) चालक, इंधन व इतर आवश्यक त्या प्रणालीसह सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० वा. पर्यंत	रू. ७५०/- प्र. नग प्र. दिवस	रू. ८००/- प्र. नग प्र. दिवस	रू. ६७३/- प्र.नग प्र. दिवस

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. विणा ट्रॅव्हल्स** यांचे निविदेतील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. ब्रह्मा आर्ट	मे. राज पब्लिसीटी	मे. ॲडव्हेंचर इंटरप्रायझेस
१.	सफेद कापडी बॅनर्स तयार करून त्यावर दिलेला मजकूर पेंटींग करून पुरवठा करणे.	रू. ४.५०/- प्रति चौ. फुट	रू. ५.७५/- प्रति चौ. फुट	रू. ४.२५/- प्रति. चौ. फुट

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. ॲडव्हेंचर इंटरप्रायजेस** यांचे निविदेतील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. अरूण प्रिंटर्स	मे. आतिष प्रिंटर्स	मे. श्वेता प्रिंटींग प्रेस
१	२	३	४	५
१.	मॉप-अप राऊंड टिमचा अहवाल सा. ११ १/२'' x ९''	रू. १५२०/- प्रति हजारी	रू. १४००/- प्रति हजारी	रू. १३६०/- प्रति हजारी
२.	लाभार्थी यादी सा. ८ १/२'' x १३ १/२''	रू. १०३०/- प्रति हजारी	रू. ११००/- प्रति हजारी	रू. ९६०/- प्रति हजारी
३.	टॅलीसीट सा. ११ १/२'' x ९''	रू. १२००/- प्रति हजारी	रू. १३००/- प्रति हजारी	रू. १०६०/- प्रति हजारी
४.	लसी व इतर साहित्याचा वाटप तक्ता सा. ८ १/२'' x १३ १/२''	रू. १७.५०/- प्रति हजारी	रू. १६२०/- प्रति हजारी	रू. १५४०/- प्रति हजारी
५.	x खुणा असलेल्या घरांचा तपशिल सा. ११ १/२'' x ९''	रू. १२३०/- प्रति हजारी	रू. ११९०/- प्रति हजारी	रू. १०६०/- प्रति हजारी
६.	बॅचेस सा. ३'' x ३''	रू. १४००/- प्रति हजारी	रू. १२५०/- प्रति हजारी	रू. १०९०/- प्रति हजारी

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. श्वेता प्रिंटींग प्रेस** यांचे निविदेतील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत.

तरी वरील प्रमाणे सर्वात कमी दराची दरपत्रके स्विकारून कामे करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक लिओ कोलासो   अनुमोदन शशीकांत शहा

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

प्रकरण क्र. ४८ : आरोग्य विभाग कचरा वाहतुक करणारे डंपर व टेम्पो वरील कचरा झाकणेसाठी ताडपत्री खरेदी करणेकामी दरपत्रकांस मंजुरी देणे.

ठराव क्र. : ४८

महानगरपालिकेने दि. १/११/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीसी नुसारआरोग्य विभागातील कचरा वाहतूक करणारे डंपर व टेम्पोवरील कचरा झाकणेसाठी ताडपत्री पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. जी ॲण्ड कंपनी	मे. गौरव ताडपत्रीवाला	मे. हेसल पॅकेजींग
१	२	३	४	५
१.	डंपरसाठी प्लॅस्टिक कोटेड ताडपत्री (सा. १६'' x १२''/ १८'' x १२'') २५० जाडी टेम्पोसाठी प्लॅस्टीक कोटेड ताडपत्री (सा. २०'' x ९''/ १८'' x १२'')(२०'x१६')	रू. १३००/- प्र. नग	रू. ११८८/- प्र.नग	रू. १२५०/- प्र.नग

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. गौरव ताडपत्रीवाला** यांचे दरपत्ररकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून ताडपत्री खरेदी करणेस व त्यामकी येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

मिलन म्हात्रे

सूचक मिलन म्हात्रे

अनुमोदन हरिश गायकवाड

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

प्रकरण क्र. ४९ : मा. महापौर, उपमहापौर, सभापती, सभागृह नेता विरोधी पक्ष नेता व आयुक्त यांचे वहानांसाठी स्टिल नेमप्लेट बनवुन घेणेकामी दरपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्र. : ४९

महानगरपालिकेने दि. ३०/१०/२००२ रोजी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिर कोटेशन नोटीसी नुसार मा. महापौर, उपमहापौर, सभापती, सभागृह नेता विरोधी पक्ष नेता व आयुक्त यांचे वहानांसाठी स्टिल नेमप्लेट बनवुन पुरवठा करणे कामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केली आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. मार्क ॲडव्हटायझिंग	मे. सालीड व्हिल ग्राफिक्स	मे. राज पब्लिसीटी
१	२	३	४	५
१.	स्टिल नेम प्लेट कोरीव काम करून नांव रंग भरणे १६ गेज प्लेट	रू. २६५०/- प्र. नग	रू. २८००/- प्र.नग	रू. २५००/- प्र.नग

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. राज पब्लिसीटी** यांचे दरपत्ररकातील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक स्विकारून आवश्यकतेनुसार स्टिल नेम प्लेट बनवुन घेणस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक शशिकांत शहा   अनुमोदन तुळशीदास म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्थायी समिती सभा दि.२८/११/२००२

प्रकरण क्र.५० :- आरोग्य विभागासाठी ठेका पध्दतीने वाहन चालक घेणेकामी आलेल्या निविदांना मंजूरी देणे.

ठराव क्र. ५०.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कचरा वाहतुक वाहने (डंपर/टेम्पो/इतर वाहने) चालविण्याकरिता ठेकापध्दतीने वाहनचालक घेण्याबाबतची जाहिर नोटीस दि.१.११.२००२ रोजीच्या दै.मुंबई सकाळ मध्ये प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार दि.१४.११.२००२ रोजी महापालिकेस खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१) मे.विना ट्रॅव्हल्स २) मे.श्री.साईगणेश कन्स्ट्रक्शन
३) मे.गुरुजी सॅनिटेशन ४) मे.गुडलक लेबर कॉन्ट्रॅक्टर

प्राप्त निविदा मा.आयुक्त सो., यांच्या दालनात उपस्थित निविदा धारकांसमोर दि.१६.११.२००२ रोजी उघडण्यात आल्या होत्या. निविदामध्ये प्रतिदिन प्रती वाहनचालक असा दर मागविण्यांत आला होता. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा धारकांनी आपले दर सादर केले आहेत.

१) मे.विना टॅव्हल्स -	रु. ३,३५०/-	(प्रतिदिन प्रति वाहनचालक)
२) मे.श्रीसाईगणेश कन्स्ट्रक्शन-	रु. १५३/-	(प्रतिदिन प्रति वाहनचालक)
३) मे.गुरुजी सॅनिटेश -	रु. १५०/-	(प्रतिदिन प्रति वाहनचालक)
४) मे.गुडलक लेबर कॉन्ट्रॅक्टर-	रु. १४७/-	(प्रतिदिन प्रति वाहनचालक)

वरील निविदांचे अवलोकन करता मे. विना ट्रॅव्हल्स यांनी दि.२१.११.२००२ रोजीच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे रु.३,३५०/- हा प्रती माह दरात विभाजन केले असता रु.११०.१३ हा प्रतिदिन प्रती वाहनचालक दर येतो. सदर दर हा मे.गुडलक लेबर कॉन्ट्रॅक्टर यांनी सादर केलेल्या प्रतिदिन प्रती वाहन चालक रु.१४७/- पेक्षा कमी आहे. तसेच चालू जिल्हा दर सूची पेक्षाही कमी आहे असे असतानाही महानगरपालिकेने दिलेल्या अटोशर्ती १ नुसार सदर निविदेसोबत मा.सहाय्यक कामगार आयुक्त, ठाणे यांचेकडे नोंदणीकृत केलेला दाखला जोडणे आवश्यक होते. मात्र मे. विना ट्रॅव्हल्स यांनी सदरचा दाखला निविदेसोबत जोडलेला नाही. मात्र मे. गुडलक लेबर कॉन्ट्रक्टर यांनी सादर केलेल्या दराचे वरील निविदाशी तुलना केली असता सर्वात कमी दराची निविदा असून त्यांनी मा.सहाय्यक कामगार आयुक्त ठाणे यांचेकडील नोंदणीकृत असण्याचा दाखला निविदेसोबत जोडला आहे. तरी मे.गुडलक लेबर कॅन्ट्रॅक्टर यांची निविदा स्विकारणेस हि सभा मंजूरी देत आहे. तसेच याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- हरेश गावंड अनुमोदन :- दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२८/११/२००२

प्रकरण क्र.५१ :- **कचरा वाहतुकी करीता नविन सहा टेम्पो खरेदी करणे बाबत.**

ठराव क्र : ५१

महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विभागामार्फत घरोघरी जाऊन थेट पद्धतीने कचरा गोळा करण्याचे काम सुरु आहे. सदर बाबत सध्या कार्यरत असलेले दहा डंपर घरोघरी जाऊन कचरा गोळा करुन वाहतुक करणेकरीता वापरात येत आहेत. कचरा वाहतुक डंपरची संख्या कमी असल्याने काही ठिकाणचा कचरा उचलणे करीता वेळ लागतो. तसेच डंपरचा आकार मोठा असल्याने लहान गल्ली मध्ये तसेच औद्योगिक वसाहतीतील कचरा वाहतुक करणे अडचणीचे होत. करीता मा. महासभेने दि. १९/१०/२००२ रोजी ठराव क्र. १८ नुसार सदर टेम्पो उत्पादक कंपनीकडून शासकीय दराने खरेदी करण्याचा ठराव पारीत केला आहे. त्यानुसार मे. व्यवस्थापक युनाईटेड मोटर्स मुंबई यांना दि. २४/१०/२००२ रोजी पत्र पाठवून त्यांचेकडून सदर गाड्यांच्या दराची मागणी केली होती. मनपा.ने केलेल्या मागणी नुसार मे. युनायटेड मोटार्स प्रा. लि. मुंबई यांनी दि. २९/१०/२००२ रोजी मनपा.स टेम्पो ४०७ खरेदीचे शासकीय दराचे दरपत्रक सादर केले आहे. त्यानुसार प्रती टेम्पो रु. ५,२१,६३३-१० इतका असून सहा टेम्पो खरेदी करीता रु. ३१,२९,७९८.६० इतका खर्च होणार आहे. या बाबत मे. युनायटेड मोटार्स यांनी दिलेल्या कोटेशनमध्ये नमूद केलेल्या शासकिय दरानूसार सहा टेम्पो खरेदी करणेंस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

सुचक : लिओ कोलासो

अनुमोदक : दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२८/११/२००२.

प्रकरण क्र. ५२ :- **संत गाडगेबाबा शहर स्वच्छता अभियान करीता ठेका पद्धतीने जादा कामगार मिळणे बाबत.**

ठराव क्र : ५२.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात साफसफाई कामाकरिता मनपा.चे २३० सफाई कामगार व ठेक्याचे ६७० मजूर आहे. सदरच्या सफाई कामगारांकडून शहर सफाईची कामे करुन घेण्यात येत आहेत. मागील दोन वर्षापासुन ठेका मजूरांच्या संख्येत कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही. मात्र शहरात फार मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होऊन इमारती, संकुलने, तयार होऊन नागरी वस्त्यांमध्ये वाढ होत असल्याने त्या भागात रस्ते सफाई, गटार सफाई, जंतुनाशक फवारणी, आदी नागरी सुविधांमध्ये वाढ होत आहे. नागरी वस्त्या व शहर सफाई करिता असलेल्या कामगारांचा विचार करता साफसफाईचे काम प्रभाविरीत्या करणेस अडचण निर्माण होत आहे. यातच महानगरपालिकेमार्फत सध्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिम रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे या कामाकरिता मोठ्या प्रमाणावर सफाई कामगार वर्ग करावे लागतात. परिणामी शहरातील दैनंदिन साफसफाईच्या कामावर याचा परिणाम होत आहे.

सध्या संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान 'महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येणार असून सदर अभियान यशस्वी करण्याकरिता शहर सफाईसाठी जादा मजूरांची आवश्यकता आहे. मनपा.चे रस्ते व गटाराचे प्रत्यक्षात आरोग्य विभागाने मोजमापे घेतली असून शहरातील रस्ते २३५६९१.६ मीटर लांब व गटारे ४००६७५.७२ मीटर लांब आहेत. केंद्र सरकारने बर्मन कमिटीची नेमणूक केली होती. सदर कमिटीने शहरातील दाट लोकसंख्या, कमी लोकसंख्या असलेल्या परिसरातील रस्ता व गटार सफाईची कामे करणेकामी विशिष्ट मापदंडानुसार कामगारांची नेमणूक करणेबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारशीच्या अनुषंगाने शहरातील रस्ते, गटारे यांची लांबी रुंदीचा विचार करता साफसफाईसाठी ९४३ व गटारे सफाईसाठी ८०१ सफाई कामगारांची आवश्यकता आहे. यामध्ये जंतुनाशक फवारणी व कचरा वाहतुक करणे, मुकादम तसेच रखवालदार आदींचा कोठेही उल्लेख नाही.

बर्मन कमिटीच्या शिफारशीनुसार आरोग्य विभागातील रस्ते सफाई व गटार सफाई कामे करणेसाठी १७४४ कामगारांची आवश्यकता आहे. सध्या आरोग्य विभागाकडे ठेका ६७० व मनपा.चे २३० असे एकुण ९०० सफाई कामगार उपलब्ध आहेत. साफसफाई करिता अद्याप ८४४ सफाई कामगारांची आवश्यकता आहे. तरी ३०० एवढे मजूर ठेका पद्धतीने सध्या कार्यरत असलेल्या मजूर पुरवठा ठेकेदाराकडून त्याच मंजूर दरात उपलब्ध करुन घेण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

सुचक : महेंद्रसिंह चोहान

अनुमोदक : तुळशीदास म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सचिव
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२८/११/२००२

प्रकरण क्र.५३ :- **आरोग्य विभागास डंपींग ग्राऊंडवरील कचरा सपाटीकरण करणे करिता भाड्याने जे.सी.बी./ पोकलन मशीन उपलब्ध करणे बाबत.**

ठराव क्रं : ५३

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. १४ नाव्हे. २००२ पासून **"संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान"** राबविण्यात येणार आहे. या अभियान दरम्यान मोठ्या प्रमाणावर साफसफाई विषयक तसेच कचरा सपाटीकरण आदी कामे करावी लागणार आहे. करीता या कामी जे.सी.बी./पोकलन मशीन उपलब्ध करावी लागणार आहे.

महानगरपालिकेच्या अतिक्रमण नियंत्रक विभागाने शहरातील अतिक्रमणे काढयासाठी दि. १८/४/२००२ रोजी जे.सी.बी./पोकलन मशीनच्या निविदा मागविल्या होत्या. सदर निविदास दि. १९/६/२००२ रोजी प्रशासकिय ठराव क्र. ११६ अन्वये मंजुरी दिली आहे. मनपा.च्या डंपींग ग्राऊंडवरील कचरा सपाटीकरण करणेकामी जे.सी.बी./पोकलन मशीन भाड्याने घेण्याचा प्रस्ताव आगामी महासभेपुढे ठेवल्यास कामाच्या निविदा मागविणे, निविदास मंजूरी घेणे, कार्यादेश देणे, आदी कामास बराच कालावधी लागणार आहे. करीता अतिक्रमण नियंत्रण विभागात जे.सी.बी./ पोकलन मशीन भाड्याने घेण्याकामी दर मंजूर केलेले आहेत. त्याच मंजूर दारात आरोग्य विभागा करिता जे.सी.बी./पोकलन मशीन उपलब्ध करणे योग्य होईल.

अतिक्रमण नियंत्रण विभागात सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराकडून त्याच मंजूर दरात आरोग्य विभागाकरिता जे.सी.बी./पोकलन मशीन उपलब्ध करुन देणेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

सुचक : चंद्रकांत वैती   अनुमोदक : हरेश गांवड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक २८/११/२००२

प्रकरण क्रमांक ५४ :- बांधकाम विभागाकरीता ठेका पद्धतीने "कनिष्ठ अभियंता " पुरविणेबाबत.

ठराव क्रमांक : ५४.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे ७९.४० चौ. कि.मीटर असून क्षेत्र उत्तन ते काजूपाडा व बर्लोचा पुल ते दहीसर चेक नाका असा पसरलेला आहे. महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे हि बांधकाम विभागामार्फत पार पाडली जातात. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर बांधकाम विभागाकरीता अत्यंत अपुरा कर्मचारी वर्ग आहे. सध्या एक कर्मचारी अभियंता व दोन कनिष्ठ अभियंता एवढाच कायम तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे. बांधकाम विभागामार्फत खालील प्रमाणे कामे पार पाडण्यांत येतात.

१] मा. नगरसेवक, लोकप्रतिनिधी, नागरीकांच्या आलेल्या पत्रानुसार प्रत्यक्ष जागेवर पहाणी करून अहवाल तयार करणे, कामांची अंदाजपत्रक व नकाशे तयार करणे, त्यास मान्यता घेऊन निविदा, कार्यादेश बाबतची कार्यवाही करणे, कामांवर देखरेख ठेवणे, कामाची देयके तयार करणे, कामांच्या नमुन्यामध्ये नोंदी घेणे, कामाबाबत पत्र व्यवहार करणे.

२] स्ट्रीट लाईट विषयक प्रस्तावाची पहाणी करून अहवाल व प्रस्ताव करून, मा. राजेपुढे सादर करून बी.एस.ई.एस. कडे पाठविणे, पाठपुरावा करणे,

३] शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे, पत्र व्यवहार कार्यवाही करणे.

४] महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीची पाहणी करून अहवाल देणे, नोटीसा देणे, इमारती पाडणेबाबतची कार्यवाही करणे.

५] बी.एस.ई.एस., एम.टी.एन.एल. व इतर एजन्सीमार्फत रस्ते खोदण्यांत येतात. त्यांना परवानगी देणे, नियंत्रण ठेवणे, त्याची देयके तयार करून रक्कम वसुली करणे.

६] स्मशानभूमी, उद्योग, सार्वजनिक इमारती, शौचालये, मैदाने, यांची दुरुस्ती कामे करणे, तसेच रस्ते, गटारे, यांची दुरुस्ती कामे पार पाडणे.

७] जाहीरात विभागातील विविध कामे करणे.

तसेच शहरात विविध भागात फुटपाथ बांधणे, काशिमीरा रोड रुंदीकरण, उड्डणपुल ही कामे प्रगतीपथवर असून शहरात विविध चौकात वाहतूक बेटे बांधणे, खाजगी संस्थेकडून स्मशानभुमी विकासीत करणे, शहरात ट्राफिक सिग्नल बसविणे ही कामे सुदधा बांधकाम विभागामार्फत पार पाडयांत येतात. बांधकाम विभागाकरीता तीन उपअभियंता व एकुण १५ कनिष्ठ अभियंतांची आवश्यकता असून कायम कर्मचारी वर्ग नसल्याने यापूर्वी मा. स्थायी समिती सभा दिनांक २०.०२.२००२ ठराव क्र. २३५ [३] अन्वये एकुण सहा कनिष्ठ अभियंते मे. मीना कॅन्स्लॅटन्सी सव्हिसेस यांचेकडुन ठेका पदधतीने पुरविण्यांत आलेले होते. सदर पुरवठा एजन्सीस मा. स्थायी समिती सभा दिनांक २७.१२.२००१ ठराव क्र. २८२ [१] अन्वये दिनांक ३१.१२.२००२ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. सध्या काशिमीरा रोड रुंदीकरण, उड्डाणपुल ची कामे जोराने सुरु आहेत. तसेच विविध भागात कामे सुरु असून अपु-या कर्मचारी वर्गामुळे कामावर नियंत्रण ठेवणे व मुदतीच कामे पार पाडणे खुपच जिकरीचे होत आहे. त्या करीता कायम कर्मचारी वर्ग येईपर्यंत ठेका पदधतीने खालील प्रमाणे कनिष्ठ अभियंता पुरविणे आवश्यकता आहे.

कनिष्ठ अभियंता [स्थापत्य]	१२
कनिष्ठ अभियंता [विद्युत]	०१

महानगरपालिकेने यापूर्वी मे. मीना कॅन्सलॅसी सर्व्हिसेस यांना कनिष्ठ अभियंता पुरवठा करण्याचे काम देण्यात आलेले आहे. तरी कायम कर्मचारी वर्ग येथे पर्यंत मे. मीना कॅन्सलॅसी सव्हिसेस यांना वरील प्रमाणे १३ [तेरा]

[जुने तहा न- नविन तात] कनिष्ठ अभियंता पुरविणे कामी एक वर्ष [दिनांक ३१.१२.२००३] पर्यंत मुदत वाढ देण्यात येते आहे. तसेच त्याचे देयक प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री लिओ कोलासो   अनुमोदन :- श्री याकूब कुरेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. /११/२००२

प्रकरण क्रमांक ५५ :- उड्डाण पुलाच्या बांधकामी लवादाच्या कामकाजाच्या खर्चास मंजुरी मिळणे बाबत.

ठराव क्र. ५५ :

मिरा भाईंदर शहरातील उड्डाणपुलाचे बांधकामाबाबत लवाद नेमण्यात आला असून सदर लवादामध्ये तीन अधिका-यांची नेमणुक करण्यात अ आलेली आहे. सदर अधिका-यांनी दि. १६/११/२००२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये लवादाचे कामकाज चालविणेसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षिलेली आहे.

लवाद फी -

	कामाचे स्वरूप		अंदाजे खर्च
१]	कागदपत्राची छाननी करणे	-	रू. १५०००/-
२]	बैठकीचा भत्ता [प्रतिदीन]	-	रू. ५०००/-
३]	निकाल देणे	-	रू. १५०००/-
४]	वाहतूक भत्ता	-	रू. ७.००/- प्रति कि.मी.
५]	पत्रव्यवहार	-	रू. २०००/-
६]	कागदपत्राच्या छायांकित प्रति काढणे	-	रू. २०००/-
७]	स्टेशनरी, फोटोग्राफी	-	रू. १५०००/-
८]	स्टेनोग्राफर, टायपिंग व कॉम्प्युटर	-	रू. १५०००/-
९]	इतर खर्च	-	रू. ५०००/-

वरील प्रमाणे खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :- श्री हरेश गावंड

अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

प्रकरण क्र. ५६ :-   महापौर चषक स्पर्धा आयोजित करणेबाबत.

ठराव क्र. ५६ **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका नव्याने स्थापन झाली असल्याने मिरा भाईंदर क्षेत्रातील स्थानिक खेळाडूंचे महानगरपालिका कर्मचारी खेळाडूंचे व इतर महाराष्ट्रातील महानगरपालिकेचे अधिकारी, पदाधिकारी यांचेशी संबंध रुढ होणे तसेच त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे करिता क्रिडा स्पर्धा एकच प्रभावी माध्यम असून मिरा भाईंदर महानगरपालिका ही नव्याने स्थापन झालेली असुन राज्यातील इतर महानगरपालिकेप्रमाणे आपल्या ही महानगरपालिकेत महापौर चषक स्पर्धेचे आयोजन करणे आवश्यक आहे. यावर्षी प्रथमच क्रिडा स्पर्धेचे आयोजन करावयाचे असून त्यामध्ये शुटींग बॉल, कब्बडी व क्रिकेट असे ३ क्रिडा प्रकार येऊन त्यामध्ये शुटींग बॉल व कब्बडी या खेळासाठी संपूर्ण राज्यातील महानगरपालिकेच्या व इतर नामांकित संघाना निमंत्रण द्यावे व क्रिकेटसाठी फक्त महानगरपालिका हद्दीतील संघांना निमंत्रण द्यावे व सदर स्पर्धेच्या आयोजनाकरिता अंदाजे रु. ७ लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. सध्या अंदाजपत्रकात कला क्रिडा या खात्यावर तरतूद नाही. परंतु २००२-०३ सालाचे सुधारित अंदाजपत्रक करावयाचे असून त्यावेळी तरतुद करणेंत यावी व क्रिडास्पर्धा आयोजित केल्यानंतर येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी.   **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२

अभिनंदन ठराव क्र. ५७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शुटींग बॉल संघाने ठाणे येथे दि. रोजी झालेल्या ठाणे जिल्हा स्तरीय शुटींग बॉल निवड चाचणी या स्पर्धेमध्ये भाग घेतलेला होता. तसेच इतर नामांकित १८ संघानी भाग घेतला होता यामध्ये आपल्या महानगरपालिकेच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन प्रथम क्रमांक पटकविण्यात यश प्राप्त केले. त्यांनी केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नांव खेळात लौकीक केलेले आहे. याबद्दल आपल्या संघातील खेळाडूंचे अभिनंदन करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. दिनेश द. नलावडे. **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

६५

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा.स्थायी समिती सभा दि.५/१२/२००२

प्रकरण :- ५६० महानगरपालिका सभागृह वार्ताहर कक्षा करीता खुर्च्या खरेदी करणेकामी दरपत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्रं :- ५८

महानगरपालिकेने दि.१२/११/२००२ रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिका सभागृह वार्ताहर कक्षा करिता खुर्च्या पुरवठा करणेकामी खालील प्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

अ.क्र.	तपशिल	विपूल इंटर प्राईजेस	मुरवाडकर बिझनेस इंड.	रिया इंटर प्रायझेस
१.	२.	३.	४.	५.
१.	लोखंडी ॲगल फायबर कव्हर साईज उंची ३२ रुंदी २१ लांबी १५ टॉप साईज लाकडी फ्रेम लांबी १९ ८ १/२	रु.७१०/- प्रति नग	रु.६९५/- प्रति नग	रु.६४५/- प्रति नग

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **मे. रिया इंटरप्राईजेस** यांचे निविदेतील दर सर्वात कमी व बाजार भावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारुन खुर्च्या खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे

सुचक :- श्री लिओ कोलासो

अनुमोदन - श्री शशिकांत शहा

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा दि.५/१२/२००२

प्रकरण क्रं. :- ५९ महानगरपालिका नगरवाचनालय,विभागीय वाचनालय व मुख्य कार्यालय येथिलजुनी वृत्तपत्रांची रद्दी विक्री करणेकामी अवलोकन करुन मंजूरी देणे.

ठराव क्र. :- ५८

महानगरपालिका नगरवाचनालय,नगरभवन,विभागीय वाचनालय नवघर व मुख्य कार्यालयामध्ये दररोज वृत्तपत्रे येतात. सदरची जुनी वृत्तपत्रांची रद्दी नगरभवन येथे एकत्रित करुन ठेवण्यांत येते. सदरची रद्दी एक वर्षापासून साठवून ठेवलेली होती. सदरची रद्दी ठेवण्यासाठी जागा अपूरी पडत असल्याने ती विक्री करणे आवश्यक होते. त्यामुळे सदरची रद्दी विक्री करणेकामी दि.३/१०/२००२ रोजी नोटोस बोर्डावर जाहिर कोटेशन नोटोस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार आलेल्या दरपत्रकातील दर कमी असल्याने दि.२१/१०/२००२ रोजी फेर कोटेशन नोटोस प्रसिदध करुन आलेल्या दरपत्रकातील सर्वात जास्त दराचे (रु.३:०० प्र.किलो) **मे.शांती पेपर मार्ट** यांचे दरपत्रक स्विकारुन दि.१/११/२००२ रोजी ८५८ किलो व दि.७/११/२००२ रोजी ९२ किलो अशी एकूण ९५० किलो रद्दी उचलली असून अनुक्रमे रु.२५७४/- व रु.२७६/- अशी एकुण रु.२८५०/- (अक्षरी रुपये दोन हजार आठशे पन्नास मात्र) एवढी रक्कम महानगरपालिका फंडात जमा केली आहे.

तरी सदरकामी अवलोकन करुन ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री लिओ कालासो

अनुमोदन :- श्री शशिकांत शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.५/१२/२००२

प्रकरण क्रं. :- ५९ वर्सोवा गावठण येथिल महानगरपालिकेची शौचालय देखभाल दुरुस्ती करीता **श्री.शारदा मंदिर ट्रस्ट** यांना देणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रं. :- ५९ ६०

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत वर्सोवा गावठण येथे महानगरपालिकेची पाच गाळयाची शौचालय आहे. सदरची शौचालय यापुढे देखभाल दुरुस्ती करणे कामी मिळणे करीता **श्री.शारदा मंदीर ट्रस्ट** यांनी दि.३०/१०/२००२ अन्वये महानगरपालिकेकडे मागणी केलेली आहे. सदरचे शौचालय देखभाल व दुरुस्ती सदरची ट्रस्ट करणार असून वापर करणा-याकडून काहीही रक्कम घेणार नाही. तरी सदर ट्रस्टला करारनामा करुन शौचालय देखभाल व दुरुस्ती करणे कामी देणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री लिओ कोलासो अनुमोदन :- श्री शशिकांत शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. १२।१२।२००२

विषय :- आयुक्त श्री.शिवमुर्ती नाईक यांना त्यांचे उत्कृष्ठ कामगिरी बाबत
२ जादा वेतनवाढी देण्याबाबत..

ठराव क्र. ६१

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन होते वेळी पासून श्री.शिवमुर्ती नाईक यांची शासनाने सदर महानगरपालिकेवर प्रथमतः प्रभारी आयुक्त म्हणून नेमणूक केली होती. तद्नंतर त्यांना गति पध्दतीने शासनाने आयुक्त पदाचा दर्जा दिला होता. तथापी श्री.शिवमुर्ती नाईक हयांची दि.२/१२/२००२ रोजी शासनाने अकस्मात बदली केल्यामुळे हया सभेस अतिशय दुःख होत आहे. कारण श्री.शिवमुर्ती नाईक हे आयुक्त म्हणून अधिकारावर येण्यापूर्वी अस्तंगत नगरपालिकेचे मुख्याधिकारी होते. तेव्हा पासून तर त्यांची बदली होईपर्यंतच्या काळात त्यांनी मिरा भाईंदर क्षेत्रासाठी उत्कृष्ठ काम केल्यामुळे त्यांचे कार्यकाळात खालील महत्वाची विकासाची, उत्पन्न वाढीची व नागरी सुविधांची कामे झाल्याचे तुलनात्मक दृष्टया दिसत आहे.

सन १९८५ ते २००१ ची कारकीर्द	**श्री.शिवमुर्ती नाईक यांची दि.१३ जुलै २००२ ते १ डिसेंबर २००२ पर्यंतची कारकीर्द.**
१) खाजगी टँकरने पाणी पुरवठा	१) पूर्णपणे खाजगी टँकर बंद करुन नळाद्वारे मुबलक पाणी पुरवठा सुरु केले.
२) सन १९९३ ते २००१ पर्यंत नळ कनेक्शन देणे बंद.	२) नळ कनेक्शन देणे सुरु केले अंदाजे रुपये ३०,०००/- प्रमाणे प्रत्येकी कनेक्शन चार्जेस सुरु केले (अंदाजे ४८०० अर्ज आले आहेत.)
३) रस्त्यावरील दुकानाचे आरसीसी व इतर सुमारे ३५०० अतिक्रमणे होती (सरासरी ३०.० रस्ते होते)	३) ३५०० अतिक्रमणे दूर करुन ६० फुट व त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्त्याचे प्रशस्त रस्ते फुटपाथसह तयार केले.
४) अनधिकृत नळ कनेक्शन (सन १९९३ ते २००१ पर्यंत)	४) अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढून प्रत्येकी अंदाजे रु.६०,०००/- रक्कम दंड करुन व पाणीपट्टी असे एकूण रु.८.०० कोटो वसूल केले रु. २.०० कोटो करणे. बाकी व सदर कनेक्शनची पाणीपट्टीत भर पडली (महाराष्ट्रातील पहिली नगरपालिका)

५) गेल्या ७ ते ८ वर्षात आकारणी न केलेल्या मिळकती	५) सुमारे २९,००० मिळकतीचा त्याच कर्मचा-याकडून शोध घेऊन आकारणी केली त्यामुळे कायम स्वरुपी रु.१२.४३ कोटी एवढया रकमेची उत्पन्नात वाढ झाली.
६) बंद पडलेल्या उड्डाण पूलाचे काम	६) युध्द पातळीवर सुरु केले.
७) अनेक मजली अनधिकृत बांधकामे उभी राहिली.	७) जवळ जवळ ९० टक्के पूर्णपणे अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणले १० टक्के अतिक्रमण तोडणे शिल्लक आहेत.
८) घरोघर जाऊन वसूली करीत होते. तरी ही ४० ते ४५ टक्के वसूली होत होती (थकबाकी १५.०० कोटी चालू मागणी १५.०० कोटी नविन वाढीव सोडून)	८) घरोघर जाऊन वसूली करण्याची पध्दत बंद केली. नियमाप्रामणे कडक कारवाई करणे नळ कनेक्शन तोडणे अशा कारवाई मुळे ८० टक्के वसूली केली .(मनपाच्या इतिहासातील हा वसुलीचा उच्चांक आहे.)
९) आरोग्य	९) गावातील संपूर्ण कचराकुंडया काढून टाकून घरोघर कचरा गोळा करणे २२ ऑगस्ट २००२ पासून सुरु केले. (महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका)
१०) रु.२९,०००/- वार्षिक जाहिरातीचे कर मिळात होता.	१०) जाहिरातीचे टेंडर काढून रु.२८.०० लक्ष वार्षिक उत्पन्नात वाढ केली. दुकानावरील बोर्ड जाहिरात रु.१.५० कोटीनी उत्पन्न वाढविले.
११) अ) मिळकत हस्तांतरण फी रु.५/- होती.	११) अ) मिळकत हस्तांतरण फी रु.५००/- केली होती.
ब) ना हरकत दाखला फी रु.१००/- होती.	ब) नाहरकत दाखला फी रु.३०००/- ते १०,०००/- (व्यवसायिक)केली.
क) कनेक्शन ट्रान्सफर फी रु.१००/- होती.	क) कनेक्शन ट्रान्सफर फी रु.२५००/- केली वरील उत्पन्न वाढीमुळे उत्पन्नात सुमारे ८०.०० लक्ष ते १.०० कोटो पर्यंत भर पडणार आहे.

टीप :-

१) महानगरपालिकेच्या मुदत ठेवी न मोडता सर्व खर्च काटकसरीने करुन ८.०० कोटो कर्ज फेडले.

~~२) झोपडपट्टी फोटोपास १.१.९५ पूर्वीचे तयार असून पुर्नवसन बीन पैशाने करण्याची योजना होती.~~

३) स्वखर्चाने वाहतूक बेट बांधून देखभाल व दुरुस्तीसह २० ठिकाणी कार्यादेश देऊन कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे निधीची सुमारे ६०.०० लक्ष पर्यंत बचत होणार आहे.

४) दवाखाना सुध्दा बांधण्याचे असून गेले पाच महिन्यापूर्वी अंदाजपत्रक व आराखडे तयार केले असून जागा ताब्यात मिळताच महासभेपुढे ठेवण्याची योजना होती.

५) बांधा वापरा व हस्तांतर करा हया तत्वावर सुलभ शौचालयाची कामे सुरु केली.

६) खाजगी संस्थेकडून मिरा रोड येथील स्मशानभूमी, दफनभूमी, ब्यूरल ग्राऊण्ड बांधून घेण्याचे काम सुरु केल्याने महानगरपालिकेची सुमारे १.५० कोटो रकमेची बचत झाली.

~~७) हातगाडयांना लायसन्स देऊन पुर्नवसनाचे काम करण्यांस सुरुवात केली आहे.~~

८) उत्तन पाणी पुरवठा योजना ५० द.ल.लि. शिल्लक रकमेतून करण्याचे प्रस्तावित केले.

९) आज पर्यंतच्या इतिहासात प्रथमच महसूल अधिका-याशिवाय संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली.

नगरपालिकेचा तुटपुंजा कर्मचारी वर्ग असतानाही आपल्या बुध्दी चार्तुयाने नागरिकांचे हिताचा विचार डोळयासमोर ठेऊन उत्पन्न वाढविणे, नागरी सुविधा चांगल्याप्रकारे पुरविणे व काटकसर करुन विकास कामे गेली अनेक वर्षे जी झाली नव्हती ती दिड वर्षाच्या कालावधीत हाती घेऊन पूर्ण केली. महानगरपालिकेत त्यांनी उत्कृष्ट कार्य केल्यामुळे शासनातील कर्तबगार व प्रगतशील विचारांचे अधिकारी वर्गाचा न्यायोचित आदर होणे हया सभागृहास आवश्यक वाटत असल्याने सदर सभागृह श्री.शिवमुर्ती नाईक यांचे कामाचा गौरवपूर्व उल्लेख करीत आहे व त्यासाठी त्यांना २ वेतनवाढी देण्याची शिफारस करीत आहे. सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजूरीसाठी ठेवण्यात यावा.

सुचक :- श्री.दिनेश नलावडे Nalawade अनुमोदन :- श्री. लिओ इ.कोलासो

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १२/१२/२००२

प्रकरण क्र. ६० :- **दि. २८/११/२००२ व दि. ०५/१२/२००२ रोजीचे मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ६२ :-

दि. २८/११/२००२ व दि. ०५/१२/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे **अनुमोदन :-** श्री. लिओ कोलासो

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.१२/१२/२००२

प्रकरण क्र. ६१ :- मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमधील लिफ्ट (दोन) वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामाबाबत.

संदर्भ :- मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांचेकडील दि.९/११/२००२ चे पत्र.

ठराव क्र. ६३

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीत ओटोस कंपनीच्या दोन लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. सदर लिफ्ट वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करिता मे.ओटोस इलेव्हेटर कंपनी (इंडिया लि.) यांना देण्यात आलेल्या होत्या. सदर कराराची मुदत ही दि.३०/११/२००२ रोजी संपलेली असून मे.ओटीस इलेव्हेटर यांनी दि.९/११/२००२ च्या पत्रान्वये पुढील वर्षाकरिता लिफ्ट देखभाल व दुरुस्तीची मागणी केलेली आहे. सदर लिफ्ट (दोन) रु.५०,०००/- (दोन लिफ्ट प्रति वर्ष) या दराने मे. ओटोस इलेव्हेटर यांना देण्यांत आलेल्या होत्या. १ डिसेंबर २००२ ते ३० नोव्हेंबर २००३ या कालावधीकरिता त्यांनी रु.५३,७५०/- एवढया रकमेची मागणी केलेली असून सदर खर्चात स्वतःच्या सामान मटेरियल सहीत सदर कंपनी २४ तास सेवा देणार आहे. महानगरपालिकेच्या लिफ्ट या सदर कंपनीनेच बसविलेल्या असल्याने व सदर कंपनी स्वतः उत्पादन कंपनी असल्याने सदर मे. ओटीस इलेव्हेंटर कंपनी (इंडिया) लि. यांनी लिफ्ट वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे कामी देणे महानगरपालिकेचे हिताचे राहिल.

महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ पर्यंत असल्याने १ डिसेंबर ते ३१ मार्च २००२ पर्यंत व पुढील वर्षाकरिता मे ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांना काम देण्यास व सदर कालावधीत

१ डिसेंबर ते ३१ मार्च २००२	रु.१७,९१७/-
१ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३	रु.५३,७५०/-
	रु.७१,६६७/-

होणा-या रु.७१,६६७/- रकमेच्या प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक :- श्री. रमेश गावंड　　　अनुमोदन : श्री. दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.१२/१२/२००२

प्रकरण क्र. ६२ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील १) चेणा काजूपाडा येथील स्ट्रीट लाईट, २) मुख्य कार्यालय इमारत वातानुकूलित यंत्रे, ३) सभागृहातील कॉन्फरन्स माईक सिस्टीम वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणे.

ठराव क्र. ६४

१) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत चेणा काजूपाडा येथे बी.एस.इ.एस कं.मार्फत विजपुरवठा करण्यात येत नसून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत वीजपुरवठा करण्यात येत आहे. सदर चेना काजूपाडा, पाटोल पाडा, बेलकरी पाडा, भागात महानगरपालिकेने स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविलेले असून त्याची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत केली जाते. सदर भागात वन्य प्राण्याची ये-जा असल्याने स्ट्रीट लाईट नियमित सुरु असणे गरजेचे आहे. महानगरपालिका सदर स्ट्रीट लाईट वार्षिक मुदतीने निविदा मागवून वार्षिक ठेका देत असल्याने सर्व दुरुस्ती कामे त्वरित वेळेवर पार पाडता येतात. सदर कामी वार्षिक रुपये ३.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. (एकूण ७५ पोल)

२) महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीत सभागृह ॲन्टोकॅबीन तसेच दुसऱ्या माळयावर, चौथ्या मजल्यावर वातानुकूलित यंत्रे बसविण्यात आलेली आहेत. एकुण ३३ वातानुकूलित यंत्रे असून जुन्या कार्यालयातील दोन यंत्रे बसविण्यात आलेली आहेत. सदरची वातानुकूलित यंत्रे महानगरपालिका वार्षिक मुदतीच्या निविदा मागवून देत असल्याने दुरुस्ती कामे तातडीने व वेळेवर पूर्ण करणे शक्य होतात. सदर कामी वार्षिक रुपये ३.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) मुख्य कार्यालय इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर सभागृहात अत्याधुनिक माईक कॉन्फरन्स सिस्टिम असून सदर सिस्टिम मा.महासभेवेळी सुरु करण्यात येते. सदर माईक यंत्रणा सुस्थितीत ठेवणे आवश्यक असल्याने व महासभेवेळी सिस्टीम चालवितेकामी टेक्निशियनची आवश्यकता असल्याने महानगरपालिका सदरचे काम वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्तीकरिता देत असते. सदर माईकची उंची वाढविणेचे सुध्दा आवश्यक असल्याने सदर कामी रुपये २.५० लक्ष एवढा वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे तिन्ही कामाकरिता वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास (३१ मार्च २००४ पर्यंत) व अपेक्षित खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री. याकूब कुरेशी

अनुमोदन :- श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि.:- १२/१२/२००२

प्रकरण क्र. ६३

ठेके पद्धतीने वाहणचालक पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांच्या पत्रावर अवलोकन करणे.

ठराव क्र. ६५

महानगरपालिका आरोग्य विभागातील डंपर, टॅम्पो इत्यादि वाहणांवर ठेका पद्धतीने वाहण चालक घेण्याबाबत महानगरपालिकेने दि.१/११/०२ रोजी जाहिर नोटोसाद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार दि.१४/११/०२ रोजी खालील प्रमाणे मनपास निविदा प्राप्त झाल्या

१) मे. विना ट्रॅव्हलर्स

२) मे. साई गणेश कन्स्ट्रक्शन

३) मे. गुरूजी सॅनीटेशन

४) मे. गुडलक लेबर कॉन्ट्रॅक्टर

उक्त निविदा धारकांनी निविदा सोबत १) कामाचा अनुभव २) मोटर वाहतुक कामगार अधिनियक १९६१ अन्वये नोंदणी केल्याचा दाखला जोडने बंधनकारक होते मात्र वरिल कोणत्याही ठेकेदाराने सदरचे दाखले न जोडल्याने सदर कामीची फेरनिविदा मागविण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सुचक - श्री. हरेश गावंड **अनुमोदन - दिनेश नलावडे**

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/१२/२००२.

प्रकरण क्र. ६४ :-   ५० एम.एल.डी. पाणी योजना कर्ज परत फेडीबाबत.

ठराव क्र. ६६   :-

५० एम.एल.डी. पाणी योजनेसाठी एम.एम.आर.डी.ए. कडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जे कर्ज वितरण करण्यांत आलेले होते त्याची परतफेड डिसें. २००१ पासून सुरु झालेली आहे. डिसें. २००१ व जून २००२ असे दोन हप्ते वेळेत भरणा केलेले आहेत. महानगरपालिका निवडणुक २००२ अभावी करदात्यांना कराची बिले उशिराने पाठविण्यांत आलेली असल्याने कर वसुलीवर झालेला परिणाम तसेच जकात कर नुकसान भारपाई अनुदान वेळेवर उपलब्ध होत नसल्याने आणि कर्जाचा हप्ता वेळीच भरला गेला नाही. तर १८ टक्के अतिरिक्त व्याजाची आकारणी एम.एम.आर.डी.ए. कडून केली जाणार आहे. यास्तव पाणीपुरवठा राखीव निधी वरील १०.४९ कोटी रकमेतून कर्ज परत फेड करावी. यासाठी मुदत ठेवी मधील राखीव निधीच्या ठेवी मधून कर्ज हप्ता ४.३३ कोटी भरण्याइतकी रक्कम ठेव मुदतपूर्व काढण्यासाठी आजची सभा मंजूरी देत आहे. परंतु दि. ३१/१२/२००२ पर्यंत कर्ज परत फेडीस पुरेशी रक्कम महानगरपालिका खात्यावर जमा झाल्यास राखीव निधीतील रक्कम मुदत ठेवीमधून काढू नयेत यास आजची सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.   **अनुमोदन :- श्री. अशोक पाटील.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/१२/२००२

प्रकरण क्र. ६५ :- **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सिग्नल यंत्रणा बसविणे.**
१) काशिमिरा पोलीस स्टेशनकडील दि. १२/०१/२००२ चे पत्र.
२) मिरारोड पोलीस स्टेशनकडील दि. २४/०४/२००२ चे पत्र.
३) भाईंदर पोलीस स्टेशनकडील दि. २०/०५/२००२ चे पत्र.

ठराव क्र. ६७ :-

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महागरपालिका हद्दीत विविध भागात सिग्नल यंत्रणा बसविणे कामी पोलीस स्टेशनकडून माहितीनुसार खालील ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसवायची आहे.

भाईंदर (पश्चिम) विभाग

१) भाईंदर (प.) बनी पॅलेस नाका.
२) भाईंदर (प.) पोलीस स्टेशन समोर
३) संतोक टॉकीज नाका
४) ६० फुटी रोड (जुने शिवसेना कार्यालयाजवळ)
५) ६० फुटी रोड बावन जिनालय जवळ
६) उत्तन बस स्टॉप
७) भूतबंगला (काका बाप्टिस्टा चौक)

भाईंदर (पुर्व)

१) साईबाबा मंदिर नाका (फाटक)
२) गोडदेव नाका
३) नवघर नाका
४) बंदरवाडी नाका
५) खारीगांव नाका
६) प्रशांत हॉटेल जवळ
७) केबिन रोड नाका

मिरारोड विभाग

१) सिल्वर पार्क नाका
२) साईबाबा नाका
३) मिरारोड रिक्षा स्टॅण्ड

४) शितल नगर नाका

५) एस.के. स्टोन जवळ

६) शिवार गार्डन जवळ

७) प्लाय ओव्हर जक्शन जवळ

८) एम.टी.एन.एल. रोड जंक्शन

९) शांतीनगर जंक्शन

काशिमिरा विभाग

१) मिरागांव अमर पॅलेस हॉटेल जवळ

२) काशिमिरा नाका

३) काशिगांव नाका (निलकमल समोर)

४) लक्ष्मीबाग सगणाई देवी मंदिर जवळ

५) पेणकरपाडा अजित हॉटेल जवळ

वरीलप्रमाणे सिग्नल यंत्रणा बसविणेकरिता मा. वाहतुक नियंत्रण ठाणे यांना पत्र लिहून त्यांच्याकडून सर्व्हे करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तरी सदर ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. लिओ कोलासो. **अनुमोदन :- श्री. जेम्स कोलासो.**

ठराव सर्वानुमते मंजुर

मिरा भाईंदर महानगरपालिका.

" मा. स्थायी समिती सभा दि. २१. १२. २००२. "

प्रकरण क्र. ६६ :- लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने कामावर घेणेबाबत...

ठराव क्र. :- ६८

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर " कायम सफाई कामगार " म्हणून श्री. वेल्यन रामन, श्री. मुरुगन मुत्तूस्वामी व बाळकृष्ण वेल्यन हे कार्यरत होते. त्यांचे अनुक्रमे दि. १२. २. २००२, दि. २८. ७. २००२ व दि. २८. ७. २००२ रोजी निधन झालेले आहे. त्याच्या पश्चात " वारस पत्नी यांनी वारस दाखले सादर करुन " श्रीम. अंजलीबाई मुरुगन [पत्नी] श्री. सुब्रम्हणी वेल्यन [मुलगा] व श्री. संदील बाळकृष्ण [मुलगा] यांनी वारसाने कामावर घेण्यास विनंती केली आहे.

शासन निर्णय क्र. अंकपा/१०००/प्र. क्र. -२०/२०००/आठ, दि. २८. ३. २००१ अन्वये " लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्त्या करण्याची पध्दत चालू ठेवण्याबाबत निर्देशित केलेले आहे. " तसेच शासन निर्णय क्र. मागास-२२२-००२/५१०/प्र. क्र. ५३/२००२/नावि-६, दि.१७. ८. २००२ अन्वये महानगरपालिकेत वारसा/अनुकंपा तत्वावरील " सफाई कामगारांची नियुक्ती " करणेस मंजूरी दिलेली आहे.

साफसफाई व तत्सम कामे करणा-या सफाई कामगारांची आर्थिकस्थिती सबळ नसल्यामुळे त्याच्या कुटूंबीयाना नोकरीची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक असून एखादा " सफाई कामगार मयत/सेवानिवृत अथवा विकलांग झाल्यास" वरील शासन निर्णयानुसार वारसाने सफाई कामगार म्हणून महानगरपालिकेत नियुक्ती देता येते.

तरी श्रीम. अंजलीबाई मुरुगन [पत्नी] श्री. सुब्रम्हणी वेल्यन[मुलगा] व श्री. संदील बाळकृष्ण [मुलगा] या मयत कर्मचा-यांच्या वारसांना सफाई कामगार म्हणून रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतन श्रेणीवर " सफाई कामगार"यारिक्त पदावर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे　　　　अनुमोदन :- श्री. अशोक पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर (प)

प्रकरण क्र.६७ :- सन २००१-०२ मधील झालेल्या नवीन आकारणीवर सन २००२-०३ च्या देयकांत पुर्वलक्षी प्रभावाने झालेल्या वर्षापासून व्याज व नोटीस मात्र सन २००१-०२ पुरतेच मर्यादित ठेवणे बाबत.

ठराव क्र. ६९

मिरा भाईंदर महानगरपालिकेने (तात्कालिन नगरपालिका) सन २००१-०२ मध्ये आकारणी न झालेल्या व नविन मिळकतीचा सर्वे करुन त्यावर नविन कर आकारणी प्रस्तावित केलेली होती. अशाप्रकारे नविन आकारणी झालेल्या खातेदारांवर तात्कालिन नगरपालिका अधिनियमांतील कलम ११९ नुसार नोटीसा बजावून संबंधित खातेदारांकडून हरकती मागविल्या होत्या. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या हरकतीवर मा.सहा.संचालक तथा प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी सो. नगररचना ठाणे यांचेकडे दि.२९.१.२००२ व ३०.१.२००२ रोजी सुनावणी झाली. तद्नंतर सदर सुनावणी बाबत दि.४.४.२००२ रोजी निर्णय देण्यांत आला. सदर निर्णयातील सूचना व मार्गदर्शन तक्रारीनुसार आकारणीत दुरुस्त्या करुन उपरोक्त आकारणी कायम केली. व नविन आकारणीतील खातेदारांना प्रत्यक्ष मालमत्ता कराची बिले बजावण्यात आली.

सदर झालेली आकारणी मिळकतीवर प्रथम झाली असून ती वापर परवाना किंवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे अगोदरचे असेल या तत्वानुसार पूर्वलक्षी प्रभावाने झाली असल्याने ते खातेदार सन २००२-०३ च्या मागणी बिलात थकबाकीदार असून त्यांची थकीत रक्कम जितक्या वर्षाची असून तितक्या वर्षाच्या रकमेवर प्रतीवर्षी १२ टक्के इतकी व्याजाची व १ टक्का इतकी नोटीस फीची आकारणी झालेली आहे.

सबब सन २००१-०२ या वर्षी नविन आकारणी झालेल्या खातेदारांवर पूर्वलक्षी प्रभावाने प्रथमच आकारणी झाल्याने त्या त्या वर्षाचे व्याज व नोटीस फी ची रक्कम रद्द करुन ती मात्र सन २००१-०२ पुरतीच मर्यादित ठेवावी. परंतु दि.२१.११.२००२ च्या मा.स्थायी समितीच्या सभेत पारित झालेला ठराव क्र.४२ मध्ये सदर व्याज व नोटीस फी ची रक्कम पूर्णपणे रदद् करण्यात आली आहे. सदर पारीत झालेल्या ठरावात वरीलप्रमाणे दुरुस्तीस आजची सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- प्रशिकांत शहा.

अनुमोदन :- लिओ कोलासो

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२७/१२/२००२

प्रकरण क्र.६८ मा. महापौर, उपमहापौर व सर्व सदस्यांचे लेटर पॅड, व्हीजीटिंग कार्ड व इनव्हलप छपाई करणेकामी निविदा स्विकारणेस मंजुरी देणे.

ठराव क्र. ७०

महानगरपालिकेने दि. १६/११/२००२ रोजी **सा. मिरा भाईंदर जर्नल** या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मा. महापौर, मा. उपमहापौर व सर्व सदस्यांचे लेटरपॅडए व्हीजिटोंग कार्ड व इनव्हलप छपाई करुन पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

अ.क्र.	तपशिल	मे. आकृती ग्राफीक्स,	मे. गिरिष प्रिंटरी,	मे. पद्मावती पेपर्स,
१.	२.	३.	४.	५.
१.	लेटरपॅड -स्पेशल - एक्झिक्युटीव्ह बॉन्डपेपर सा. १/४. स्कीन प्रिंटोंग, चार कलर (मराठी व इंग्रजी)	रु. १,०००/- प्र. पाचशे रु. १,४००/- प्र. हजारी	रु. ९५०/- प्र. पाचशे रु. १,३००/- प्र. हजारी	रु. १,१००/- प्र. पाचशे रु. १,३५०/- प्र. हजारी
२.	लेटरपॅड -स्पेशल एक्झिक्यु टीव्ह बॉन्डपेपर, सा. १/८, स्क्रीन प्रिंटोंग चार कलर,मराठी व इंग्रजी)	रु. ७५०/- प्र. पाचशे रु. १,०००/- प्र. हजारी	रु. ६५०/- प्र. पाचशे रु. ९००/- प्र. हजारी	रु. ८५०/- प्र. पाचशे रु. १,१५०/- प्र. हजारी
३.	व्हीजिटोंग कार्ड - अमेरिकन साईज स्क्रीन प्रिंटोंग चार कलर,(मराठी व इंग्रजी)	रु. ९७५/- प्र. पाचशे रु. १,२००/- प्र. हजारी	रु. ८५०/- प्र. पाचशे रु. ११००/- प्र. हजारी	रु. १०००/- प्र. पाचशे रु. १,२५०/- प्र. हजारी
४.	इनव्हलप-सुपर फाईन सा. ११इंच **X** ५ इंच स्क्रीन प्रिंटोंग एक कलर,(मराठी व इंग्रजी)	रु. ७७५/- प्र. पाचशे रु. ९२५/- प्र. हजारी	रु. ६५०/- प्र. पाचशे रु. ८५०/- प्र. हजारी	रु. ८००/- प्र. पाचशे रु. १,०००/- प्र. हजारी
	चार कलर	रु. १२००/- प्र. पाचशे रु. १३००/- प्र. हजारी	रु. १०५०/- प्र. पाचशे रु. १२५०/- प्र. हजारी	रु. १२००/- प्र. पाचशे रु. १,४००/- प्र. हजारी
५..	इनव्हलप-सुपर फाईन सा. ९इंच **X** ९ इंच स्क्रीन प्रिंटोंग एक कलर,(मराठी व इंग्रजी)	रु. ६००/- प्र. पाचशे रु. ८५०/- प्र. हजारी	रु. ५५०/- प्र. पाचशे रु. ७५०/- प्र. हजारी	रु. ६५०/- प्र. पाचशे रु. ८००/- प्र. हजारी
	चार कलर	रु. १०५०/- प्र. पाचशे रु. १२००/- प्र. हजारी	रु. ९५०/- प्र. पाचशे रु. ११५०/- प्र. हजारी	रु. १०५०/- प्र. पाचशे रु. १,३००/- प्र. हजारी

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **मे गिरीष प्रिंटरी** यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. तसेच दि. १८/१२/२००२ रोजी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. गिरिष प्रिंटरी यांना चर्चेला बोलविले असता झालेल्या चर्चेनुसार त्यांनी निविदेतील प्रत्येकी रु. १०/- ने कमी करण्याचे मान्य करुन तसे लेखी पत्र दिलेले आहे. त्यानुसार त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	तपशिल	निविदेतील दर	रु. १०/- ने कमी करुन येणारा दर
१.	लेटरपॅड सा.१/४	रु. ९५०/-प्र. पाचशे	रु. ९४०/-प्र. पाचशे
	चार कलर	रु. १,३००/-प्र. हजारी	रु. १,२९०/-प्र. हजारी
२	लेटरपॅड सा.१/८	रु. ६५०/-प्र. पाचशे	रु. ६४०/-प्र. पाचशे
	चार कलर	रु. ९००/-प्र. हजारी	रु. ८९०/-प्र. हजारी
३	व्हीजीटींग कार्ड	रु. ८५०/-प्र. पाचशे	रु. ८४०/-प्र. पाचशे
	चार कलर	रु. १,१००/-प्र. हजारी	रु. १,०९०/-प्र. हजारी
४	इनव्हलप सा११इंच x ५ इंच	रु. ६५०/-प्र. पाचशे	रु. ६४०/-प्र. पाचशे
	एक कलर	रु. ८५०/-प्र. हजारी	रु. ८४०/-प्र. हजारी
	चार कलर	रु. १,०५०/-प्र. पाचशें रु. १,२५०/-प्र. हजारी	रु. १,०४०/-प्र. पाचशे रु. १,२४०/-प्र. हजारी
५	इनव्हलप सा ९इंच x ५ इंच	रु. ५५०/-प्र. पाचशे	रु. ५४०/-प्र. पाचशे
	एक कलर	रु. ७५०/-प्र. हजारी	रु. ७४०/-प्र. हजारी
	चार कलर	रु. ९५०/-प्र. पाचशे रु. १,१५०/-प्र. हजारी	रु. ९४०/-प्र. पाचशे रु. १,१४०/-प्र. हजारी

तरी वरील प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा स्विकारुन लेटर पॅड, व्हीजिटींग कार्ड व इनव्हलप छपाई करुन घेणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- महेंद्रसिंग चौहाण (signature)

अनुमोदन :- तुळशीदास म्हात्रे (signature)

ठराव सर्वानुमते मंजूर (signature)

(signature)
अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

C2

मिरा भाईंदर महानगरपालिका
// स्थायी समिती सभा दि.२७/१२/२००२//

प्रकरण क्र.६९ :- काशि येथील स्मशानभूमीत खाजगी संस्थांना लाकडे ठेवणेकरिता देणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ७९

काशिमिरा येथील स्मशानभूमीत लाकडे विक्रीकरिता ठेवण्याकरिता साईनाथ एकता सोसायटी यांनी परवानगी मागितलेली आहे. सदर स्मशानभूमीत अंत्य विधी करिता लाकडा अभावी गैरसोय होत आहे. त्यामुळे संस्थेस काम दिल्यास चांगली सोय उपलब्ध होणार आहे.

तरी सदर संस्थेस लाकडे विक्रीकरिता ठेवण्याकरिता रुपये १/- नाममात्र भाडे घेऊन व करारनामा करुन देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- सौ ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदन :- श्री शशिकांत शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

27/12/02 27/12/2002

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

83

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा दि. २७/१२/०२

प्रकरण क्र. :- ७० महानगरपालिका २६ बालवाडी मधील १७०० विद्यार्थ्यांना सन २००२-२००३ या सालासाठी "सकस आहार" पुरवठा करणे कामी आलेल्या **दरपत्रकास मंजूरी मिळणे बाबत.**

ठराव क्र. ७२ महानगरपालिकेने दि.१२/११/२००२ च्या आदेशानुसार राजबंजरंग या साप्ताहिक या वर्तमानपत्रामध्ये दि. १० नोव्हेंबर ते १६ नोव्हेंगर २००२ रोजीच्या आलेल्या जाहिरातीनुसार "सकस आहार" पुरविण्याकामी खालील प्रमाणे दरपत्रक आलेली आहेत.

अ.क्र.	तपशिल	प्रति विद्यार्थी दयावयाचे प्रमाणे	शारदा कॅटरर्स,	जुली मायकल खावशी	नयना कमळाकर पाटोल	आकांक्षा कॅटरर्स विनायक वि. साळगावकर	साई कॅटरर्स पुष्पहास वंसत म्हात्रे	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१)	मोड आलेली कडधान्य मसाल्यामध्ये उकडलेली	१०० ग्राम	३.५०	३.१५	४.५०	३.१०	३.२०	
२)	शेगदाणे व गुंळ	१०० ग्राम ५० ग्राम	५.२५	५.१५	५.५०	५.१०	५.२०	
३)	फुटाणे	१०० ग्राम	३.९०	३.८५	४.५०	३.८०	३.९०	
४)	बिस्कीट (मारी)	४ नग	३.००	२.९५	२.९०	२.९०	२.९५	
५)	अंडी (उकडलेली)	१ नग	२.९०	२.८५	३.५०	२.८०	२.९०	
६)	केळी	२ नग	२.८०	२.७०	३.००	२.६०	२.७५	
			२१.३५	२०.६५	२३.९०	२०.३०	२०.९०	

वरील प्रमाणे दरपत्रके आलेली आहेत. बाजारभाव तपासले असता वाजवी वाटतात. "सकस आहार" पुरविणेचा सरासरी खर्च बघितला असता "आकांक्षा कॅटरर्स" श्री. विनायक वि. साळगांवर यांचे दर वाहतूक व इतर खर्च पकडून एका दिवसाला एका विद्यार्थ्यांसाठी खर्च रू. ३.३८ प्रमाणे आहे. त्यामुळे श्री. विनायक वि. साळगांवकर यांचे दर स्विकारण्यांस व त्याचे मासिक बिले अदा करणेस हि सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- महेंद्रसिंह चौहान

अनुमोदक :- श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

८५

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. २७/१२/२००२

प्रकरण क्र. ७१ :- महानगरपालिका कार्यालयासाठी व नगरभवन मंगल कार्यालयासाठी नविन फर्निचर खरेदी करणेकामी निविदा स्विकारणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ७३

महानगरपालिकेने दि. २९/११/२००२ रोजी "दै नवाकाळ व सप्ताहीक ठाणे कि आवाज" या वृतपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार कार्यालय व नगरभवन मंगल कार्यालयासाठी नविन फर्निचर पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

अ. क्र.	तपशिल	परिमाण	मे. प्लस सप्लायर्स	मे. स्नेहल इंटरप्रायझेस	मे. मुरबाडकर बिझनेस इंड.	मे. डी. पी. फर्निचर्स
१.	२	३	४	५	६	७
१.	स्टील कपाट नामांकित कपनी साईज ७८ इंच x ३६इंच x १९इंच, पाच खणे, २०-२२ गेज	१२ नग	रु. ४७६०/- प्र. नग	रु. ३७००/- प्र. नग	रु. ३८००/- प्र. नग	रु. ६९००/- प्र. नग
२.	स्टील टेबल नामांकित कंपनी साईज-४८ इंच x २४ इंच x ३० इंच, एकबाजु तीन डॉव्हर, सनमाईक टॉप, २२ गेज	२० नग	रु. २०६५/- प्र. नग	रु. १७८५/- प्र. नग	रु. २४००/- प्र. नग	रु. २३९०/- प्र. नग (गुडलक)
३.	केन खुर्च्या नामांकित कंपनी "**एस**" टाईप फुल आर्म टयुबलर खुर्ची, १ इंच डाय १६ गेज पाईप, वुडन सीट व मागील बाजूस नायलॉन जाळी आणि सीट साठी सपोर्टींग पाईप	६० नग	रु. ५४८/- प्र. नग	रु. ४६०/- प्र. नग	रु. ४८४/- प्र. नग	रु. ७२५/- प्र. नग (गुडलक)
४.	प्लॉस्टोक खुर्च्या नामांकित कंपनी साईज २३ इंच (कार्यालय-१२५ नग व नगरभवन मंगलकार्यालय-३०० नग)	४२५ नग	रु. २३२/- प्र. नग (प्राईम) रु. २६४/- प्र. नग (निलकमल)	रु. १९५/- प्र. नग	रु. २४५/- प्र. नग	रु. २३५/- प्र. नग (व्हीआयपी)

वरील तुलनात्मक तक्ता पाहता "**मे. स्नेहल इंटरप्रायझेस**" यांचे निविदेतील दर सर्वात कमी व बाजारभावाशी तुलना केली असता ते वाजवी आहेत. सर्वात कमी दरानुसार वरीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेंस रक्कम रु. १,९०,५७५/- इतका खर्च येणार आहे. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारुन फर्निचर खरेदी करणेंस व त्या कामी येणारे देयक अदा करणेंस ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- मिलन वसंत म्हात्रे

अनुमोदन :- ज्योत्स्ना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२७/१२/२००२

प्रकरण क्र. ७२ :- महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी वर्गाकरीता गणवेश (शिलाई व ॲम्ब्रॉडरीसह) खरेदी करणेकामी निविदा स्विकारणेस मंजुरी देणे.

ठराव क्र. ७४

महानगरपालिका दि. २९/११/२००२ रोजी 'सा. चंद्रप्रभा' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी वर्गाकरिता गणवेश पुरवठा करणेकामी खालील प्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

अ.क्र.	तपशिल						मे. स्नेहल इंटरप्रायजेस	मे. ओम कंन्स्ट्रक्शन	मे. महावीर स्टोर्स	मे. वितराग कंन्स्ट्रक्शन कंपनी	मे. हर्षद इंटरप्रायजेस	मे. महाराष्ट्र स्टेट पॉवरल्युम कार्पोरेशन	मे. नॅशनल क्लॉथ स्टोर्स
	पुरुष कर्मचारी गणवेशासाठी कापड पुरवठा करणे												
	कापडाचा प्रकार	रुंदी से.मी.	वार्प	वेस्ट	रिड	पिक्स							
१.	२.						३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१)	नामांकित कंपनीचे पॉलिस्टर ब्लेडेड सुटींग कापड (६७% पॉलिस्टर, ३३% कॉटन)	१३७	२/३२	२/३२	५६	४८	एस. कुमार		सरोज टेक्सटाईल जाम टेक्सटाईल एन. टी.सी. मिल्स				
अ)	सफेद						रु. १०१/- प्र. मीटर	रु.९३.९०/- प्र. मीटर	रु. ७८/- प्र. मीटर	रु.९५.५०/- प्र. मीटर	रु. ९७/- प्र. मीटर	रु. ७३/- प्र. मीटर	रु.६६.६०/- प्र.मीटर
ब)	खाकी						रु. १०१/- प्र. मीटर	रु.९३.९०/- प्र. मीटर	रु. ७८/- प्र. मीटर	रु.९५.५०/- प्र. मीटर	रु. ९७/- प्र. मीटर	रु. ७७/- प्र. मीटर	रु. १०८/- प्र. मीटर
क)	नेव्ही ब्ल्यु						रु. १०१/- प्र. मीटर	रु.९३.९०/- प्र. मीटर	रु. ७८/- प्र. मीटर	रु.९५.५०/- प्र. मीटर	रु. ९७/- प्र. मीटर	रु. ८०/- प्र. मीटर	रु. १२६/- प्र. मीटर(एस.कुमार) (ट्रीपल लाईन)
ड)	स्काय ब्ल्यु						रु. १०१/- प्र. मीटर	रु.९३.९०/- प्र. मीटर	रु. ७८/- प्र. मीटर	रु.९५.५०/- प्र. मीटर	रु. ९७/- प्र. मीटर	रु. ८०/- प्र. मीटर	रु.१४४/-प्र. मीटर (श्री. मिल्स)
इ)	डार्क ग्रे						रु.१०१ प्र.मिटर	रु.९३.९० प्र.मिटर	रु. ७८/-प्र.मिटर	रु. ९५.५० प्र.मिटर	रु. ९७/- प्र.मिटर	रु. ८० /- प्र.मिटर	
ई)	लाईट ग्रे						रु. १०१/- प्र. मीटर	रु.९३.९०/- प्र. मीटर	रु. ७८/- प्र. मीटर	रु.९५.५०/- प्र. मीटर	रु. ९७/- प्र. मीटर	रु. ८०/- प्र. मीटर	
फ)	चॉकलेटी						रु. १०१/- प्र.मिटर	रु.९३.९० प्र.मिटर	रु.७८/- प्र.मिटर	रु. ९५.५० प्र.मिटर	रु. ९७/- प्र.मिटर	रु. ८०/- प्र.मिटर	

८६

१	२	३	४	५	६	७	८	९
२.	महिला कर्मचारी साडया व ब्लाऊजसाठी कापड पुरवठा करणे							
	कापडाचा प्रकार रुंदी से.मी. वार्प वेस्ट रिड पिक्स							
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
अ	नामांकित कंपनीचे टेरीकॉट साडी (६७% पॉलीस्टर ३३%, कॉटन) स्काय ब्ल्यू ११८ ६० पी. सी. ६० पी. सी. ८४ ८४	रु. २८५ प्र. नग	रु. १७४ प्र. नग	रु. ४०५ प्र. नग (९ वार) रु.२६५/- प्र.नग (६ वार)	रु. १७६ प्र. नग	-	रु. २४० प्र नग (५ मीटर) रु.२६४/- प्र.नग (५.५० मीटर) रु. ३८४/-प्र. नग (८ मीटर)	रु. ४२ प्र. मी. (अे) रु.६३/- प्र.मी. (बी)
	१२२ ६० पी. सी. ६० पी. सी. ८४ ८४	रु.३०५/- प्र.नग	रु.१८५ प्र.नग	रु.४२५/- प्र. नग (९ वार) रु.२७५/- प्र.नग (६ वार)	रु. १८५/- प्र.नग	-	रु.२९० /- प्र.नग (५ मीटर) रु.३१९/- प्र.नग (५.५० मीटर) रु.४६४ प्र.नग (८ मीटर)	
ब)	नामांकित कंपनीचा टेरी कॉट ब्लाऊजपीस शर्टींगचे (८०% पॉलीस्टर २०% कॉटन) स्कायब्ल्यू ९० ६० पी. सी. ६० पी. सी. ८४ ८४	रु.४३/- प्र नग	रु. २९.८० प्र नग	रु.४१/- प्र.नग	रु. ३०/- प्र नग	-	रु.३५/- प्र मीटर	रु.३६/- प्र. मीटर

१	२	३	४	५	६	७	८	९
३)	पुरूष कर्मचारी गणवेश शिलाई ॲम्ब्रॉडरीसह) अ) फूल पॅन्ट व फूल शर्ट	रू.१९५ /- प्र नग	रू.१७९/- प्र नग	रू. १९०/- प्र नग	रू.१८०/- प्र नग	—	रू.२००/- प्र नग	रू. १६२/- प्र नग
	ब) फूल पॅन्ट व हाफ शर्ट	रू. १९० /- प्र नग	रू.१५९ /- प्र नग	रू.१८०/- प्र नग	रू.१६० /- प्र नग	—	रू. १९०/- प्र नग	रू. १६०/- प्र नग
४)	महिला कर्मचारी ब्लॉज शिलाई	रू.३७/- प्र नग	रू. २४.३० प्र नग	रू. ३५/- प्र नग	रू. २४.५० प्र नग	—	रू. ४५/- प्र नग	रू. ५४/- प्र नग

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी आपल्या निविदा वेगवेगळया प्रकारे सादर केलेल्या आहेत त्यामुळे त्यांची तुलना केली असता व कापडाच्या दर्जाचा विचार केला असता शासन निर्णय क्र. भाखस १०८८ / २५१२ / उदयोग-६ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २ जानेवारी १९९२ नूसार गणवेषासाठी लागणारे कापड साडया व ब्लॉऊजपीस **मे. महाराष्ट्र स्टेट पॉवर ल्यूम्स कार्पोरेशन** यांचेकडून खरीदी करणे उचित होईल तसेच शिलाइ बाबत निविदेतील सर्वात कमी दराने (अ. क्र. ३ अ साठी रू. १६२ व ब साठी रू. १५९ व अ.क्र. ४ साठी रू. २४.३०) काम करणेस तयार असल्याने शिलाईचे कामही **मे. महाराष्ट्र स्टेट पॉवर ल्यूम्स कार्पोरेशन** यांना देणे योग्य होईल.

तरी वरील प्रमाणे निविदा स्विकारून गणवेष खरेदी करणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस मा. स्थायी समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. दिनेश नलावडे

अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
// स्थायी समिती सभा दि.२७/१२/२००२//

प्रकरण क्र.७३ :- मा.उप.आयुक्त यांचेकरिता तीन नविन ॲम्बेसिडर/ मारुती (इस्टीम) खरेदी करणे बाबत

ठराव क्र. ७५

महानगरपालिका मा.उप आयुक्त यांना डिझेल ॲम्बेसिडर/मारुती (इस्टीम) खरेदी करणेसाठी दि.२१/१२/२००२ रोजीच्या स्थायी समितीमध्ये चर्चेनुसार मा.उप आयुक्त यांना ठिक ठिकाणी जाऊन कामाची पहाणी करणेकरिता वाहनांची गरज लक्षात घेता तीन नविन ॲम्बेसिडर डिझेल /मारुती (इस्टीम) खरेदी करणे आवश्यक आहे. सदरच्या ॲम्बेसिडर्स/मारुती (इस्टीम)उत्पादक कंपनीच्या अधिकृत विक्रेता यांचेकडून दरपत्रक मागवून खरेदी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका मा.उप आयुक्त यांचेकरिता तीन नविन डिझेल ॲम्बेसिडर/मारुती (इस्टीम) थेट उत्पादक कंपनीच्या अधिकृत विक्रेता यांचेकडून शासकीय दराने दरपत्रक मागवून खरेदी करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

Dhanraj Agrawal

सुचक :- श्री. धनराज अग्रवाल अनुमोदन :- श्री. आशिकांत शाह.

ठराव सर्वानुमते मंजूर

27/12/2002

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०१/२००३

प्रकरण क्र. ७४ :- **दि. १२/१२/२००२ व २१/१२/२००२ रोजीचे मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ७६ :-

दि. १२/१२/२००२ व २१/१२/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री. दिनेश नलावडे. **अनुमोदन :-** श्री. लिओ कोलासो.

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. ४/१/२००३

प्रकरण क्र.७५ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध रस्ते चौक, उदयाने करिता नावाचे फलक (बोर्ड) बसविणे कामाच्या निविदांस मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ७८

दिनांक ३१.१०.२००२ चा दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विकास कामांकरिता ठेकेदारांनी पुढीलप्रमाणे निविदा सादर केलेल्या आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव /ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च /रक्कम/दर
१)	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध रस्ते, चौक, उद्याने करिता नावाचे फलक (बोर्ड) बसविणे.	रु.२५,००,०००/-
	१) मे.श्री.राम कंन्स्ट्रक्शन कंपनी	१२.०० % कमी दराने
	२) मे.कविता मजूर कामगार सह.संस्था (म)	१६.१३ % कमी दराने
	३) मे.शहा कंन्स्ट्रक्शन	१४.०९ % कमी दराने
	४) मे.वित्राग कंन्स्ट्रक्शन कं.	१२.०० % कमी दराने
	५) मे.श्रध्दा देवी कंन्स्ट्रक्शन कं.	२५.०० %जास्त दराने
	६) मे.आर.बी.सुकरमणी	२१.०० %जास्त दराने
	७) मे.अष्टविनायक इंजिनिअर्स	९.२१ % जास्त दराने
	८) मे.मुकेश ब्रदर्स	२५.०० % जास्त दराने

वरीलपैकी ठेकेदार मे.कविता मजूर कामगार सहकारी संस्था (मर्या) यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १६.१३ % कमी दराची निविदा सर्वात कमी दराची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ अन्वये मंजूर करण्यात येत आहे. सदर कामी ठेकेदाराचे वेळोवेळी येणारे देयक प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे   अनुमोदन :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.स्थायी समिती सभा दि. ४/३/२००३

प्रकरण क्रमांक ७६ :- दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत करावयाच्या विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणे.

ठराव क्र. ७८

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करावयाच्या विविध विकास कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित खर्च
१)	राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर बाबळीची भाट येथे नॅशनल प्लास्टोक ते सविता मोरे यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे.	रु.९,६७,९६४/-
२)	माशाचा पाडा रोडवर डिसोझा वाडी ते मिनाक्षीनगर पर्यंत रस्ता रुंदीकरण, खडीकरण,डांबरीकरण करणे.	रु.१०,२३,६७६/-
३)	भटाचा पाडा येथे मिनाक्षी नगर मधील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे.	रु.१२,५९,३७०/-
४)	मांडवी पाडा सेंट झेवियर्स हायस्कूल ते शनिवार हींगे यांच्या घरा पर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.	रु.१९,०४,५५९/-
५)	राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर गावठण येथे श्री.महाविष्णू मंदिरापासून नविन गावठणापर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.	रु.२४,४८,१६४/-
६)	माशाचा पाडा रस्ता ब्रीज ते तलावापर्यंत सोलिंग सह खडीकरण, डांबरीकरण करणे.	रु.३४,५०,०००/-
		रु.१,१०,५३,७३३/-

वरील कामांकरिता दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत १०० टक्के अनुदान प्राप्त होणार असून सदर कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

Bhasonale

सुचक :- सौ. ज्योत्सना हस्नाळे

अनुमोदन :- श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

e3

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.४/३/२००३

प्रकरण क्र. ७७ :- घनकचरा व्यवस्थापन नियोजित प्रकल्पाकडे जाणारा रस्ता तयार करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणे बाबत.

ठराव क्र. ७९

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत केंद्रशासन व महाराष्ट्र शासन निर्णयानुसार घनकचरा व्यवस्थापनांतर्गत प्रकल्पाकरिता मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून दि.२६.१२.२००२ च्या आदेशान्वये ३१.०० हेक्टर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेली आहे. सदर प्रकल्पाकडे जाणारा रस्ता हा भूतबंगला उत्तन येथून धावगी झोपडपट्टी व पुढे नियोजित प्रकल्पाकडे करावा लागणार आहे. सदर रस्ता तयार करणे कामी रु.४५,००,०००/- मात्र एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर कामाकरिता सन २००३-०४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे. सदरचे काम हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डकडून मंजूरी आल्यानंतरच कामास सुरवात करण्यात यावे

सुचक :- श्री. अशोक पाटील

अनुमोदन :- श्री मिलन म्हात्रे

Pati

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. ४/१/२००३

प्रकरण क्र.७८ :- खाजगी संस्थेस वाहतूक बेट स्वखर्चाने विकसित करणे करिता देणे बाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. ८०

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध चौकातील वाहतूक बेटे स्वखर्चाचे विकसित करुन त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे कामी दि.२३.४.२००२ दैनिक सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर प्रसिध्दीनुसार मा.प्रशासकीय ठराव क्र.१०८ दि.१८.६.२००२ अन्वये खालील संस्थांना कामे देण्यात आलेली होती.

अ.क्र.	संस्थेची नांवे		ठिकाण
१.	मे.जागींड बिल्डर्स	-	सिल्व्हर पार्क जक्शन, ग्रीन ॲव्हेन्यू सर्कल
२.	मे.लीना बिल्डर्स	-	भाईंदर (प) क्षीरसागर हॉटेल जवळ
३.	मे.व्यंकटेश बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स	-	भाईंदर (प) रेल्वे स्टेशन
४.	मे.सालासर डेव्हलपर्स	-	उड्डाणपूल जंक्शन
५.	मे.अविश ॲण्ड असोसिएस	-	घोडबंदर जंक्शन
६.	मे.नकाशा आर्किटेक्ट	-	शिवार गार्डन समोर
७.	मे.शिवानी एन्टरप्राईजेस	-	भाईंदर(पू)साईबाबा मंदिर जवळ
८.	मे.सोनम बिल्डर्स	-	डॉ.हेडगेवार मार्ग (साईबाबा नगर)
९.	मे.सुरेश डी शहा	-	भाईंदर (प) जैन मंदिर जंक्शन
१०.	मे.बॉम्बे आर्कीटेक्चरल कन्सलंट	-	बी.पी.रोड जंक्शन, नवघर नाका
११.	प्रो.शास्त्रीज क्लासेस	-	भाईंदर (प) पोलीस स्टेशन समोर
१२.	मे.अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीस प्रा.लि.	-	अ) नयानगर मनपा कार्यालया समोर ब) शितल नगर जक्शन क) हैदरी सोसायटी जंक्शन ड) कृणाल शॉपिंग सेंटर जंक्शन

रस्ता रुंदीकरणातील कामाच्या ठिकाणची वाहतूक बेटे सोडून इतर संस्था सोबत वारंवार पत्रव्यवहार करुन सुध्दा करारनामे करुन कामास सुरुवात केलेली नाही.

भाईंदर (प) येथे क्षीरसागर हॉटेल समोरील वाहतूक बेट विकसित करणे कामी १) प्रजापती ब्रम्हकुमारी इश्वरीय विश्व विद्यालय व २) डॉ.राजीव बी अगरवाल , कस्तूरी मेमोरियल हॉस्पीटल यांनी मागणी केलेली आहे.

वरीलप्रमाणे संस्था काम करण्यास तयार नसल्याने भाईंदर (प) क्षीरसागर हॉटेल समोरील वाहतूक बेट हे प्रजापती ब्रम्हकुमारी इश्वरीय विश्व विद्यालय यांना तर भाईंदर (प) पोलीस स्टेशन समोरील वाहतूक बेट हे डॉ.राजीव बी.अगरवाल कस्तुरी मेमोरियल हॉस्पीटल यांना देण्यात यावे. तसेच वरील १ ते १२ पैकी उर्वरित वाहतूक बेटे इतर इच्छूक संस्थांना करारनामे करुन देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. वरील कामे सदर संस्थानी सहा महिन्यात न केल्यास इच्छूक संस्थाना देण्यात यावे

सुचक :- श्री शशिकांत शहा

अनुमोदन :- श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

प्रकरण क्र. ७९ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शौचालय पैसे दया व वापरा तत्वावर चालविण्यांस मंजूरी देणे.

ठराव क्र. :- ८९

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत महानगरपालिकेने विविध भागात नागरिकांच्या सोयीकरिता सार्वजनिक शौचालये बांधलेली आहेत. सदरची शौचालये पैसे दया व वापरा तत्वावर चालविणे करिता खाजगी संस्थाना देणे बाबत मा.महासभा दि.१९.१०.२००२ ठराव क्र.१८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.३०.११.२००२ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करुन **पैसे द्या व वापरा** तत्वावर सार्वजनिक शौचालये चालविणे कामी इच्छूक संस्थेकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर शौचालये रु.२०/- प्रति कुटुंब प्रमाणे रक्कम घेऊन चालविण्यास दयावयाची आहे. सदर जाहिर सूचनेनुसार आलेल्या अर्जानुसार खालील संस्था व ठिकाणे यांना करारनामा करण्याबाबत पत्र दिलेली आहेत.

अ.क्र.	संस्थेचे नांव	ठिकाण
१.	मे.मेघ वेलफेअर सोसायटी	मांडली गार्डन मुतारी, गावदेवी रोड, ॲटलॅक हॉटेल मागील, हनुमान नगर व अण्णानगर मधील शौचालय.
२.	मे.मेहतर समाज कल्याण संस्था	बंदरवाडी झोपडपट्टी, आर.एन.पी.पार्क, नवघर गाव गांवदेवी मंदिर, चाळघर मधुकर पाटील चाळ पुढील शौचालये
३.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकसेवा फाऊंडेशन (श्री.निलम केदारे)	काशिगांव विठ्ठल मंदिर, काशिचर्च,कातकरी पाडा, काशिमिरा स्मशान, मिरा गावठण (महाजन वाडी) जवळील शौचालये.
४.	मे.लायन्स क्लब ऑफ मिरारोड	नगरभवन गेट समोरील शौचालय
५.	श्री.इंदिरा मजूर कामगार सहकारी सोसायटी लि.	जनता नगर बालवाडी,तबेला, मस्जिद पाठीमागील निलकमल हॉटेल मागील माशाचा पाडा येथील शौचालये.
६.	नवजिवन रहिवाशी सेवा संघ	मोर्वागाव, डोंगरी, उत्तन, पाली चौक भागातील शौचालये.
७.	मे.अमृत सेवाभावी संस्था	मुर्धा गांव, राई गावातील सर्व शौचालये
८.	श्री.शंकुतलादेवी शिक्षण प्रसारक	भाईंदर (प) नेहरुनगर, लालबहादूर ,शास्त्रीनगर,मम जय बजरंगनगर झोपडपट्टी भागातील शौचालये
९.	राष्ट्रीय जनशक्ती संस्था.	घोडबंदर गावातील शौचालये, मॉर्डन कं, रेतीबंदर, कापडीचा कंम्पाऊंड, चेणे, काजूपाडा भागातील शौचालये
१०.	मे.बी.के.ए.ॲण्ड कंन्स्ट्रक्शन कं.	पेणकर पाडा गावातील सर्व शौचालये
११.	मे.निर्मल सामाजिक संस्था	मिरा गाव, मुन्शी कंपाऊंड, पांडुरंग वाडी, रायकर वाडी, एमआयडीसी शौचालये
१२.	मे.प्रदीप ईंटरप्राईजेस	भाईंदर पूर्व इंदिरा नगर, नवघर स्मशान समोरील व मागील शौचालये, श्रीरामनगर, आझादनगर मधील शौचालये

९३.	सोशियल एनवायरटमेंट वेलफेयर असो.	भाईंदर (पू) डी.जी.मार्केट, मेहता इंड.इस्टेट, हरिश्चंद्र नगर (स्मशान गेट व मागील) दत्तगुरु इस्टेट मधील शौचालये
९४.	संत गाडगेबाबा राष्ट्रीय जनसेवा सुलभ शौचालय	अभिनव शाळेमागील शौचालये, कोठार झोपडपट्टी शिर्डीनगर, क्रांतीनगर, मिरा रोड रेल्वे स्टेशन जवळील शौचालये.
९५.	हिंदु हरीजन (भंगी) समाज सेवा संघ	भाईंदर (प) गणेश देवल नगर, जय अंबे झोपडपट्टी क्र.१ व २, आंबेडकर नगर, सुभाषचंद्र बोस मैदानाजवळील शौचालये.

तरी वरील प्रमाणे संस्थांना करारनामे (११ वर्षापर्यंत) करुन प्रति कुटुंब २०/- या दराने **पैसे द्या व वापरा** तत्त्वावर शौचालये चालविण्यास देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्रीम. जोत्स्ना हसनाळे

अनुमोदन :- श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.०४/०१/२००३.

प्रकरण क्र. ८०:- महानगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये नविन दुरध्वनी व्यवस्था करणेकरिता ई.पी.ए.बी.एक्स. दुरध्वनी यंत्रणा, टेलीफोन इन्स्ट्रुमेंट खरेदी करणे व संपूर्ण कार्यायामध्ये वायरिंग करणे कामी निविदा स्विकारणेस मंजूरी देणे.

ठराव क्र . ८२ :-

महानगरपालिकेने दि. १९/११/२००२ रोजी दै. लोकमत' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये नविन दुरध्वनी व्यवस्था करणे करिता ई.पी.ए.बी.एक्स. दुरध्वनी यंत्रणा, टेलीफोन इन्स्ट्रुमेंट पुरवठा करणे व संपूर्ण कार्यालयामध्ये वायरिंग करणेकामी खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

क्र.	तपशिल	टेलीफोन इलेक्ट्रीकल्स कार्पोरेशन	एस. आर. कंन्स्टंलंट	डि.व्ही. फोन्स ॲण्ड सिस्टिम	टोम टेलिस्टिम	श्री. जी. कार्पोरेशन	मायक्रोवेअर कम्युनिकेशन	अजंठा कम्युनिकेशन	शेखर इलेक्ट्रीकल्स	आदिती इंटरप्राईजेस
१	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
अ)	नामांकित कंपनीचे ई.पी.बी.एक्स. दुरध्वनी यंत्रणा पुरवठा करणे.....	रु. ६,६६,०००/-	--	रु. २,६४,१५०/-	रु. ६,९५,०००/-	रु. २,७७,५००/-	रु. ४,९८,७००/-	रु. २,८२,५००/-	-	रु. २,९१,७७७/-
१)	बाहेर केलेल्या व बाहेरुन आलेल्या कॉलचे नंबर वेळ, तारीख, संभाषण माहिती मिळू शकेल.									
२)	२० ते २५ मेन लाईन जोडता येणे शक्य होईल.									
३)	एकूण ९० ते १०० इंटरकॉम एक्सटेन्शन जोडता येणे शक्य होईल.									
४)	संगणकाशी जोडणी शक्य होईल.									
५)	वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टेबलावर संपूर्ण यंत्रणेचा आढावा घेता येईल. व अशा प्रकारची उपकरणे जोडता येणे शक्य होईल.									
६)	आय.एस.डी.एन. लाईन जोडणे शक्य होईल.									
७)	स्वागतपर घोषवाक्य व तद्नंतर ऑपरेटरशिवाय									

अ. क्र.	तपशिल	टेलीफोन इलेक्ट्रीकल्स कार्पोरेशन	एस. आर. कंन्स्टंलंट	डि.व्ही. फोन्स ॲण्ड सिस्टिम	टोम टेलिस्टिम	श्री. जी. कार्पोरेशन	मायक्रोवेअर कम्युनिकेशन	अजंठा कम्युनिकेशन	शेखर इलेक्ट्रीकल्स	आदिती इंटरप्राईजेस
१	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
	इंटरकॉमवर बोलण्याची सुविधा									
८)	किमान एक वर्षासाठी विनाखर्च देखभाल दुरुस्ती नामांकित कंपनीचे नविन टेलीफोन अन्स्टयुमेंट पुरवठा करणे.									
ब)	नामांकित कंपनीचे नविन टेलिफोन इन्स्ट्रूमेंट	रु. ५१०/- प्र. नग	--	रु. ३९०/- प्र. नग	रु. ६५०/- प्र. नग	रु. ६५०/- प्र. नग	रु. ५६५/- प्र. नग	रु. ४००/- प्र. नग	--	रु. ६५०/- प्र. नग
क)	संपूर्ण कार्यालयामध्ये वायरींग करणे. मुख्य कार्यालय तळमजला ते चौथा मजला संपूर्ण मेन लाईन व इंटरकॉम जोडण्यासाठी वायरींग करणे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.									
१)	तळमजला ते चौथा मजला पर्यंत १०० प्रपर --ची अनआरमडची केबल प्रिसियनचे (आय.एस. आय. मार्क) पाईप मधून टाकून फिटींग करणे.	रु. १३५/- प्र. फुट	--	रु. ६८/- प्र. फुट	रु. ६७/- प्र. फुट	रु. ७८/- प्र. फुट	रु. ७२२/- प्र. फुट	रु. १३५/- प्र. फुट	रु. ४९/- प्र. फुट	रु. १९५/- प्र. फुट
२)	प्रत्येक मजल्यावर आवश्यकतेनुसार १० पेयर मॉडेल बसविणे	रु. १५०/- प्र. नग	--	रु. ४००/- प्र. नग	रु. १२०/- प्र. नग	रु. ४५०/- प्र. नग	रु. २५०/- प्र. नग	रु. ७५०/- प्र. नग	रु. १४५/- प्र. नग	रु. ५९५/- प्र. नग

अ. क्र.	तपशिल	टेलीफोन इलेक्ट्रीकल्स कार्पोरेशन	एस. आर. कंन्स्टंलंट	डि.व्ही. फोन्स ॲण्ड सिस्टिम	टोम टेलिस्टिम	श्री. जी. कार्पोरेशन	मायक्रोवेअर कम्युनिकेशन	अजंठा कम्युनिकेशन	शेखर इलेक्ट्रीकल्स	आदिती इंटरप्राईजेस
१	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
३)	जंक्शन बॉक्स पासून जेथे इंटरकॉम बसवायचे आहे. तेथपर्यंत डेल्टन केपनीचे (आय.एस.आय. मार्क) वायर प्रिसियन कंपनीचे पाईप मधून टाकून फिटींग करणे व नंबरींग करुन देणे.	रु. ६००/- प्र. पॉईंट	--	रु. ५५०/- प्र. पॉईंट	रु. १२००/- प्र. पॉईंट	रु. ६७५/- प्र. पॉईंट	रु. १४८५/- प्र. पॉईंट	रु. १०००/- प्र. पॉईंट	रु. २९५/- प्र. पॉईंट	रु. १७५१/- प्र. पॉईंट

वरील तुलनात्मक तक्ता पाहता 'अ' व 'ब' करिता "मे. डि. व्ही. फोन्स ॲण्ड सिस्टिम" यांची निविदा सर्वात कमी दराची आहे. त्याचप्रमाणे "एस. आर. कंन्सलटंट" या ठेकेदाराने महानगरपालिकेतर्फे देण्यांत आलेल्या "निविदा फॉर्म" वर कोणत्याही प्रकारे दर लिहीलेले नसल्याने, ती विचारात घेतली जाऊ नये. त्याचप्रमाणे 'क' करिता "मे. शेखर इलेक्ट्रीकल्स" यांची निविदा सर्वात कमी दराची आहे. या कामी रक्कम रु. इतका खर्च येणार आहे. तरी सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारुन ई.पी.ए.बी.एक्स. दुरध्वनी यंत्रणा, टेलिफोन इन्स्ट्रुमेंट खरेदी करणे व संपूर्ण कार्यालयामध्ये वायरिंग करणेस व त्या कामी येणारे देयक अदा करणेस हि सभा मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजूरी देत आहे. ~~मेसर्स~~ ~~पॅनासोनिक~~ मागोंकील कार्यालयीन यंत्र व वायरिंग काम एकत्र करणाऱ्या तसेच पाच वर्षांच्या गॅरंटीसह, इन्स्टॉलेशनसह प्रस्तावित करून टेंडर परत काढण्यात यावे.

सुचक :- श्री. शशिकांत शहा

अनुमोदन :- श्री. शरद पाटील

Sharad Patil

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.४/१/२००३

प्रकरण क्र.८१ :- शांतीनगर संकुलास पाणी पुरवठा करण्यासाठी एस.के.स्टोन कंपनी ते शांतीनगर सेक्टर ११ च्या संम्प पर्यंत ४०० मी.मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ८३

उपरोक्त विषयान्वये मिरा रोड येथील शांतीनगर संकुलाच्या पाणी समस्येबाबत यापूर्वी मंत्रालयात व जिल्हाधिकारी कार्यालयात ब-याच वेळा बैठका झाल्या होत्या त्याचप्रमाणे दिनांक २६.११.२००२ रोजी मा.सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय यांचे दालनात मा.महापौर, मा.उप महापौर, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका व इतर अधिकारी व पदाधिकारी यांचे उपस्थितीत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत शांतीनगर संकुलाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी अतिरिक्त ५० द.ल.लि. योजनेतून पाणी देण्याचे तत्वत: मान्य करण्यात आले असून सदर पाणी पुरवठा करण्यासाठी एस.के.स्टोन कंपनी ते सेक्टर ११ च्या संप पर्यंत ४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण ठेव तत्वावर तातडीने टाकणेबाबत निर्णय झाला होता व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ते काम १० टक्के इ.टी.पी. चार्जेस घेऊन त्यांचे सद्याचे चालू कामातून टाकणे शक्य असल्याबाबत चर्चेत सांगितले होते. परंतु त्यांनी आता त्यांचे दिनांक २८.११.२००२ चे पत्रानुसार सदर कामासाठी १४ टक्के इ.टी.पी. चार्जेस भरावे लागतील व सदर काम त्यांचे चालू कामातून करणे शक्य नसल्याचे व नविन निविदा काढून करावे लागणार असल्याचे कळविले आहे. सदर काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत केल्यास सदर कामासाठी होणारा १४ टक्के इ.टी.पी. चार्जेसच्या खर्चात बचत होणार आहे. त्यामुळे सदर कामाचे पाणी पुरवठा विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाची किंमत रुपये ४४,४८,३००/- आहे. तरी सदर कामासाठी व त्यासाठी येणा-या खर्चास मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधिल तरतूदीनुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस व सदर कामाच्या निविदा काढणेस मंजूरी देत आहे. परंतु सदर कामाची सुरुवात करणेपूर्वी शांतीनगर संकुलात नविन बांधावयाच्या जलकुंभाबाबत शासन स्तरावर झालेल्या निर्णयानुसार सदरचे काम बिल्डर मार्फत पूर्ण करण्यात येणार असल्याचे हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर शांतीनगर संकुलास ७.०० द.ल.लि. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक [redacted] मंडळाकडून मंजूर आहे. सदरचा पाणी पुरवठा ठाणे महानगरपालिकेला करुन त्यांच्याकडील स्टेम मार्फत होणारा पाणी पुरवठा मिरा भाईंदर महापालिकेला अतिरिक्त ५० द.ल.लि. योजनेतून वाढवून मिळणेबाबत ठाणे महानगरपालिकेचे किंवा शासनाचे लेखी हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर तसेच सदर योजना दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेला हस्तांतरित करणेबाबत व त्याबाबतचा करारनामा करणेबाबत शासन स्तरावर निर्णय घेऊन त्यानंतरच सदर कामास सुरुवात करण्यात यावी.

सुचक :- महेंद्रसिंग चव्हाण | अनुमोदन :- शशिकांत शहा

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १०/०१/२००३

प्रकरण क्र. ८२ :- **दि. २७/१२/२००२ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ८४ :-

दि. २७/१२/२००२ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदन :- श्री. हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १०/१/२००३.
ठराव क्र. ची मुळ प्रत

प्रकरण क्रं : विषय :- ८३ **महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना संगणक प्रशिक्षण घेणेकरीता दिलेल्या अग्रीमाबाबत.**

ठराव क्रं : ६४८५

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना संगणक प्रशिक्षण घेणे महाराष्ट्र शासनाने अनिवार्य केले आहे व महानगरपालिकेच्या कामकाजात संगणकाचा परिणामकारकरित्या वापर होण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. त्यानुसार संगणक प्रशिक्षण घेणे सोयीचे व्हावे म्हणून महानगरपालिकेने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, अंधेरी, मुंबई यांचे मार्फत महापालिकेच्या इमारतीमध्ये सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रशिक्षण घेणाऱ्या १११ अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येकी रु. २०१०/- प्रमाणे एकुण रु. २,२३,११०/- इतकी रक्कम अग्रीम म्हणून कर्मचाऱ्यांना देण्यात आली आहे. त्या अग्रीमाची वसुली दहा समान हप्त्यांमध्ये त्यांच्या वेतनातून कपात करुन घेण्यांत येणार आहे. तरी मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अंतर्गत तरतुदीनुसार दिलेल्या संगणक प्रशिक्षण अग्रीमास मंजुरी देण्यांत येते.

Dhanraj Agrawal

सुचक :- श्री. धनराज अग्रवाल **अनुमोदन** :- श्री. महेंद्रसिंग चौहान

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.स्थायी समिती सभा दि.१०/१/२००३

प्रकरण क्र.८४ :- जाहिरात फलक बसवून भाड्याने देणे (होर्डींग्ज) कामाबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. ८५

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जाहिरात कराद्वारे उत्पन्न वाढविण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ नुसार कार्यवाही करुन खाजगी एजन्सीकडून दर मागविण्यात आलेले होते. संपूर्ण शहरामध्ये सर्व्हे करुन १०१ जाहिरात फलक बसविणे कामी खाजगी एजन्सीकडून निविदा मागविली असता रु.६१,९५,७७७/- (पाच वर्षाकरिता) दर आलेले आहे. मा.प्रशासकीय ठराव क्र.१६८ दि.५.८.२००२ च्या मंजूरीन्वये संबंधित एजन्सीना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे रु.६१,९५,७७७/- एवढ्या उत्पन्नाची वाढ होणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने (तत्कालिन नगरपरिषदेने) मे.प्रकाशिका पब्लिकेशन (संचालिका कुमारी मनिषा कदम) व मे.महाशक्ती पब्लिकेशन (सौ.सुनित माने व मनिषा शं.कदम) यांना एकूण २० ठिकाणी जाहिरात फलक लावण्यास परवानगी दिलेली होती. (३१.३.०२ पर्यंत) सदर जाहिरात फलकापोटी वार्षिक रु.६०३०/-एवढे उत्पन्न मिळत होते.

वरील संस्थानी दि.१२.१२.२००२ रोजी पत्र देऊन सदर जाहिरात फलक लावणे कामी मुदत वाढवून देणेची मागणी केलेली आहे. महानगरपालिकेने यापूर्वीच जाहिर निविदा प्रसिध्दी करुन जाहिरात फलक भाड्याने दिलेले असून वरील दोन्ही एजन्सीचे फलक आजपर्यंत तसेच असल्याने त्यांचे फलक भाड्याने जात नसल्याचे व निविदा फॉर्ममधिल अटीशर्तीनुसार सदर भागात इतर कोणासही परवानगी द्यावयाची नसल्याने सदर दोन्ही एजन्सीचे फलक काढून टाकण्याची मागणी केलेली आहे.

मे. महाशक्ती पब्लिकेश यांना मुदत वाढवून दिल्यास जाहिराती पोटी भाड्याने मिळणारे उत्पन्न कमी होणार असल्याने मुदतवाढ देण्यात येऊ नये, महानगरपालिकेच्या रस्त्यावरील होर्डींग्ज निविदा मागवूनच देण्यात याव्येत. मे. महाशक्ती पब्लीकेशनला फक्त पाच ठिकाणी होर्डींग्ज लावण्यांस परवाना देण्यांत यावा.

सूचक :- श्री मिलन म्हात्रे   अनुमोदन श्री. तुलसिदास म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १०/१/२००३.

प्रकरण क्र. ८५ :- मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेले प्रस्ताव अवलोकनार्थ सादर.

ठराव क्र. :- ८७

मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार त्यांना प्राप्त अधिकारात खालील कामे मंजूर केलेली आहेत.

१) बांधकाम विभागाकरीता टेबल व खुर्च्या पुरवठा करणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	आलेले दर प्रती नग	
		टेबल	खुर्च्या
अ)	मे. परफेक्ट इंजिनिअरींग	२२५०/-	८७५/-
ब)	मे. जय अंबे फर्निचर	२२००/-	७५०/-
क)	मे. स्वस्तिक फर्निचर	१७५०/-	६५०/-

वरीलपैकी **मे. स्वस्तिक फर्निचर** यांची निविदा मंजूर करण्यांत आलेली आहे. सदर कामी मंजूर दाराने रु. २४,०००/- एवढा खर्च झालेला आहे.

२) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सिंटेक्स टाक्या पुरवठा करणे : रु.२,५०,०००/-

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	१००० लीटर (३५ नग)	२००० लीटर (१० नग)
१.	मे. सिंटेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड	रु. ५०५०/-	रु. १०१००/-
२.	मे. साहे मार्केटिंग ॲन्ड एक्सपोटर्स	रु. ४९८०/-	रु. ९९६०/-
३.	मे. सिंटेटीअर्स	रु. ५२००/-	रु. १०४००/-

वरीलपैकी **मे. साहे मार्केटिंग ॲन्ड एक्सपोटर्स** यांचे दर मंजूर करण्यांत आलेले असून सदर कामी मंजूर दरानुसार रु. २,७३,९००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) महाजनवाडी येथे १० सीटचे शौचालय बांधणे — रु. ३,६०,०००/-

४) मिरा रोड शांतीनगर नाल्यावर मासळी मार्केट समोर, नियोजित सुलभ शौचालयासमोर स्लॅब टाकणे — रु. ३,००,०००/-

५) शिवार उद्यान रुंदीकरणात येणारी कुंपण भिंत तोडून आतील बाजूस नविन कुंपन भिंत बांधणे — रु. ४,९८,०००/-

६) रा.म.क. येथे अंतिम अजित पॅलेस हॉटेल समोर पाईपड्रेन बांधणे — रु. २,०५,०००/-

७) मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत रस्ते क्रॉसिंग करीता आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे — रु. ४,७५,८०९/-

८) मुख्य कार्यालय इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर फर्निचर काम सोफा, कारपेट, सिलिंग, रंगकाम करणे. — रु. ४,७८,३००/-

९) मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत रस्त्यावरील स्पीड ब्रेकरवर सफेद पट्टे मारणे — रु. ५०,०००/-

अ.क्र.	**ठेकेदाराचे नांव**	**दर**
१.	मे. एम. एस. एन्टरप्राईजेस	११.६०% जास्त दराने
२.	मे. वित्रग कंन्स्ट्रक्शन	१२.००% जास्त दराने
३.	मे. निलेश एन्टरप्राईजेस	अंदाजपत्र दराने

वरील पैकी **मे. निलेश एन्टरप्राईजेस** यांचे दर मंजूर करण्यांत आलेले असून सदर कामी मंजूर दराने रु. ५०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील कामाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. वरील प्रमाणे अवलोकन करण्यात आले.

~~सूचक~~ :-

~~अनुमोदन~~ :-

~~सदर सर्वानुमते मंजूर~~

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.३०/१/२००३

प्रकरण क्र.८६ :- सुधारित अंदाजपत्रके व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणे बाबत.

ठराव क्र. ४७० ८८

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध भागात विकासाची कामे सुरु आहेत. सदर कामांची खालील प्रमाणे सुधारित अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

१) भाईंदर पूर्व गोडदेव नाका ते रेल्वे फाटक पर्यंत रस्त्यालगत डाव्या बाजूस फुटपाथ तयार करणे

मुळ अंदाजपत्रक रु. २३,६७,०३९/-
सुधारित अंदाजपत्रक रु. ३१,६९,९१६/-

वरील कामाचे मूळ अंदाजपत्रक हे अस्तित्वात असलेल्या गटारावरील बांधकामावर कोपिंग भरुन त्यावर स्लॅब टाकणे व रस्त्याच्या विरुध्द बाजूस सोलिंग पिसीसी करुन रुंद असा फुटपाथ करणे कामाचे होते. प्रत्यक्षात रस्ता रुंदीकरण करतेवेळी जुनी गटारे तोडून आतील बाजूस नव्याने गटार बांधल्याने कामाच्या अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

२) प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका (बी.पी.रोड) डाव्या बाजूस पाथवे तयार करणे.

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूची) रु.२६,४०,१५७/-
मंजूरी निविदा (सन २०००-०१ दरसूची नुसार
१९.५०टक्के जास्त दराने) नुसार होणारा खर्च रु.३४,७१,६१०/-

सदर कामाच्या मूळ निविदातील दर सन ९८-९९ च्या दरसूचीतील असून निविदाची तुलना २०००-०१ च्या दरसूचीशी करुन मंजूर केल्याने त्यानुसार होणारा सुधारित खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

३) नवघर जुना तलाव आतिल बाजूस कुंपण भिंत बांधणे.

मुळ अंदाजपत्रक रु. २४,७१,९९८/-
सुधारित अंदाजपत्रक रु. २६,८०,५०४/-

वरील कामाच्या मूळ अंदाजपत्रकात तलावातील आतिल कुंपणभिंती हया दगडी बांधकामाच्या होत्या. प्रत्यक्षात तात्कालिन आयुक्त यांच्या आदेशानुसार दगडी बांधकामाऐवजी कॉक्रीट कुंपणभिंत घेतल्याने (तीन टप्पे) प्रत्यक्षात कामात वाढ झालेली असल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

४) मिरा रोड नियोजित स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता खडीकरण/डांबरीकरण करणे.

मूळ अंदाजपत्रक रु. २४,९०,४६८/-
सुधारित अंदाजपत्रक रु.३०,०६,४६९/-

मिरा रोड येथे खाजगी संस्थे मार्फत हिंदू स्मशानभूमी, दफनभूमी व ब्युरल ग्राऊण्ड स्वखर्चाने विकसित करण्याचे काम सुरु आहे. ब्युरल ग्राऊण्ड हे नाल्यापलिकडे असून रस्त्याची उंची वाढविल्याने प्रत्यक्ष कामात वाढ झालेली आहे. सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

५) मिरा रोड येथे १०० फुटो नियोजित रस्त्याचे खडीकरणासहित डांबरीकरण करणे (फाऊट ते शांती विहार)

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूची) रु.४५,४२,२०६/-
मंजूर निविदा नुसार (३१ टक्के जास्त)
होणारा खर्च रु.५९,५०,२९०/-

६) मिरा रोड येथे १०० फुटो नियोजित रस्त्याचे खडीकामासहीत डांबरीकरण करणे (शांती विहार ते मातृछाया)

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूची) रु.४०,३७,५१७/-

मंजूर निविदा नुसार(३१ टक्के जास्त) होणारा खर्च रु.५२,८९,१४७/-

७) मिरा रोड येथे १०० फुटो नियोजित रस्त्याचे खडीकरणासहीत डांबरीकरणे करणे (मातृछाया ते सुवर्णसंध्या)

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूची) रु.६०,२८,८२७/-

मंजूर निविदानुसार (३१टक्के जास्त)होणारा खर्च रु.७८,९७,७६४/-

८) मिरा रोड येथे १०० फुटी डी.पी.रोडवर पूल बांधणे.

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूची) रु.४६,४७,९५९/-

मंजूर निविदानुसार (१२.४५टक्के जास्त)होणारा खर्च रु ५२,२६,६३०/-

वरील पैकी अ.क्र.५ ते ८ ही कामे अकराव्या वित्त आयोगातील तरतूदी मधून प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर कामांची अंदाजपत्रके ही सन ९८-९९ या वर्षाच्या जिल्हा दरसूचीतील दरानुसार असून प्रत्यक्षात कामाचे कार्यादेश देतेवेळी सन २०००-०१ या वर्षाच्या जिल्हा दरसूची उपलब्ध असल्याने सदर दरसूचीशी तुलना करुन निविदा मंजूर करण्यात आलेली होती. त्यानुसार सुधारित होणारा खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

९) भाईंदर पूर्व रेल्वे फाटक ते उड्डाणपूल पर्यंतचा काशिमिरा रोड डांबरीकरण करणे.

मूळ अंदाजपत्रक (सन९७-९८) रु. ४०,११,६२०/-

मंजूर दरानुसार (३२टक्के जास्त) होणरा खर्च रु.५२,८३,२२३/-

वरील कामाचे मूळ अंदाजपत्रक हे सन ९७-९८ या दरसूचीनुसार असून प्रत्यक्षात काम देते वेळी सन २०००-०१ या वर्षाच्या दरसूचीशी तुलना करुन निविदा दिलेली आहे. त्यामुळे वाढीव खर्च होत आहे.

१०) भाईंदर पूर्व महाराष्ट्र मित्रमंडळ ते गोडदेव नाका उजव्या बाजूस पाचवे तयार करणे.

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूचीनुसार) रु.२०,००,०२३/

१९.५०टक्के जास्त दराने मंजूर निविदा

(सन २०००-०१ च्या दरसूचीनुसार)होणारा खर्च रु.२३,९०,०२७/-

सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक सन ९८-९९ या वर्षातील असून काम देते वेळी सन २०००-०१ ची दरसूची उपलब्ध असल्याने त्याच्याशी तुलना करुन काम दिल्याने होणा-या खर्चात वाढ झाली आहे.

११) लोढा पार्क ते फ्लाय ओव्हर जंक्शन पर्यंतचा ६० फुटीचा रोड खडीकरण करुन डांबरीकरण करणे.

मूळ अंदाजपत्रके रु.३५,६९,९९१/-

सुधारित अंदाजपत्रके रु.४०,५९,९९१/-

सदर कामाच्या ठिकाणी जागेबाबत वाद उत्पन्न झाल्याने नागरिकांच्या सोयीकरिता उड्डाणपूल जंक्शन ते चंद्रेश इमारतीकडून जाणारा रस्ता तयार करुन घेतलेला आहे. (खडीकरण) सदरचा रस्ता डांबरीकरण करावयाचा असल्याने मूळ अंदाजपत्रकासोबत सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

१२) प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका (बी.पी.रोड) उजव्या बाजूस पाथवे तयार करणे.

मूळ अंदाजपत्रक (सन ९८-९९ दरसूचीनुसार) रु.२६,७३,३०५/-

मंजूर निविदानुसार (सन २०००-०१ च्या दरसूचीवर

१५टक्के जास्त दराने) होणारा खर्च रु. ३०,७४,३०१/-

सदर कामाचे मुळ अंदाजपत्रक सन ९८-९९ या वर्षातील असून काम देते वेळी सन २०००-०१ ची दरसुची उपलब्ध असल्याने त्याच्यांशी तूलना करुन काम दिल्याने होणा-या खर्चात वाढ झाली आहे.

वरील प्रमाणे अ.क्र.१,२,५,६,९,१०,११, पूर्ण झालेली असून ३,४,७,८,१२ ही कामे प्रगती पथावर आहेत. तरी सुधारित अंदाजपत्रके व खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- श्री हरेश्वर गावंड

अनुमोदन:- श्री चंद्रकांत वैती

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा दि. २०/ १ /२००३

विषय :-८७ विषेश कार्यअधिकारी (सार्वजनिक आरोग्य) या पदावर श्री. डॉ. बी. एस. बावसकर यांची नियुक्ती करणे बाबत.

ठराव क्र. :- ८९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८/२/२००२ रोजी झालेली असून २००१ या वर्षी झालेल्या जनगणने नुसार महानगरपालिकेची लोकसंख्या ५,२०३०१ इतकी आहे. महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ७९ कि.मी इतके आहे. महानगरपालिकेच्या वाढत्या समस्या पहाता महापालिकेकडे विषेश कार्यअधिकारी (सार्वजनिक आरोग्य) असणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिकेवर ३१/१२/२००३ पर्यंत घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प पुर्ण करणे बंधणकारक असल्याने सदरचा प्रकल्प उभारणे, देखभाल करणे व या प्रकल्पा करीता योग्य मार्गदर्शन करणे, तसेच घन कचऱ्या पासुन खत निर्मीती करणे व व्यवस्थापन पाहणे, पालिकेच्या वैद्यकीय सुविधा पुरविण्याचा आरोग्य प्रस्ताव तयार करणे, संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान प्रभावी व यशस्वीरित्या राबवण्यास मार्गदर्शन करणे इत्यादी आरोग्य विषयी कामाकरीता विषेश कार्यअधिकाऱ्याची (सार्वजनिक आरोग्य) आवश्यकता आहे. या करीता श्री. डॉ. बी. एस. बावसकर यांनी दि.२६/१२/२००२ रोजी महानगरपालिकेस विषेश कार्यअधिकारी (सार्वजनिक आरोग्य) या पदावर नेमणूक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.

श्री. बावसकर १९८६ पासुन ते २००२ साला पर्यंत ठाणे, महानगरपालिका अस्थापनेवर वरील पदावर कार्यरत होते. सदर कालावधीत त्यांनी ठाणे, मनपा मध्ये दोन ३५० व ७०० खाटांची रुग्णालये स्थापन केलेली आहेत. तसेच राजिव गांधी वैधकीय महाविद्यालयाची स्थापना त्यांनी केलेली आहे. घन कचरा व्यवस्थापन या विषया मध्ये १९८८ साली इंग्लड येथे प्रशिक्षण पुर्ण कलेले आहे, ठाणे मनपा. मध्ये घनकचऱ्या पासुन खत निर्मिती प्रकल्प कार्यान्वयीत करण्यामध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग होता. शासनाचे सार्वजनिक आरोग्य संदर्भातील सर्व कार्यक्रम त्यांनी प्रभावीपणे राबविलेले असुन देशातील सर्वात स्वच्छ शहराचा बहुमान ठाणे शहरास श्री. डॉ. बावसकर यांच्या कारकींदीत मिळालेला आहे.

तरी वरील बाबींचा विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार श्री. डॉ. बी. एस. बावसकर यांना विषेश कार्य अधिकारी (सार्वजनिक आरोग्य) म्हणुन तात्पुरते ६ महिण्यांसाठी नेमणूक करण्यास त्यांना ठाणे, मनपामध्ये स्वेच्छा निवृत्ती वेळी प्राप्त होत असलेल्या वेतना इतके मासिक मानधन रक्कम **रू.** /- अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. तुलशीदास म्हात्रे (सही)

अनोमदक:- श्री. मिलन म्हात्रे (सही)

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १०/०१/२००३

प्रकरण क्र. ८८ :- **जनसंपर्क अधिकारी मानधनावर नेमणेबाबत.**

ठराव क्र. ९० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमधून सदरचे पद भरणेचे असल्याने सदरचे पद प्रतिनियुक्तीने अथवा बाहेरुन भरणेंत येऊ नये यांस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. लिओ कोलासो. **अनुमोदन :- श्री. तुळशिदास म्हात्रे.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १८/०१/२००३

प्रकरण क्र. ८९ :- **दि. ०४/०१/२००३रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ९१ :-

दि. ०४/०१/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्री. अशोक पाटील. **अनुमोदन :- श्री. धनराज अग्रवाल.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.१८/१/०३

गोषवारा.

प्रकरण क्रं :- ८०

ठराव क्रं. ९२:-- मालमत्ता कराच्या (भाडे मुल्यावरील) दरात वाढ करणेबाबत.

तत्कालीन मिरा भाईंदर महानगरपालिकेस माहे. ऑगस्ट १९९७ मध्ये अ वर्ग प्राप्त झालेला आहे. मिरा भाईंदर नगरपालिका भाडे मुल्याच्या रक्कमेवर २३ टक्के घरपट्टी आकारत होती. परंतु सन १९९८-९९ पासून नगरपालिकेने सदर दरात वाढ करुन तो दर २५ टक्यांपर्यंत केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने (तत्कालीन नगरपालिका) शहरातील ५० द.ल.ली. पाणीपुरवठा योजने करिता एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज रुपाने निधी उपल्बध करुन घेतलेला आहे. सदरचा कर्जरुपी निधी उपल्बध करुन घेतांना तत्कालीन नगरपालिकेने उपरोक्त संस्थेशी केलेल्या करार नाम्यातील अटोशर्ती नुसार (शेडयूल) एकत्रित मालमत्ता कराचा दर सन २०००-०१ पासून २५ टक्यावरुन २८ टक्के करण्यांस मान्यता दिलेली होती. सदर दर वाढ करणे कामी तत्कालीन नगरपारिषदेने मान्यता दयावयास हवी होती. परंतु याबाबत त्यावेळी निर्णय होवू शकला नाही. या करिता आज दि. १८/१/२००३ च्या स्थायी समितीच्या शिफारशीसह एकत्रित मालमत्ता कराचा दर २५ टक्यावरुन २८ टक्के करण्यास सन २००३-०४ पासून हि सभा सदर विषय महासभेस मंजूरी करीता ठेवणेस शिफारस करीत आहे.

सुचक :- Hasanale 18/1/03   अनुमोदक :- 18/1/03

श्रीमती ज्योत्सना हसनाळे   श्री. हरेश गांवड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक १८/१/२००३

ठराव

प्रकरण क्र. ९१ :- नविन नळ कनेक्शन मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत.

ठराव क्र. :- ९३

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे दिनांक १६/१०/१९९३ पासून नळजोडण्या देण्याचे बंद करण्यात आले होते. अतिरिक्त ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना अंशतः कार्यान्वित झाल्याने शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे प्रशासकिय ठराव क्र. १२४ दिनांक २८/६/२००२ अन्वये नविन नळजोडण्या देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नविन नळजोडण्यांसाठी दिनांक १५/१/२००३ पर्यंत ११६७७ अर्जाची विक्री झाली असून ६८५९ अर्ज अर्जदारांनी भरून सादर केले आहेत त्यापैकी एकूण ४१३ नळजोडण्या मंजूर केल्या आहेत.

शासनाच्या परिपत्रक क्र. जी.ई.एन./१०९६/४५/प्र.क्र. १५/नवि-२७ दिनांक ४ मार्च १९९३ अन्वये व शासनाच्या नगरविकास विभागाचे पत्र क्र. प्र.क्र. अनबा/१७९६/७४०/प्र.क्र. १००/९६/नवि-२० दिनांक २३ ऑगस्ट १९९६ च्या निर्देशानुसार व मा. स्थायी समितीमध्ये झालेल्या निर्णयानुसार खालील अटीशर्तीपैकी कोणतीही एक अट पुर्ण करणाऱ्यास व त्याचा पुरावा सादर करणाऱ्या अर्जदारांना नविन नळ कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

१) मिळकत दिनांक १/१/९५ पुर्वीची असल्यास व सदर मिळकतीस कराची आकारणी दिनांक १/१/९५ पुर्वी झाली असल्यास कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

२) मिळकतीस बांधकाम परवाना व भोगवटा दाखला असल्यास कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

३) मिळकत दिनांक १/१/९५ पुर्वीची आहे परंतु सदर मिळकतीस कराची आकारणी दिनांक १/१/९५ नंतर झाली आहे अशा मिळकतीस त्यांनी मिळकतीच्या अस्तीत्वाबाबत किंवा त्यातील रहिवासाबाबत खालीलपैकी कोणताही एक पुरावा दिल्यास त्यांना नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

मिळकतीमधील कोणत्याही एका रहिवाश्याचा दिनांक १/१/९५ पुर्वीची शिधावाटप पत्रिका

किंवा

मिळकतीमधील कोणत्याही एका रहिवाश्याचे दिनांक १/१/९५ पुर्वीचे इलेक्ट्रीक बिल

किंवा

मिळकतीमधील कोणत्याही एका रहिवाश्याचे दिनांक १/१/९५ पुर्वीचे दुरध्वनीते बिल.

किंवा

मिळकतीमधील कोणत्याही एका रहिवाश्याचे दिनांक १/१/९५ पुर्वीचा पासपोर्ट

किंवा

मिळकतीमधील कोणत्याही एका रहिवाश्याचे दिनांक १/१/९५ पुर्वीचे कोणत्याही विभागाचे शासनाचे लायसन्स, परवाना किंवा प्रमाणपत्र, मतदान यादीतील नाव किंवा इतर पुरावा

किंवा

मिळकतीमधील कोणत्याही एका व्यक्तिचा दिनांक १/१/९५ पुर्वीचा नगरपालिकेचा जन्माचा किंवा मृत्युचा दाखला

किंवा

मिळकतीमधील कोणत्याही एका व्यक्तिचा दिनांक १/१/९५ पुर्वीचा नगरपालिकेचा दाखला, परवाना किंवा नाहरकत प्रमाणपत्र.

उपरोक्त सादर केलेल्या पुराव्यात सदर मिळकतीचा पत्ता नमुद असणे बंधनकारक राहील.

४) मिळकतीस तत्कालिन ग्रामपंचायतीचा किंवा नगरपालिकेची बांधकाम परवानगी आहे परंतु विकासकर्त्याने भोगवटा दाखला घेतलेला नाही व त्या इमारतीस कराची आकारणी दिनांक १/१/९५ नंतर झालेली आहे व सध्या त्या मिळकतीमध्ये रहिवास आहे अशा मिळकतीस नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

५) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गावठण भागातील स्वतंत्र घर, चाळीतील घर किंवा कोणेतेही स्वतंत्र असलेले घर यांना उपरोक्त अटी-शर्तीपैकी किंवा पुराव्यापैकी कोणताही एक पुरावा सादर केल्यास त्यांना मागणीनुसार १/२ आकाराचे स्वतंत्र नळ कनेक्शन मंजुर करण्यात यावे किंवा त्यांच्या मागणीनुसार कनेक्शनचा आकार ठरवून ग्रुप कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

६) महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी भागात मागणीनुसार कनेक्शनचा आकार ठरवून फक्त ग्रुप कनेक्शन मंजुर करण्यात यावे. त्यांना स्वतंत्र नळ कनेक्शन मंजुर करण्यात येऊ नये कारण त्या भागात पुरेशा व्यासाच्या जलवाहिन्या नसल्याने व अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे त्यांना स्वतंत्र नळ कनेक्शन देता येणार नाही. तसेच सदर ग्रुप कनेक्शन मंजुर करताना दिनांक १/१/९५ पुर्वीचा सर्व ग्रुप धारकांच्या मिळकतीचा अस्तित्वाचा पुरावा सादर केल्यासच ग्रुप कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

७) इमारतीमधील कोणत्याही फ्लॅट धारकाने (घरगुती वापरासाठी) स्वतंत्र नळ कनेक्शनची मागणी केल्यास व त्या इमारतीस इमारतीचे टाकीमध्ये नळ जोडणी दिली असल्यास स्वतंत्र नळ कनेक्शन घरगुती वापरासाठी मंजुर करू नये.

८) मंदिर, मशीद, चर्च किंवा इतर कोणतेही धार्मिक स्थळ तसेच शाळा किंवा शैक्षणिक संस्था, चॅरीटेबल हॉस्पीटल, शासकीय कार्यालये यांनी नळ कनेक्शनची मागणी केल्यास व सदर संस्था रजिस्टर केलेल्या आहेत व त्यांचे बांधकाम राखीव भुखंडावर किंवा शासकीय जागेवर झालेले नाही व त्याबाबत कोणतीही न्यायालयीन बाब सुरू नाही अशांना स्वतंत्र नळाचे कनेक्शन घरगुती दराने मंजुर करण्यात यावे.

९) कोणत्याही रजिस्टर संस्था किंवा रजिस्टर सामाजिक संस्था यांनी सार्वजनिक ठिकाणी महानगरपालिकेची परवानगी घेऊन नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी स्वखर्चाने पाणपोई बांधल्यास त्या पाणपोईस स्वतंत्र नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात यावे व त्यासाठी फक्त कनेक्शन मंजुर करतांनाचे सर्व चार्जेस आकारण्यात यावे व त्यांना पाण्याचे बिल आकारण्यात येऊ नये.

१०) सदर नळ कनेक्शन मंजुर करताना मिळकतीमधील असलेले एकूण फ्लॅट्स व दुकानांचे गाळे ज्यांना इमारतीच्या टाकीमधुन पाणीपुरवठा होत आहे त्यांना त्यांच्या एकूण संख्येच्या प्रति १५ गाळ्यास / फ्लॅट्सला १ इंच आकाराचे १ कनेक्शन या निकषाप्रमाणे नळाचे कनेक्शन घरगुती दराने मंजुर करण्यात यावे व त्यामिळकतीमधील ज्या दुकानांच्या गाळ्यांचा पाण्याचा वापर जास्त प्रमाणात आहे. (उदा. हॉटेल, औद्यागिक गाळा,दुध डेअरी इ.) त्यांना त्यांच्या मागणीनुसार व गरजेनुसार स्वतंत्र नळ कनेक्शन बिगर घरगुती दराने मंजुर करण्यात यावे.

११) उपरोक्त क्र. १ ते १० मधील मुद्यांनुसार नळ कनेक्शन मंजुर करताना कनेक्शनची मागणी केलेल्या मिळकतीचा सन २००२ ते २००३ या आर्थिक वर्षाचा कमीतकमी ८० टक्के कराचा भरणा केला असल्यासच नवीन नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात यावे तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षात त्या वर्षाचे कराचे व पाण्याचे बिल पाठविले असल्यास कराच्या बिलाचा कमीतकमी ८० टक्के भरणा केला असल्यास व जुन्या कनेक्शनचे संपुर्ण पाणीबिल भरणा केले असल्यासच नविन नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

१२) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ज्या मिळकतींना ग्रामपंचायत कालीन जिल्हापरिषद कालीन किंवा नगरपालिका कालीन नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात आले आहे व त्यांनी त्यावेळी नळ कनेक्शनसाठी आवश्यक सर्व रक्कम भरणा केली आहे. परंतु नळ कनेक्शन जोडणी करून दिलेली नाही त्यांना नळजोडणी त्वरित करून देण्यात यावी व पाणी बिलाची आकारणी जोडणीच्या तारखेपासून सूरू करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ मधील कोणत्याही एका अटीशर्तीची पूर्तता केल्यास किंवा कोणताही एक पुरावा सादर केल्यास व क्र. ११ ची पुर्तता केल्यासं (ज्या मिळकतींना लागु असेल फक्त त्यांना) व सदर मिळकतीची कोणत्याही प्रकारची न्यायालयीन बाब सुरू नसल्यास त्यांनाच नळाचे कनेक्शन मंजुर करण्यात यावे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे दिनांक १६/१०/९३ पासून नविन नळाचे कनेक्शन देण्याचे बंद केले असल्यामुळे व हे शहर मुंबई महानगराच्या लगत असल्यामुळे त्याची झपाट्याने वाढ झाली आहे व शहरात मोठ्या प्रमाणात विकासकर्त्याने अनधिकृत बांधकामे दिनांक १/१/९५ नंतर देखील केली आहेत व अशा मिळकतीमध्ये सध्या नागरिकांचा रहिवास आहे व त्यामुळे त्यांना मानवतेच्या दृष्टिकोनातून पाणी पुरवठ्यापासून वंचित ठेवता येणार नाही व त्यामुळे यापुर्वी शहरात झालेल्या मोठ्या प्रमाणातील अनधिकृत नळजोडणीप्रमाणे पुनश्च अनधिकृत नळजोडण्या होण्याची शक्यता असल्यामुळे व त्यापासून अशा नागरिकांना परावृत्त करणेसाठी शासनास मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत **'खास बाब'** म्हणुन ज्या अनधिकृत मिळकती दिनांक १/१/९५ नंतर झाल्या आहेत व त्यात सध्या रहिवास आहे अशा मिळकतींना नळाचे कनेक्शन मंजुर करणेसाठी **'खास बाब'** म्हणुन मान्यता मिळणेबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

उपरोक्त दिलेल्या निर्देशानुसार नळ कनेक्शन मंजुरीबाबत त्वरित कार्यवाही सुरू करण्यात यावी त्यानुसार नविन नळ कनेक्शन मंजुर करण्यास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

सुचक :- शशीकांत शहा   अनुमोदन :- याकुब कुरेशी

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १८/०१/२००३

प्रकरण क्र. ९२ :- **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वातील सार्वजनिक नळ (स्टँड पोस्ट) बंद करणेबाबत.**

ठराव क्र. ९४ :-

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत दि. १६/१०/१९९३ पासून नविन नळ कनेक्शन देणे बंद करण्यात आलेले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सार्वजनिक नळांचे कनेक्शन (स्टँड पोस्ट) देण्यांत आले असून सदर स्टँड पोस्ट मधून सध्या मोफत पाणी पुरवठा होत आहे. महानगरपालिकेत होणाऱ्या पाणी पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे प्रशासकीय ठराव क्र. १२४, दि. २८/६/२००२ अन्वये शहरात नविन नळ कनेक्शन देण्याचा निर्णय झाला असून त्यानुसार नविन नळ कनेक्शन शासन वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशानुसार देण्यात येत आहेत. सदर प्रशासकीय ठरावानुसार शहरातील आदिवासी भागाव्यतिरिक्त असलेले सर्व सार्वजनिक स्टँड पोस्ट बंद करुन त्याऐवजी ग्रुप कनेक्शन मंजूर करावेत किंवा सदर स्टँड पोस्टचे रुपांतर ग्रुप कनेक्शनमध्ये करावे असा निर्णय झाला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व सार्वजनिक स्टँड पोस्टचे सर्वेक्षण केले असून १/२ व्यासाचे १२३, ३/४ व्यासाचे ३५ व १ व्यासाचे ३२१ स्टँड पोस्ट (एकूण ४७९ स्टँड पोस्ट) असून त्याद्वारे मोफत पाणी पुरवठा सुरु आहे. सदर स्टँड पोस्टमधून दररोज सुमारे २.५० द.ल.लि. पाणी पुरवठा मोफत होत असल्यामुळे त्यापासून महापालिकेस महसूल उत्पन्न मिळत नाही मात्र शासनाच्या आदेशानुसार ना नफा ना तोटा या तत्वावर पाणी योजना राबवायची असल्याने महसूली उत्पन्न बुडविणारे स्टँड पोस्ट बंद करणे क्रम प्राप्त आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्वेक्षणानुसार आलेल्या एकुण ४७९ स्टँड पोस्टपैकी आदिवासी भागातील सार्वजनिक स्टँड पोस्ट वगळून शहरी भागातील स्टँड पोस्ट, स्थानिक नगरसेवक व तेथील नागरिक यांना अवगत करुन त्वरित बंद करण्यात यावे. नविन नळ कनेक्शन देण्याससाठी झालेल्या धोरणानुसार गावठण भागातील स्वतंत्र घर, चाळीतील घर किंवा कोणतेही स्वतंत्र घर यांना स्वतंत्र नळ कनेक्शन किंवा ग्रुप कनेक्शनची मागणी झाल्यास ग्रुप कनेक्शन मंजुर करण्यांत यावे व त्या भागातील स्टँड पोस्ट बंद करण्यांत यावे. तसेच झोपडपट्टी असलेल्या भागातील स्थानिक नगरसेवक व तेथील नागरिक यांना अवगत करण्यात यावे व उपरोक्त नमूद सर्व कार्यवाही दिनांक ३१/३/२००३ पर्यंत पूर्ण करण्यांत यावी. सदर कार्यवाही पूर्ण केल्याने त्यातून महानगरपालिकेला नविन नळ कनेक्शन चार्जेस, अनामत रक्कम व बोरींग चार्जेस यापोटी सुमारे ४८ लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे व त्या कनेक्शनमधून होणाऱ्या पाणी पुरवठ्यातून कायमस्वरुपी वार्षिक सुमारे ४५ ते ५० लाख रुपये पाणीपट्टीच्या माध्यमातून उत्पन्न सुरु होणार आहे व सार्वजनिक स्टँड पोस्टमधून होणाऱ्या पाण्याच्या अपव्ययावर पायबंद बसणार आहे.

तरी उपरोक्त नमूद कार्यवाही करणेंस मा. स्थायी समितीची मंजूरी असून त्वरित कार्यवाही सुरु करण्यांत यावी.

सुचक :- श्री. दिनेश नलावडे. **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती दि. १८/०१/२००३

प्रकरण क्र. ९२ :-   पाणीपट्टी दर निश्चित करणेबाबत.

ठराव क्र. ९५ :-

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत पूर्वी राबविण्यात आलेल्या ३१ द.ल.लि. योजनेतून यापूर्वी सुमारे २४ ते २५ द.ल.लि. व मुंबई महानगरपालिकेमार्फत ०.५ द.ल.लि. असा एकूण २४.५ ते २५.५ द.ल.लि. पाणी पुरवठा दररोज याप्रमाणे शहरास सुमारे ५० ते ६० तासांनी एक ते दिड तास झोन पध्दतीने पाणी पुरवठा होत होता. आता शहरासाठी राबविलेल्या अतिरिक्त ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेतुन सुमारे ३० ते ३३ द.ल.लि. पाणी पुरवठ्याने वाढ झाली असून शहरास आजमितीस एकूण ५५ ते ५८ द.ल.लि. दररोज पाणी पुरवठा होत आहे. सदर पाणी पुरवठा स्टेम प्राधिकरण व मुंबई महानगरपालिका यांचेकडून रु.४/- प्रतिहजार लिटर या दराने होत असून या व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या आस्थापना खर्च, पंपींग स्टेशनचे विज बील व देखभाल व दुरुस्ती, वितरण व्यवस्थेची देखभाल व दुरस्ती, टँकरद्वारे करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्या खर्च व इतर आकस्मित खर्च असा सुमारे १७.०० कोटी वार्षिक खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेमार्फत नागरीकांना रु. ३.८० प्रतिहजार घरगुती वापरासाठी व रु. १५/- प्रतिहजार लिटर बिगर घरगुती वापरसाठी पाणीपट्टीचा दर आकारण्यात येत असून त्याद्वारे सुमारे ३.१८ कोटी वार्षिक महसुली उत्पन्न (सन २००१-०२ या आर्थिक वर्षात) झाले आहे. शासनाच्या निर्देशानुसार पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे होणारी तुट भरुन काढणेसाठी महसुली उत्पन्न व महसुली खर्च यांचा मेळ घालण्यासाठी पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. तसेच ५० द.ल.लि. योजनेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून कर्ज घेताना त्यांचे सोबत केलेल्या करारनाम्यात त्यांनी ५० द.ल.लि. योजनेतुन वाढीव पाणी पुरवठा सुरु झालेनंतर पाणीपट्टी दरवाढ करणेबाबत सुचविले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिटर पध्दतीने दि. ०१/०४/२००३ पासून खालीलप्रमाणे दर आकारण्यास येतील.

<u>मिटर पध्दतीने आकारावयाचा प्रस्तावित दर :-</u>

अ.क्र.	पाणी वापराचा प्रकार	सद्या आकारण्यात येणारा पाणीपट्टीचा दर	प्रस्तावित पाणीपट्टीचा दर
१	घरगुती वापरासाठी	रु. ३.८० प्रति १००० लिटर्स	रु. ७.०० प्रति १००० लिटर
२	बिगर घरगुती वापरासाठी	रु. १५.०० प्रति १००० लिटर्स	रु. २८.०० प्रति १००० लिटर

मिटर पध्दतीने पाणी पुरवठा करताना जर मिटर बंद असल्यास सरासरी पध्दतीने खालीलप्रमाणे बिल आकारण्यात यावे. नल जोडणीच्या व्यासानुसार प्रति महिना प्रस्तावित सरासरी दर :-

अ.क्र.	नळ जोडणीचा व्यास	घरगुती	बिगर घरगुती
१	१/२ व्यास	२००/-	८००/-
२	३/४ व्यास	१०००/-	४०००/-
३	१ व्यास	२०००/-	८०००/-
४	१.१/२ व्यास	३०००/-	१२०००/-
५	२ व्यास	५०००/-	२००००/-

वरील प्रमाणे दिनांक ०१/०४/२००३ पासून पाणीपट्टी दर लागु करणेस मा. स्थायी समितीची मंजुरी देण्यात येत असून अंतिम मंजुरीसाठी मा. महासभेपुढे शिफारस असे.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी   **अनुमोदक :- श्री. तुळशीदास म्हात्रे**

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २३/०१/२००३

प्रकरण क्र. ९४ :- दि. १०/०१/२००३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ९६ :-

दि. १०/०१/२००३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- शरदपाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समितीची सभा दि. २३/१/२००३

प्रकरण क्रं :- ९५ : महापौर चषकासाठी देण्यात येणारी अग्रिम रक्कम ही मिरा भाईंदर महानगरपालिका महापौर चषक क्रिडा समितीकडे हस्तांतरण करणेबाबत.

ठराव क्रं : ७७

मिरा भाईंदर महानगरपालिका महापौर चषकासाठी शुटिंगबॉल, क्रिकेट, कबड्डी असे खेळ आयोजित केलेले आहेत या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रं. ९६ दि. २८/११/२००२ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. सदर ~~खेळाच्या~~ चषकासाठी अग्रिम रु. ८ लाख महापौर चषक क्रिडा समितीकडे वर्ग करणेची शिफारस केलेली आहे. परंतु लेखा संहिता १९७१ चे नियम १४० नुसार सदरची अग्रिम रक्कम मा. स्थायी समितीच्या शिफारशीने ~~मा. कार्यकारी~~ कनिष्ठ अभियंता किंवा प्रभारी सचिव यांचे ~~कडे देण्यास शिफारस केलेली आहे तरी सदरच्या महापौर चषक कला क्रिडासाठी रक्कम रु ८ लाख (अग्रिम) देणेस ही सभा मंजूरी देत आहे~~. नावे रक्कम रु ५ लाख अग्रिम देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक : श्री याकुब कुरेशी.   अनुमोदन : श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.

२३/१/०३

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २३।१।२००३

प्रकरण क्रं : ९६ :- महासभा व स्थायी समिती सभेकरिता लागणाऱ्या चहा, नास्ता खर्चाचे देयकास मंजूरी देणे बाबत.

ठराव क्रं :- ९८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रत्येक आठवड्यात एक स्थायी समिती सभा व प्रत्येक महिन्यात एक महासभा भरविण्यात येत असते. स्थायी समिती सभा तसेच महासभेत मा. सदस्यांना, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना चहा, नास्ता जेवण इ. ची व्यवस्था महानगरपालिके मार्फत करणेत येत असते या कामी आतापर्यंत झालेल्या खर्चास तसेच यापुढे होणाऱ्या सतत सभेच्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

Ghasmale 23/1/03

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे   अनुमोदन : श्री. हरेश गांवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि.२३.१.२००३

प्रकरण क्र. ८७ :- नवघर शाळेचे मैदान शैक्षणिक व सामाजिक संस्थांनाच कार्यक्रमासाठी देणेबाबत.

ठराव क्र. ८८

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा क्र.१३, नवघर गांव येथील मैदान नागरिक / खाजगी संस्था यांच्या मागणीवरुन विविध कार्यक्रमांसाठी त्यांना देण्यांत येते. परंतु सदर संस्था/ नागरीक कार्यक्रमाचे वेळी ध्वनीक्षेपकाचा आवाज जास्त प्रमाणांत ठेवत असल्याने या परिसरातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यांस अडचण निर्माण होते. तसेच ध्वनी प्रदुषण होते. सदरचे कार्यक्रम पूर्ण झाल्यावर आयोजकांमार्फत तयार झालेला कचरा आयोजक न उचलता तसाच टाकून जातात. कार्यक्रमाचेवेळी शाळा क्र.१३ मधील विद्यार्थ्यांना व इतर खेळाडूंना सदर मैदानावर खेळण्यास अडथळा निर्माण होतो. व सकाळी मॉर्निंग वॉकसाठी नागरिकांना त्रास होतो. अशा प्रकारच्या तक्रारी लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांकडून वारंवार येत असतात.

तरी सदरचे मैदान सर्वांना कार्यक्रमासाठी न देता फक्त शैक्षणिक व सामाजिक संस्थानाच देणेबाबत विषय सूंपर्ण माहितीसह पुढील सभेत घेण्यात यावा

सूचक :- श्री. दिनेश द. नलावडे | अनुमोदन :- श्री. तुळशीदास द. म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.स्थायी समिती सभा दि.२३/०१/२००३

प्रकरण क्र. ९८ :- भाईंदर (पूर्व) फाटक पाण्याच्या टाकीच्या बाजूने ते काशिमिरा रोड झुणकाभाकर केंद्र उघाडी पर्यंत नाला बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत..

ठराव क्र. १००

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) फाटक पाण्याच्या टाकीच्या बाजूला कच्चा नाला असून नाल्याचे पाणी पूर्वेकडून पश्चिमेस जाते. सदर ठिकाणी रेल्वे रुळाखालून पाईप टाकलेले असून सदर पाईप फुटलेले आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थितपणे होत नाही. तरी सदर पूर्वेकडील नाल्याचे पाणी काशिमिरा रोडवरील बांधलेल्या उघाडी पर्यंत नेल्यास पाण्याचा निचरा चांगल्याप्रकारे होईल. तसेच पावसाळयात जमा होणारे पाणी निचरा होईल. सदर कामी रु.४३,१९,०००/- मात्र एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर कामी होणा-या खर्चास सन २००३-०४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. सदर कामाचा खर्च हा २००३-०४ या वर्षातच होणार असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- सौ. ज्योत्सना हस्नाळे (Hasnale 23/1/03)

अनुमोदन :- श्री हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

९२३

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.स्थायी समिती सभा दि. २३/०१/२००३

प्रकरण क्र.९९ :- मिरा रोड नियोजित स्मशानभूमी ब्यूरल ग्राऊण्डकडे जाणारा रस्ता तयार करणे कामाबाबत.

ठराव क्र. १०१

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड (पूर्व) येथे विकास आराखडयातील आरक्षणे (हिंदू स्मशानभूमी, मुस्लिम दफन भूमी, ख्रिश्चन हयूरल ग्राउण्ड) खाजगी संस्थेमार्फत विकसित करण्याचे काम प्रगती पथावर आहेत. सदर कामी मा.तत्कालिन आयुक्त, मा.उपमहापौर यांच्यासोबत प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी हिंदू स्मशानभूमीने मुस्लिम दफनभूमी पर्यंतचा रस्ता तयार करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. परंतु ब्यूरल ग्राउण्डकडे जाणारा रस्ता नसलयाने त्याचे काम थांबलेले आहे. सदरचा रस्ता हा १८.०० मी.डी.पी.रोड असून त्वरित करावयाचा आहे. सदर कामी रु.२७,७६,०००/- एवढया रकमेचे अंदाजपत्रक होत आहे. तसेच रस्त्यालगत गटार बांधणे कामी रु.२५,०३,४०३/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे. सदर कामी सन २००३-०४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. आज दि.९/१/२००३ रोजी सदर रस्ता तातडीने हाती घ्यावयाची असल्याने सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री चंद्रकान्त वैती

अनुमोदन :- श्री दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

१२४

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. 23 /7 /२००३

प्रकरण क्र.१०० :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भूयारी गटाराचे सर्वेक्षण करुन प्रस्ताव तयार करणे (आराखडे व प्राकलन) कामाच्या निविदेस मंजूरी देणे.

ठराव क्र. १०२

दि.१/११/२००२ चा दैनिक नवशक्ती या वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विकास कामांकरिता ठेकेदारांनी पुढीलप्रमाणे निविदा सादर केलेल्या आहेत. याकामी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद केल्याचे प्रमाणित करण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव	
	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भुयारी गटाराचे सर्वेक्षण करुन प्रस्ताव तयार करणे (आराखडे व प्रकलन तयार करणे)	
	मे.डिझाईन गृप इंडिया	रु.१,००,००,०००/- व टक्केवारी
	मे.टोटो इंजिनिअरिंग सव्हिसेस	रु. ४५,००,०००/-
	मे.टेंडी सिस्टोग	रु. ३५,००,०००/-
	मे.टास्क इनफ्रास्ट्रक्चर	रु. ३२,००,०००/-
	मे.शहा टेक्निकल कंन्सल्ट्स प्रा.लि.	रु. ३०,४०,०००/-

वरील संदर्भिय विषयानुसार तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मे.शहर टेक्निकल कंन्सल्टंट प्रा.लि. यांनी सादर केलेली निविदा सर्वात कमी दराची आहे. सदर एजन्सीस दर वाटाघाटो करिता दि.९/१२/२००२ रोजी बोलाविले होते. मा.आयुक्त सो. यांच्या सूचनेनुसार भूयारी गटार सर्वेक्षण करुन प्रस्ताव तयार करणे (आराखडे व प्राकलन) कामा संदर्भात इतर महानगरपालिकेत संपर्क साधून माहिती घेतली असता तुलनात्मक दृष्टया खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

महानगरपालिकेचे नांव	लोकसंख्या (लक्ष)	निविदेत भरलेली रक्कम(लक्ष)	वर्ष	निविदेची आजची रक्कम १० टक्के	लोकसंख्या प्रमाणात दर रु. लक्ष/ प्रति	रस्ता लांबी	प्रति किमी दर
पिंपरी चिंचवड	१२.००	३५.००	१९९४	७२.०० लक्ष	६.००	२३६ किमी	रु.३०,५००/-
अमरावती	७.००	३०.००	१९९५	५१.०० लक्ष	७.३०	१५६ किमी	रु.३२,६९२/-
सोलापूर	१०.००	५०.००	१९९९	६५.०० लक्ष	६.५०	२०० किमी	रु.३२,५००/-
येरोडे (तामिळनाडू)	३.००	३५.००	१९९८	४९.०० लक्ष	१६.००	१५० किमी	रु.३२,६६६/-
मिरा भाईंदर	५.००	३०.४०	२००२	३०.४० लक्ष	६.००	१०० किमी	रु.३०,०००/-

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेने मागविलेल्या निविदा मधील मे.शहा टेक्नीकल कंन्सल्टंट प्रा.लि. यांची रु.३०.४० लक्ष रकमेची निविदा इतर महानगरपालिकेने दिलेली कामे, रक्कम पहाता वाजवी असल्याचे दिसून येते. सदर ठेकेदारास दरवाटाघाटो करिता बोलाविले असता त्यांनी सदरचे काम ३०.४० लक्ष ऐवजी रु.३०.०० लक्ष रकमेस करण्याबाबत पत्र दिलेले असून सदरची निविदा वाजवी असल्याने सदर निविदास व ठेकेदाराचे देयक प्रदानास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतूदीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक:- श्री हरेश गावंड

अनुमोदन :- सौ. ज्योत्सना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि. २३/१/२००३.

प्रकरण क्र. १०१ :- महानगरपालिका क्षेत्रातील फेरिवाले बाजार लिलावाच्या अटीशर्तीमध्ये पुर्नविलोकन करणेबाबत.

ठराव क्र. १०३ :-

:- भाईंदर (प.) येथील खालील रस्त्यांवर फळभाजी व किरकोळ विक्रेते आदी फेरिवाले यांना परवानगी देता येत नाही.

१) भाईंदर स्टेशन ते पालिस चौकी पर्यंत.
२) फाटक ते पोलिस स्टेशन पर्यंत
३) जनतानगरकडे जाणारा रस्ता.
४) जैन मंदिरच्या बाजूने देवचंदनगरकडे जाणाऱ्या दोन्ही गल्ल्या. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस स्टॉल व टपऱ्या लावण्यांस मनाई करावी.
५) राममंदीर रोडवर फेरीवाले बसू नयेत.
६) मोदी पटेल रोडवर फेरीवाले बसू नयेत.

वरील रस्त्यावर दोन्ही बाजूचे स्टॉल, टपऱ्या स्थलांतर करण्यांत यावेत तसेच अटीशर्तीचा भंग झाला असल्यास संबंधित स्टॉल अथवा टपऱ्या आदींचे परवाने रद्द करण्यांत यावेत

:- भाईंदर (प.) येथील खालील रस्त्यांवर फेरिवाल्यांना परवानगी देण्यांत येत आहे.

१) शास्त्रीनगर ते कमलापार्क पर्यंत रस्त्याची डावी बाजू तसेच ९० फुटी रस्त्याची डावी बाजू.
२) नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान ते मुर्धाखाडी पर्यंत रस्त्याची उजवी बाजू.
३) प्रकाश मार्केट ते जोशी निकेतन रस्त्याची उजवी बाजू.
४) चर्च ते महानगरपालिका कार्यालय (जूने) येथे फेरीवाले बसावेत. (मिना बाजार ते मोती नगर).
५) भाईंदर पश्चिम येथे आठवड्याच्या बाजाराकरीता वरील दिलेल्या रस्त्यांवर फेरीवाले बसवता येण्यांस परवानगी देण्यांत येत आहे.

:- भाईंदर (पू.) येथील खालील रस्त्यांवरफळभाजी व किरकोळ विक्रेते आदी फेरिवाल्यांना परवानगी देता येत नाही.

१) प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका ते गोडदेव उद्यान सभोवताली.
२) जागृती अपार्टमेंट ते रावल नगर ते नर्मदाकुंज.
३) बंदरवाडी नाका ते प्रशांत हॉटेल.
४) बंदरवाडी नाका ते कुणाल कुटीर नवघर रोड.
५) विजय पंजाब ते खारिगांव सत्यनारायण मंदिर ते केबीन क्रॉस रोड (सत्यनारायण मंदिर मार्ग)
६) महाराष्ट्र मित्र मंडळ ते गोडदेव गांव ते फाटक पर्यंत.
७) आर.एन.पी. पार्क, राहुल पार्क येथील रस्त्यांवर फेरीवाले बसू नयेत.

वरील रस्त्यावर दोन्ही बाजूचे स्टॉल, टपऱ्या स्थलांतर करण्यांत यावेत तसेच अटीशर्तीचा भंग झाला असल्यास संबंधित स्टॉल अथवा टपऱ्या आदींचे परवाने रद्द करण्यांत यावेत

:- भाईंदर (पू.) येथील खालील रस्त्याच्या एका बाजूला फेरिवाल्यांना परवानगी असे.

१) धनेश हॉटेल ते तलाव रोड ते गावदेवी मंदिर पर्यंत (खारिगांव)
२) परब मसाले ते साधुराम हॉटेल
३) पानटेकडी रोड (शिर्डीनगर ते गोडदेव स्मशान रोड)
४) नर्मदा कुंज (रावलनगर) ते सुलभ शौचालय उजवी बाजू.
५) रामगोपाल बिल्डीग ते शितल अपार्टमेंट रस्त्याची उजवी बाजू.
६) कुणाल कुटीर ते नवघर स्मशान रस्त्याची एक बाजू.
७) एस. एन. कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याची एक बाजू.
८) इंदवरुण हॉल ते जैन मंदिरची एक बाजू (जेसल पार्ककडे जाणारा एक रस्ता)
९) हनुमाननगर एक बाजू.

:- मिरा रोड येथील खालील रस्त्यांवर फळभाजी व किरकोळ विक्रेते आदी फेरिवाल्यांना परवानगी देता येत नाही.

१) भाईंदर (पू.) फाटक ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या पर्यंत.
२) शांतीनगर संकुलनाचे प्रवेशद्वार ते एस. के. स्टोन पर्यंतचा रस्ता.
३) स्टेशन पासून नयानगरकडे जाणारा रस्ता.
४) पोस्ट ऑफिस राजधानी अपार्टमेंट ते नाल्यापर्यंतचा रस्ता.
५) लोढा कॉम्प्लेक्स ते नरेंद्रपार्क (मिलाप अपार्टमेंट)
६) शांतीनगर पाण्याची टाकी ते सृष्टीकडे जाणारा रस्ता.

वरील रस्त्यावर दोन्ही बाजूचे स्टॉल, टपऱ्या स्थलांतर करण्यांत यावेत तसेच अटीशर्तींचा भंग झाला असल्यास संबंधित स्टॉल अथवा टपऱ्या आदींचे परवाने रद्द करण्यांत यावेत

:- मिरा रोड येथील खालील रस्त्यांवर फेरीवाल्यांना परवानगी देण्यात येत आहे.

१) उड्डाणपुल (झुणका भाकर केंद्र) ते लोढा कॉम्प्लेक्स रस्त्याची डावी बाजू.
२) नरेंद्र पार्क येथे जाणाऱ्या रस्त्यावर.
३) सेक्टर नं. २ सी-२६ ते शितलनगरच्या मोठ्या नाल्यापर्यंतच्या रस्त्याची उजवी बाजू.
४) शांतीनगर शॉपींग सेंटर ते स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याची एक बाजू.
५) सेक्टर नं. ६ ते शांतीनगरकडे जाणाऱ्या रस्त्याची एक बाजू.

:- काशिमिरा येथील खालील रस्त्यांवर फळभाजी व किरकोळ विक्रेते आदी फेरिवाल्यांना परवानगी देता येत नाही.

१) मिरा गावाच्या हायवे लगतचा रोड.
२) मिरा गावाकडे जाणारा रस्ता.
३) निलकमल ते लिबर्टी तबेल्यापर्यंत जाणारा रस्ता.

वरील रस्त्यावर दोन्ही बाजूचे स्टॉल, टपऱ्या स्थलांतर करण्यांत यावेत तसेच अटीशर्तींचा भंग झाला असल्यास संबंधित स्टॉल अथवा टपऱ्या आदींचे परवाने रद्द करण्यांत यावेत

:- काशिमिरा येथील खालील रस्त्यांवर फेरिवाल्यांना परवानगी देण्यांत येत आहे.

१) वर नमुद केलेले रस्ते सोडून बाकीच्या रस्त्यांवर फेरिवाल्यांना बसण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

वरीलप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील फळभाजी व किरकोळ विक्रेते आदी फेरीवाले रस्त्यांवर बसणेबाबतच्या अटीशर्तींचे पुर्नविलोकन झाले असून वरील प्रमाणे कार्यवाही करणेस स्थायी समिती सभेची मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- ज्योत्स्ना हसनाळे. अनुमोदन :- तुळशीदास म्हात्रे.

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.३१/१/२००३

प्रकरण क्रमांक १०२ :- निविदांना मंजूरी देणे.

ठराव क्र. १०४

दि.३.१.२००३ रोजीच्या दै.नवभारत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत. सदर कामाकरिता सन २००२-०३ या वित्तीय वर्षाकरिता तरतुद उपलब्ध आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव	अंदाजित रक्कम/दर
१.	डॉ.हेडगेवार मार्ग ते रॉयल नेस्ट अपार्टमेंट पर्यंत रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे.	रु. ९,८०,०००/-
	अ) मे.साईदत्त एन्टरप्राईजेस	२.०० % कमी दराने
	ब) मे.असफाल्ट इंडिया कार्पोरेशन	३.०० % जास्त दराने
	क) मे.अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंटस प्रा.लि.	२.०० % जास्त दराने
२.	सरदार वल्लभभाई पटेल शाळा ते रॉयल नेष्ट पर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.	रु.९,८०,०००/-
	अ) मे.असफाल्ट इंडिया कार्पोरेशन	१.५० % कमी दराने
	ब) मे.अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंटस प्रा.लि.	२.०० % जास्त दराने
	क) मे.साईदत्त एन्टरप्राईजेस	२.०० % जास्त दराने

वरील पैकी सर्वात कमी दराच्या निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये व प्रकरण ५ मधील तरतूदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.सदर कामी ठेकेदाराची वेळोवेळी येणा-या देयकाच्या प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री हरेश गावंड   अनुमोदन :- श्री चंद्रकांत वैती

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा.स्थायी समिती सभा दि. ३१/०१/०३.

प्रकरण क्र.१०३ :- मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. १०५

मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार प्राप्त अधिकारात खालील कामांना मंजुरी दिलेली आहे.

१) **बांधकाम विभागाकरीता लोखंडी कपाटे खरेदी करणे.**

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	सादर केलेले दर ६'०" उंच कपाटे	 ५'६" उंच कपाटे
अ)	मे.एम.एस.इंटरप्राईजेस	रु.३९००/- प्र.नग	रु.३०००/- प्र.नग
ब)	मे.निलेश इंटरप्राईजेस	रु.४५५०/- प्र.नग	रु.३८००/- प्र.नग
क)	मे.आदर्श कंस्ट्रक्शन	रु.४८००/- प्र.नग	रु.४१००/- प्र.नग

वरील प्रमाणे मे.एम.एस.इंटरप्राईजेस यांचे दर सर्वात कमी असल्याने मंजूर करण्यांत आलेली आहे. मंजूर दरानुसार रु.४३,८००/-एवढा खर्च अपेक्षित आहे.

२) **भाईंदर पुर्व नवघरगांव दत्तमंदिर भागातील सिमेंट कॉंक्रिट रस्ते दुरुस्ती करणे.** -- **रु.५०,०००/-**

अ)	मे. मिनल कंस्ट्रक्शन	१२.१०% जास्त दराने
ब)	में. दुर्वांकुर कंस्ट्रक्शन	१.००% कमी दराने
क)	मे. स्वामी समर्थ कंस्ट्रक्शन	११.३५% जास्त दराने

वरीलपेकी मे. दुर्वांकुर कंस्ट्रक्शन यांची निविदा सर्वांत कमी दराची असून मंजूर करण्यात आलेली आहे. सदर कामी रु.५०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शौचालये दुरुस्ती करणे.** --- **५,००,०००/-**

सदर कामाची वार्षिक निविदा मंजूर असून सदर निविदातील मंजुर असून सदर निविदातील मंजूर दराने ठेकेदाराकडून शौचालये दूरुस्तीची कामे करुन घेण्यात आलेली आहेत. मा. स्थायी समिती सभा दि. ४/१/०३ , ठराव क्र.८१ अन्वये सर्व शौचालये खाजगी संस्थांना देखभाल व दुरुस्ती करीता देण्याबाबत ठराव केलेला असल्याने दि. १/२/०३ पासून सर्व शौचालये खाजगी संस्थेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यांत येणार आहे

४) **चेणा काजूपाडा येथील स्ट्रिट लाईट वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे.**

अ. क्र	कामाचा तपशिल	ठेकेदाराचे नांव / दर		
		डायमंड इलेक्ट्रीकल कंपनी	न्यूफिल्ड	शेखर इलेक्ट्रीकल्स
१	३२ ॲम्प ॲंकर डि.पी.स्वीच	१४५/- प्र.न.दर	१२५/- प्र.न.दर	११६/- प्र.न.दर
२	कारटोंग जंक्शन बॉक्स	१३५/- प्र.न.दर	५४०/- प्र.न.दर	४५९/- प्र.न.दर
३	पी.व्ही.सी.वायर			
	अ) २.५ एम.एम	६५/- प्र.मी.दर	६५/- प्र.मी.दर	५९/- प्र.मी.दर
	ब) ४ एम.एम.	६९/- प्र.मी.दर	७०/- प्र.मी.दर	६२/- प्र.मी.दर
	क) ६ एम.एम	७५/- प्र.मी. दर	८०/- प्र.मी.दर	६४/- प्र.मी.दर
	ड) ४०/३६२ कोअर व्लेक्झीबल	१६/-प्र.मी.दर	१८/- प्र.मी.दर	१२/- प्र.मी.दर
४	१४ गेज कॉपर अर्थिंग वायर	१३/- प्र.फि.दर	१५/- प्र.फि.दर	१०/- प्र.फि.दर
५	पियनो ५ ॲम्प स्विच	१९/- प्र.न.दर	२०/- प्र.न.दर	१३/- प्र.न.दर
६	५ ॲम्प/२५०व्होल्ट ५ पीन सॉकेट	२५/- प्र.न.दर	२५/- प्र.न.दर	१५/- प्र.न.दर
७	५ ॲम्प ॲंगल होल्डर	३५/- प्र.न.दर	३०/- प्र.न.दर	२६/- प्र.न.दर
८	बेलपुश	२०/- प्र.न.दर	१९/- प्र.न.दर	१३/- प्र.न.दर
९	पेंडेंट होल्डर/सिलसंग रोज	१८/-प्र.न.दर	२०/- प्र.न.दर	१६/- प्र.न.दर
१०	टयुब लाईट साईड होल्डर	२०/-प्र.न.दर	१५/- प्र.न.दर	१३/- प्र.न.दर
११	टयुब लाईट चौक	१८५/-प्र.न.दर	१७५/- प्र.न.दर	१३५/- प्र.न.दर
१२	सिलींग फॅन रेगुलेटर (४८)	९०/-प्र.न.दर	१०५/- प्र.न.दर	७५/- प्र.न.दर
१३	एम.सी.बी.डी.पी.१५/२०/३२	४३०/-प्र.न.दर	४५०/- प्र.न.दर	३९५/- प्र.न.दर
१४	१० १२ सनमायका वुडन बोर्ड	१०५/-प्र.न.दर	९०/- प्र.न.दर	७०/- प्र.न.दर
१५	८/१० सनमायका वुडन बोर्ड	९०/-प्र.न.दर	८५/- प्र.न.दर	६५/- प्र.न.दर
१६	६/८ सनमायका वुडन बोर्ड	८३/-प्र.न.दर	७५/- प्र.न.दर	५५/- प्र.न.दर
१७	४/७ सनमायका वुडन बोर्ड	६५/-प्र.न.दर	५५/- प्र.न.दर	४५/- प्र.न.दर
१८	२० एम.एम.पी.व्ही.सी.पाईप	४५/-प्र.न.दर	४३/- प्र.न.दर	३५/- प्र.न.दर
१९	२५ एम.एम.पी.व्ही.सी.पाईप	५५/-प्र.न.दर	५५/- प्र.न.दर	४५/- प्र.न.दर
२०	सिलींग फॅन वायडिंग	४५५/-प्र.न.दर	४५०/- प्र.न.दर	३६५/- प्र.न.दर
२१	डबल वॉल बेअरिंग फॅन रिपेरिंग	३४५/-प्र.न.दर	३५०/- प्र.न.दर	२९५/- प्र.न.दर
२२	साफ्ट रिपलेसमेंट	२९०/-प्र.न.दर	२५०/- प्र.न.दर	१३५/- प्र.न.दर
२३	फ्ल्युरोसंट टयुब	७५/-प्र.न.दर	६५/- प्र.न.दर	५५/- प्र.न.दर
२४	स्टार्टर	९/-प्र.न.दर	१०/- प्र.न.दर	७/- प्र.न.दर
२५	एस व ई कॅपेसिटर १२५ वॅट	१५०/-प्र.न.दर	१४५/- प्र.न.दर	१२५/- प्र.न.दर
२६	एस व ई कॅपेसिटर १५० वॅट	२४७/-प्र.न.दर	२३५/- प्र.न.दर	२१५/- प्र.न.दर
२७	सोडियम व्ही लाईट इग्रेटर	४५०/-प्र.न.दर	४३५/- प्र.न.दर	४००/- प्र.न.दर
२८	१२५ वॅट एच.पी.एम.व्ही.बल्ब	३६५/-प्र.न.दर	३४५/- प्र.न.दर	२९५/- प्र.न.दर
२९	१२५ वॅट एच.पी.एम.व्ही.चॉक	४६९/-प्र.न.दर	४२५/- प्र.न.दर	३९५/- प्र.न.दर
३०	१५०वॅट एस.व्ही.लॅम्प	९४५/-प्र.न.दर	८५०/- प्र.न.दर	७१५/- प्र.न.दर
३१	१५०वॅट चॉक (दर्शन)	७६५/-प्र.न.दर	७३५/- प्र.न.दर	६८०/- प्र.न.दर
३२	२५० वॅट एस.व्ही.लॅम्प (फिलिप्स)	१८५/-प्र.न.दर	१७५/- प्र.न.दर	१३५/- प्र.न.दर

३३	४०० वॅट एस.व्ही.लॅम्प (फिलिप्स)	९९९/-प्र.न.दर	१०३५/- प्र.न.दर	९९०/- प्र.न.दर
३४	४०० वॅट एस.व्ही.लॅम्प (फिलिप्स)	१३३५/-प्र.न.दर	१३००/- प्र.न.दर	१२०५/- प्र.न.दर
३५	पोर्सेलीन होल्डर १२५,१५०, २५० वॅट	१७५/-प्र.न.दर	१६९/- प्र.न.दर	१४५/- प्र.न.दर
३६	एक्रॉलिक कवर १२५/२५०/ ४००वॅट	४३९/-प्र.न.दर	४३५/- प्र.न.दर	३९५/- प्र.न.दर
३७	पोलॅलिन फ्युज	४५/-प्र.न.दर	३५/- प्र.न.दर	३५/- प्र.न.दर
३८	३/४ ग्लॅन्ड	६०/-प्र.न.दर	५५/- प्र.न.दर	३५/- प्र.न.दर
३९	टयुबलर पोल	५१४५/-प्र.न.दर	४९४५/- प्र.न.दर	४३४५/- प्र.न.दर
४०	एस.ॲण्ड ई.सिंगल पोल ब्रॅकेट	४५०/-प्र.न.दर	४३५/- प्र.न.दर	३८०/- प्र.न.दर
४१	टयुबलर पोल कलर	३१५/-प्र.न.दर	२९५/- प्र.न.दर	१९५/- प्र.न.दर
४२	पोल जे / बॉक्स नंबरींग	११५/-प्र.न.दर	९०/- प्र.न.दर	७५/- प्र.न.दर
४३	टायगर रिले मेक-एल ॲण्ड टो	४९९०/-प्र.न.दर	४३४५/- प्र.न.दर	३९३५/- प्र.न.दर
४४	आरमर केबल ६ एम.एम.२ कोअर	९५/-प्र.न.दर	८५/- प्र.न.दर	६५/- प्र.न.दर
४५	आरमर केबल १० एम.एम ४ कोअर	११५/ प्र.न.दर	९५/- प्र.न.दर	६९/ प्र.न.दर
४६	आरमर केबल ६ एम.एम. ४ कोअर	१२५/ प्र.न.दर	१०५/- प्र.न.दर	७७/ प्र.न.दर
४७	आरमर केबल १० एम.एम. ४ कोअर	१३५/-प्र.न.दर	१२५/- प्र.न.दर	९५/- प्र.न.दर
४८	३० ॲम्पीयर कनेक्टर	५५/-प्र.न.दर	६५/- प्र.न.दर	४५/- प्र.न.दर
४९	लाईट पाईप	२२९/-प्र.न.दर	२३५/- प्र.न.दर	१८५/- प्र.न.दर
५०	३२ ॲम्पीयर टो.पी.स्वीच	४१५/ प्र.न.दर	३९५/- प्र.न.दर	३५०/ प्र.न.दर
५१	पोल प्लींथ	३४५/-प्र.न.दर	३३५/- प्र.न.दर	२९५/- प्र.न.दर
५२	मुरुम ट्रेंच	५५/-प्र.न.दर	५२/- प्र.न.दर	५०/- प्र.न.दर
५३	टार रोड ट्रेंच	६२/-प्र.न.दर	६०/- प्र.न.दर	६०/- प्र.न.दर
५४	५०मी.मी.बी.क्लास जी.आय. पाईप	२९५/-प्र.न.दर	३००/- प्र.न.दर	२६५/- प्र.न.दर
५५	पोल इरेक्शन	२१५/-प्र.न.दर	२२५/- प्र.न.दर	१६५/- प्र.न.दर
५६	सी.सी.पोल फाऊंडेशन	७२०/-प्र.न.दर	७५०/- प्र.न.दर	६३५/- प्र.न.दर
५७	पी.व्ही.सी.टेप	१३/-प्र.न.दर	१५/- प्र.न.दर	१०/- प्र.न.दर
५८	२५० वॅट एस.व्ही.चॉक	९९०/-प्र.न.दर	१०५०/- प्र.न.दर	९४०/- प्र.न.दर
५९	पोल डिसमेंटलींग	२१५/ प्र.न.दर	२००/- प्र.न.दर	१६५/- प्र.न.दर
६०	पाईप अर्थिंग	६००/-प्र.सेट	५७५/- प्र.सेट	५५०/- प्र.सेट
६१	१२५ वॅट एस ॲण्ड ई स्ट्रीट लाईट फिटींग	३५०५/-प्र.सेट	३५००/-प्र.सेट	३०४५/-प्र.सेट
६२	१५० वॅट एस ॲण्ड ई स्ट्रीट लाईट फिटींग	३९९०/-प्र.सेट	३९००/-प्र.सेट	३५८५/-प्र.सेट
६३	एस.ॲण्ड ई पोल जंक्शन बॉक्स	८९५/-प्र.न.दर	८९०/- प्र.न.दर	७२५/- प्र.न.दर

६४	डी.एम.केबल	१५/-प्र.न.दर	१०/- प्र.न.दर	५/- प्र.न.दर
६५	४ २५ चौ.मी.मी. केबल ॲल्यूमिनियम	१७०/-प्र.न.दर	१७५/- प्र.न.दर	१४५/- प्र.न.दर
६६	जंक्शन बॉक्स दुरुस्ती व कलर करुन फाऊंडेशन पुन्हा बसविणे	५९५०/-प्र.सेट	५५००/- प्र.सेट	३९८५/- प्र.सेट
६७	जंक्शन बॉक्स करिता जाळे बसविणे	१७५/- प्र.चौ.फुट	१८५/-प्र.चौ.फुट	११७/- प्र.चौ.फुट

५. - **मुख्य कार्यालय इमारतीत वातानुकूलित यंत्रणेची वार्षिक देखभाल करणे.**

अ. क्र	कामाचा तपशिल	ठेकेदाराचे नांव / दर		
		टेक्नोकुल इंजि.कं	शेखर इलेक्ट्रीकल्स	न्यूफिल्ड
१	१.५ टन विन्डोरुम एअरकंडिशनर	५११७/- प्र.न.दर	५९००/-प्र.न.दर	५४७५/- प्र.न.दर
२	२ टन विन्डोरुम एअरकंडिशनर	५६८५/- प्र.न.दर	६८००/-प्र.न.दर	६३५०/- प्र.न.दर
३	४ टन म्लटो स्पील्ट एअरकंडीशनर	२०००२/-प्र.न.दर	२४२००/-प्र.न.दर	२३१००/-प्र.न.दर
४	३ टन डुकटॅबल म्लटो पॉकेज एअरकंडीशनर	१२९१५/-प्र.न.दर	१६७५०/-प्र.न.दर	२४२७५/ प्र.न.दर
५	४टन डुकटॅबल म्लटो पॉकेज एअरकंडीशनर	१९२१५/-प्र.न.दर	२१०००/-प्र.न.दर	२०५००/-प्र.न.दर
६	७.५ टन डुकटॅबल म्लटो पॉकेज एअरकंडीशनर	२५५१५/-प्र.न.दर	२९२५०/-प्र.न.दर	२८१००/-प्र.न.दर

६ - **मुख्य कार्यालय इमारतीतील (सभागृहातील) कॉन्फरन्स, माईक सिस्टोम वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे.**

अ. क्र.	कामाचा तपशिल	ठेकेदाराचे नांव		
		डायमंड इलेक्ट्रीक कंपनी	न्यूफिल्ड	शेखर इलेक्ट्रीकल्स
१	मा.अध्यक्ष युनिट एच.बी.डी. ८७९१/०२	८५५०/-प्र.न.दर	७३६०/-प्र.न.दर	८५६५/-प्र.न.दर
२	डेलिगेट एच.बी.डी.८७९१/०२ कॉडलेस मायक्रोफानराईत	७६४५/-प्र.न.दर	६९००/-प्र.न.दर	७५५०/-प्र.न.दर
३	फोर युनिट एल.बी.डी. ८७९३/३	७५००/-प्र.न.दर	५४३५/-प्र.न.दर	६६७५/ प्र.न.दर
४	पावर कंट्रो युनिट एल.बी.डी. ८७९४/४	२५०००/-प्र.न.दर	२२२००/-प्र.न.दर	२४५००/-प्र.न.दर

५	ॲम्प्लीफायर एल.बी.डी. ८७४५/५	३४९९०/-प्र.न.दर	३१९५०/-प्र.न.दर	३४३७५/-प्र.न.दर
६	स्पीकर एल.बी.डी.८३७३/६	२०००/-प्र.न.दर	१२५०/-प्र.न.दर	१५४५/-प्र.न.दर
७	डेक रेकॉर्डींग व प्लेबॅक युनिट	२१४३५/-प्र.न.दर	१८२३५/-प्र.न.दर	१९८५०/-प्र.न.दर
८	मॉनीटर स्पीकर्स एल.बी.डी. ८३७२	२४७५/-प्र.न.दर	१७५०/-प्र.न.दर	२५९०/-प्र.न.दर
९	मायक्रोफोन	२१८५०/-प्र.न.दर	१९८९०/-प्र.न.दर	२१२६९/-प्र.न.दर
१०	फिलीप्स एल.बी.डी.८३७३	२१५०/-प्र.न.दर	१४९५/-प्र.न.दर	१८६४/-प्र.न.दर
११	स्पिकर वायरींग ऑफ ४०/३६	१९०/-प्र.न.दर	११५/-प्र.न.दर	१७५/-प्र.न.दर
१२	मायक्रोफोन ७ कोर अंडरग्राऊंड वायरिंग	१९५/-प्र.न.दर	१३५/-प्र.न.दर	१६५/-प्र.न.दर
१३	मायक्रोफोन मेल कनेक्टर ८ पीन	२९०/-प्र.न.दर	१९०/-प्र.न.दर	२२५/-प्र.न.दर
१४	कॉडलेस माईक चार्जींग बॅटरी	४९५/-प्र.न.दर	४५०/-प्र.न.दर	५४५/ प्र.न.दर
१५	मायक्रोफोन फिमेल कनेक्टर ८ पीन	२६०/-प्र.न.दर	१८५/-प्र.न.दर	२६५/-प्र.न.दर
१६	मायक्रोफोन कव्हर	५४०/-प्र.न.दर	४६५/-प्र.न.दर	५३५/-प्र.न.दर
१७	कॅसेट रेकॉर्डीगसाठी (सोनी)	३३५/-प्र.न.दर	२०५/-प्र.न.दर	२४५/-प्र.न.दर
१८	ॲम्पलीफायर कनेक्टींग वायर	७९५/-प्र.न.दर	७०५/-प्र.न.दर	७९०/-प्र.न.दर
१९	ॲम्पलीफायर जॅक विन मेल / फिमेल	३५०/-प्र.न.दर	१९५/-प्र.न.दर	२७५/-प्र.न.दर
२०	मिटींग अटेंडींग आणि रेकॉर्डींग	१०५००/-प्र.न.दर	९५७५/-प्र.न.दर	११५००/-प्र.न.दर
२१	मायक्रोफोन ईडिकेटर लॅम्प	८६५/-प्र.न.दर	६५०/-प्र.न.दर	७७५/-प्र.न.दर
२२	१८ मायक्रोफोन स्टॅण्ड	१६५०/-प्र.न.दर	११५५/-प्र.न.दर	१५५०/-प्र.न.दर
२३	मायक्रोफोन बेस स्विच	७५०/-प्र.न.दर	४९०/-प्र.न.दर	५८५/-प्र.न.दर
२४	स्वीच स्प्रे	५५०/-प्र.न.दर	२६५/-प्र.न.दर	३३५/-प्र.न.दर
२५	मेल/फिमेल	१५७५/-प्र.न.दर	८९०/-प्र.न.दर	९७५/-प्र.न.दर
२६	मायक्रोफोन मायनर रिपेरिंग इत्यादी	९९३/-प्र.न.दर	७५०/-प्र.न.दर	८२५/-प्र.न.दर
२७	एम्प्लीफायर, इक्यूलायझर,डेक सर्विसिंग	६५००/-प्र.न.दर	३९५०/-प्र.न.दर	५२५५/-प्र.न.दर

वरीलपैकी क्र.४,५,६ मधील सर्वात कमी दराच्या निविदा मंजूर करण्यात आलेल्या आहेत. सदर कामी आवश्यकतेनुसार मंजूर दराने काम करुन घ्यावयाचे आहे.

७) मा. महापौर, उपमहापौर, प्र. लेखाधिकारी यांचे दालनांत नविन संगणक प्रणाली (सर्व साहित्यासह) खरेदी करणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	आलेले दर प्रति नग
१)	जे ॲन्ड जी कॉम्प्युटर्स	रु. ४५,५७५/- प्र. नग
२)	आदर्श प्रिंटर्स	रु. ४२,५००/- प्र. नग
३)	नाकोडा कम्युनिकेशन सेंटर	रु. ४४,४००/- प्र. नग
४)	आकार कॉम्प्युटर्स	रु. ४६,४००/- प्र. नग

वरील पैकी 'आदर्श प्रिंटर्स' यांचे दरपत्रक मंजूर करण्यात आलेले आहे. सदर कामी मंजूर दराने रु. १,२७,७००/- एवढा खर्च झालेले आहे (एकूण ३ नग खरेदी)

८) पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेकरिता (दि. ५/१/२००३ व ९/२/२००३) पुरीभाजी व जीपगाड्या भाड्याने घेणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	मंजूर दर
१)	श्रद्धा कॅटरर्स	रु. १५.०० प्र. प्लेट
२)	शारदा कॅटरर्स	रु. १४.५० प्र. प्लेट
३)	संजय पराडकर	रु. १६.०० प्र. प्लेट

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	मंजूर दर
१)	मे. राज टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स	रु. ६४९/- प्र. नग (एकूण २० नग)
२)	विणा ट्रॅव्हल्स	रु. ६४८/- प्र. नग (एकूण २० नग)

वरील पेकी 'शारदा कॅटरर्स' यांचे पुरी भाजी साठी रु. १४.५० पै. प्रति प्लेट याचे दर सर्वात सर्वात कमी आहेत. त्याचप्रमाणे सदर कामी रु. १८,८५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

पल्स पोलीओ लसीकरण मोहीमेसाठी जीपगाड्या पुरवठा करणेकामी विणा ट्रॅव्हल्स यांचे दर रु. ६४८/- प्रति नग (एकूण २० नग) सर्वात कमी आहेत. सदर कामी रु. १,८१,४४०/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

९) जाहिरात कर विभागाचे (शासनाच्या निर्देशानुसार) विविध प्रकारचे नमूने छपाई करणे व जाहिरात कर विभागाचे संपूर्ण काम संगणकाद्वारे करुन घेणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	मंजूर दर
१)	मे. चंडिका प्रिंटर्स	रु. ३२,८००/-
२)	मे. मनोहर प्रिंटींग प्रेस	रु. ३४,०७५/-
३)	मे. गौरी आर्ट	रु. ३६,१२५/-

वरील प्रमाणे नमुने छपाईकामी 'मे. चंडिका प्रिंटर्स' यांचे दर सर्वात कमी आहेत. सदर कामी रु. ३२,८००/- एवढा खर्च आहे.

जाहिरात कर विभागाचे मागणी, आकारणी रजि. बिले, नोटीसा व इतर आवश्यक कामे 'मे. केतन कॉम्प्युटर्स' या ठेकेदाराकडून करुन घेण्योत आलेली आहेत. मंजूर दर रु. ४.४५ पै. प्रति खातेदार, प्रति बिल एकूण अंदाजित बिले १०००० मंजूर दरानुसार ४४,५००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील कामाबाबत नियमानुसार नियमानुसार कार्यवाही केल्याने कामाचे अवलोकन करण्यात आले.

सूचक :- श्रीमती ज्योत्सना हस्नाळे
Hasnale
२१/१/०३

अनुमोदन श्री दिनेश नलावडे
Nalawade

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.३१/१/२००३

प्रकरण क्र.१०४ :- बांधकाम विभागातील विविध विकास कामाबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. १०६

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे ७९.४० चौ.कि.मी. एवढा असून शहर दहिसर चेक नाका ते वर्सोवा पूल व काजूपाडा ते उत्तन असा पसरलेला आहे. मिरा भाईंदर शहर मुंबई महानगरपालिकेलगत असून शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. मिरा भाईंदर नगरपरिषदेचे दि.२८.२.२००२ पासून महानगरपालिकेत रुपांतर झालेले आहे. भाईंदर(प) भाईंदर (पूर्व) स्टेशन जवळ व मिरा रोड (पूर्व) हा शहरी भाग असून सदर भागातील लोकसंख्या मोठया प्रमाणावर आहे, तर मुर्धा, राई, मोर्वा, तारोडी, डोंगरी, उत्तन, पाली चौक, घोडबंदर, काशि, मिरा गांव, मिरा गावठण, पेणकरपाडा हा ग्रामीण भाग आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण २८ झोपडपट्ट्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत नागरीकरण मोठया प्रमाणावर झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या सुध्दा वेगाने वाढत आहे. शहराची एकूण लोकसंख्या सुमारे ६.०० लाख एवढी आहे. शहरातील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा हया महनगरपालिकेमार्फत पुरविण्यात येतात.

महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येतात. सदर कामात मुख्याचे रस्ते, गटारे, नाले, स्ट्रीट लाईट, सार्वजनिक इमारती, समाजमंदिरे, कॉंक्रीट पायवाटा या कामाचा अंतर्भाव असतो. शहरात सुध्दा उड्डाणपूल,डॉ.हेडगेवार मार्ग रुंदीकरण, फुटपाथ बांधणे ही कामे प्रगती पथावर असून महानगरपालिकेचा अर्थसंकल्प, वेगाने होणारे नागरीकरण पहाता सर्व भागात सोयी सुविधा पुरविणे जिकरीचे होत आहे. बांधकाम विभागातील कायम तांत्रिक कर्मचारी वर्ग हा अत्यंत कमी असून कमी कर्मचारी वर्गात मोठया प्रमाणावर विकासाची कामे पार पाडण्यात येत आहेत. स्थापत्य विषयक कामांबरोबरच विद्युत कामे सुध्दा बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येतात. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विकास आराखडा १९९७ मध्ये मंजूर झालेला असून विकास आराखडयातील रस्ते, आरक्षणे सुध्दा टप्प्याटप्याने विकसित करावयाची आहेत. महानगरपालिका (तत्कालिन नगरपरिषद) दरवर्षी अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध करुन देते. सदर उपलब्ध तरतूदीनुसार मा.स्थायी समिती/ मा.महासभा यांच्या मंजूरीने महानगरपालिका विविध विकासाची कामे हाती घेते. विविध विकास कामे होणेकरिता मा.नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून मोठयाप्रमाणावर पत्र व्यवहार करण्यात येत असतो. महानगरपालिका प्रशासनामार्फत सदर प्रस्तावाची पहाणी, छाननी करुन आवश्यक ती अंदाजपत्रके तयार करण्यात येतात. अर्थसंकल्पात तरतूदीनुसार सदरची विकास कामे हाती घेण्यात येतात. सन २००३-०४ या वर्षात करावयाच्या कामांबाबत अर्थसंकल्प तयार करण्यात येत असून त्यामध्ये विविध लेखाशिर्षाखाली विकास कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजिक रस्त्यावर बी.एस.ई.एस. कं. मार्फत महानगरपालिकेच्या शिफारशीनुसार व बी.एस.ई.एस कं. च्या नियमानुसार स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात येतात. महानगरपालिका सदर लाईटसचे आर्थिक देयक वेळेवर भरणा करीत असते.. महानगरपालिकेने स्मशानभूमी, वाहतूक बेटे खाजगी संस्थेकडून विकसित करण्याचे धोरण ठरवून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तर शहरातील सर्व शौचालये खाजगी संस्थेस देखभाल व दुरुस्तीस पैसे दया व वापरा तत्वावर देणे व सुलभ शौचालये बांधा व वापरा तत्वावर करण्याची कामे हाती घेतलेली आहेत. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ नुसार जाहिरात कर मिळविणे, पे ॲन्ड पार्क प्रस्तावित असून कार्यवाही करण्यात येत आहे. दलित वस्ती सुधारणा योजना सुवर्ण जयंती, दहावे व अकरावे वित्त आयोग आमदार, खासदार फंड यातून सुध्दा विकास कामे प्रस्तावित करण्यात

वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेतून घरे बांधण्याची योजना तयार करण्यात येत आहे. बी.एस.इ.एस / एम.टी.एन.एल व इतर सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्याकडून रस्ते खोदाई चार्जेस मोठयाप्रमाणावर वसूल करण्यात येत आहेत.

वरील कामे पार पाडताना बांधकाम विभागातील नमूने, रजिस्टर्स व इतर माहिती विहित नमून्यात तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा लेखा संहिता १९७१ मध्ये नमूद केलेल्या नमून्यात ठेवण्यात येत असतात. तसेच विविध विकास कामे ही प्रशासकीय आर्थिक मंजूरी, तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्यावर राज्य स्तरीय वृत्तपत्रात निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडील बी-१ नमून्यातील अटीशर्ती व स्पेसिफीकेशन नुसार करुन घेण्यात येतात. विविध विकास कामांच्या निविदा मागवून महाराष्ट्र शासनाकडील योग्य ती नोंदणीकृत व आवश्यक ती यंत्रसामुग्री प्लॉट असणा-या ठेकेदाराकडून कामे करुन घेण्यात येत असतात.

वरील विषयानुसार बांधकाम विभाग संदर्भित सर्व कामांबाबत सविस्तर माहितीसह पुढे विषय ठेवण्यात यावा.

सुचक :- श्री. ~~[illegible]~~ लिओ कोलासो   अनुमोदन :- श्री. ~~[illegible]~~ मिलन म्हात्रे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. ३१.१.२००३

प्रकरण क्र.१०५ :- स्ट्रीट लाईट बसविणे प्रस्तावाना मंजूरी देणे.

ठराव क्र. १०७

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत बसवावयाच्या स्ट्रीट लाईट चे खालील प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	प्रस्तावाचे नांव ४०० मीटर डबल ब्रॅकेट कोन
१)	नर्मदा नगर ~~येथील नर्मदा सेवामंडळ येथे स्ट्रीट लाईट लावणे~~.
२)	प्रभाग क्र.१ आनंदनगर, तलावली पालखाडी, एलकनपाडा येथे स्ट्रीट लाईट लावणे.
३)	नवघर रोड बंदरवाडी (एमबीएमसी स्कूल) येथे स्ट्रीट लाईट लावणे
४)	नवघर क्रॉस रोड, एस.व्ही,रोड येथील (लक्ष्मीसदन) येथे स्ट्रीट लाईट लावणे
५)	आझाद नगर गल्ली नं.१,२,४ येथे स्ट्रीट लाईट लावणे.
६)	व्यंकटेश नगर (कॅबिन रोड) येथे स्ट्रीट लाईट लावणे.
७)	चंदन ~~विस्तार~~ अपार्ट. (नवघर क्रॉस रोड नं.५) येथे स्ट्रीट लाईट लावणे.
८)	शालीभद्रा अपार्ट. तलाव रोड
९)	(नवघर क्रॉस रोड येथे स्ट्रीट लाईट लावणे
१०)	उदयकिरण अपार्ट. नवघर पोलीस चौकी (नवघर फाटक रोड) येथे स्ट्रीट लाईट लावणे.
११)	राम मंदिर मार्ग, राईगांव येथे स्ट्रीट लाईट लावणे.

वरील प्रमाणे प्रस्तावाना मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- [signature] अनुमोदन :- [signature] श्री. लिओ कोलासो.

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]
अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

नारायण नगर रस्ता शेवटी पोल डबल ब्रॅकेट कोन.

प्रभाग क्र ११ मध्ये दलित वस्त्यामध्ये स्ट्रीट लाईट बसविणे

शांतिनगर सेक्टर १, ९ २ येथे स्ट्रीट लाईट बसविणे

याकूब कुरेशी

धीरज के पीछे तारा पायल सोसाइटी के आगे

नवघर चौक

दुःखवठा ठराव क्र. १०८

सन्मा सदस्य श्री.महेंद्रसिंग चौहान यांचे वडिल श्री.उदयराज चौहानजी यांचे उत्तर प्रदेश येथे गेल्या जानेवारीच्या ११ तारखेला दैवाज्ञा झाले आहे. उदयराज सिंग जवळ जवळ ३५ वर्षापासून भाईंदरशी संबंधित होते. वार्धक्याने वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे निधन झाले श्री.महेंद्रसिंग चौहान हे आपल्या सभागृहाचे सदस्य आहेत व त्यांच्या वडिलांचे निधन झाले ही दुःखद गोष्ट आहे. तसेच त्यांच्या कुटुंबामध्ये जे दुःख आहे त्यांच्या दुःखात हे सभाग.ही सामील आहे. त्यांच्या आत्म्याला शांती देवो. आपल्या सर्व कुटुंबियांच्या दुःखात आमचा सहभाग आहे. शहरवासियांच्या वतीने उदयराजसिंग यांच्या आत्म्याला शांती लाभो.

सुचक :- लिओ कोलासो

अनुमोदन :- याकुब कुरेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

मा.सभापती :-

सर्व उपस्थित स्थायी समिती सदस्य,मा.उपआयुक्त, प्र.सचिव व अधिकारी वर्ग यांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

सभापती,
स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रभारी सचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका

१३९

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२००३

प्रकरण क्र. १०६ :- **दि. १८/०१/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. १०९ :-

दि. १८/०१/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितींच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे **अनुमोदन :-** श्री. लिओ कोलासो

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि.२३.१.२००३

प्रकरण क्र. १०७ :- नवघर शाळेचे मैदान शैक्षणिक व सामाजिक संस्थांनाच कार्यक्रमासाठी देणेबाबत.

ठराव क्र. ११०

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा क्र.१३, नवघर गांव येथील मैदान नागरिक / खाजगी संस्था यांच्या मागणीवरुन विविध कार्यक्रमांसाठी त्यांना देण्यांत येते. परंतु सदर संस्था/ नागरीक कार्यक्रमाचे वेळी ध्वनीक्षेपकाचा आवाज जास्त प्रमाणांत ठेवत असल्याने या परिसरातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यांस अडचण निर्माण होते. तसेच ध्वनी प्रदुषण होते. सदरचे कार्यक्रम पूर्ण झाल्यावर आयोजकांमार्फत तयार झालेला कचरा आयोजक न उचलता तसाच टाकून जातात. कार्यक्रमाचेवेळी शाळा क्र.१३ मधील विद्यार्थ्यांना व इतर खेळाडूंना सदर मैदानावर खेळण्यास अडथळा निर्माण होतो. व सकाळी मॉर्निंग वॉकसाठी नागरिकांना त्रास होतो. अशा प्रकारच्या तक्रारी लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांकडून वारंवार येत असतात.

तरी सदरचे मैदान सर्वांना कार्यक्रमासाठी न देता फक्त शैक्षणिक व सामाजिक संस्थानाच देणे तसेच सुट्टीच्या दिवसांत खाजगी संस्था व नागरिक यांना देणेबाबत ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक :- श्री. दिनेश द. नलावडे   अनुमोदन :- श्री. शरद पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा.स्थायी समिती सभा दि.७/२/२००३

प्रकरण क्र.१०८: मा.स्थायी समिती ठराव क्र.७ दि.३.१०.२००२ मधील दुरुस्तीबाबत.

ठराव क्र. १११

मा.स्थायी समिती सभा दि.३.१०.२००२ ठराव क्र.७ अन्वये विविध विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. सदर ठरावातील अ.क्र.१४ व १५ ही कामे एकत्र करुन मा.महासभेपुढे ठेवणेबाबत निर्णय देण्यात आला होता. परंतू चुकिने ठरावात अ.क्र.१५ व १५ ही कामे एकत्र करण्याऐवजी अ.क्र.१२ व १३ ही कामे एकत्र करण्याबाबत लिहिले गेले. सर्व कामांचे प्रशासकीय व आर्थिक मंजूरीचे अधिकार हे स्थायी समितीस आहेत. मा.स्थायी समिती सभा दि.३.१०.२००२ ठराव क्र.७ मध्ये अ.क्र.१२ व १३ ही कामे अनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

१२) भाईंदर (प) मोतीनगर, शांतीनगर अपार्टमेंट येथे सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. रु.४,९५,०००/-

१३) भाईंदर (प) मोतीनगर, भागातील लाकडाच्या वखारीच्या बाजूला नव्याने गटार बांधून स्लॅब टाकणे. रु.४,९०,०००/-

व अ.क्र. १४ व १५ ही कामे अनुक्रमे खालीलप्रमाणे आहेत.

१४) भाईंदर (प) राजेश हॉटेल ते जय अंबे मंदिर येथे गटार बांधणे रु.४,९८,०००/-

१५) भाईंदर (प) राजेश हॉटेल ते जय अंबे मंदिर येथे गटारावर स्लॅब टाकणे रु.४,९७,०००/-

तरी मा.स्थायी समिती सभा दि.३.१०.२००२ ठराव क्र.७ मध्ये बदल करुन मूळ ठरावातील अ.क्र.१२,१३,१४ व १५ या कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे. सदर मूळ ठरावानुसार करावयाच्या केलेल्या कार्यवाहीस मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री. मिलन म्हात्रे   अनुमोदन :- श्री शरिकांत शहा

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

९१२

मिरा भाईदर महानगरपालिका.

मा.स्थायी समिती सभा दि. ७/२/२००३

प्रकरण क्र.:७०९ भाईदर (प.) घनकचरा व्यवस्थापन नियोजन प्रकल्पाकडे (सर्वे क्र.२५,६५) जाणारा रस्ता तयार करणे कामाच्या निविदास मंजूरी देणे

ठराव क्र. ९१२

दि.७/०१/२००३ रोजीच्या दैनिक सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील विकास कामाकरीता ठेकेदारींनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव	अंदाजित रक्कम/दर
१.	भाईदर (प.) घनकचरा व्यवस्थापन नियोजित प्रकल्पाकडे (सर्वे नं.२५,६५) जाणारा रस्ता तयार करणे.	रु.४५,००,०००/-
	१) मे.श्रीजी. कन्स्टक्शन	२.००%जास्त दराने
	२) मे.साईदत्त इंटरप्राईजेस	०.२५% कमी दराने
	३) मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन	७.००% जास्त दराने
	४) मे.असफाल्ट इंडिया कार्पोरेशन	५.००%जास्त दराने
	५) मे.आश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंट प्रा.लि.	अंदाजपत्रकिय दराने
	६) मे.जयहिंद इंन्फ्रास्ट्रक्चरल कंपनी	६.००%जास्त दराने

वरील पैकी ठेकेदार मे.साईदत्त एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.२५ टक्के कमी दराची निविदास वाजवी असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतूदीच्या अन्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदर कामी सन २००३-०४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात यावी. सदर कामी ठेकेदाराची वेळोवेळी येणा-या देयकांच्या प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री दिनेश गावंड अनुमोदन :- श्री मिलन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

ठराव १२३

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.७/२/२००३

प्रकरण क्र.११० :- महानगरपालिका हद्यीतील रस्ता रुंदीकरण व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या बी.एस.ई.एस.कं. च्या केबल्स, स्ट्रीट लाईट, पोल, पिलर्स, जंक्शन बॉक्स शिफट करणे बाबत बी.एस.ई.एस.कं. ने दिलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र.:-११३

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बी.एस.इ.एस. कंपनी मार्फत वीजपुरवठा करण्यात येतो. बी.एस.ई.एस.कं. च्या धोरणानुसार महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावर त्यांच्याकडून स्वखर्चाने स्ट्रीट लाईट पोल महानगरपालिकेच्या शिफारशीनुसार विहित पध्दतीत बसविण्यात येतात. महानगरपालिकेकडून बी.एस.ई.एस.कं. मासिक देयक व भाडे नियमित वसूल करीत असते. मिरा भाईंदर महानगरपालिकेने गेल्या तीन वर्षापासून रस्ता रुंदीकरणाची कामे मोठयाप्रमाणावर हाती घेतलेली आहेत. यापूर्वी लहान मोठी शिफ्टींगची कामे बी.एस.ई.एस मार्फत करण्यात येत होती. परंतु गेल्या तीन वर्षापासून मोठया प्रमाणावर रुंदीकरण झाल्याने रस्ता रुंदीकरणातील केबल्स, स्ट्रीट लाईट पोल मिनिपिलर्स व जंक्शन बॉक्स शिफ्ट करावे लागणार आहेत. अन्यथा वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर रस्त्यात मुख्याचे भाईंदर (प) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पूर्व) बी.पी.रोड, नवघर रोड गोडदेव फाटक रोड, काशिगांव, काशि जनतानगर रोड पेणकर पाडा सागर हॉटेल रस्ता अजित पॅलेस हॉटेल रस्ता, मिरा गाव रस्ता डॉ.हेगडे वार मार्ग यांचा अंतर्भाव आहे. सदर रस्त्यातील केबल्स पोल पिलर्स शिफ्ट करणे कामी बी.एस.ई.एस. कं. ने रु.७२,०६,८८४/- एवढया रकमेची मागणी केलेली आहे. तसेच डॉ.हेगडेवार मार्गातील शिफ्टींगकरिता रु.३.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. दि.१९.१०.२००२ ठराव क्र.२२ अन्वये सदर शिफटींग चार्जेस देण्यात येऊ नये असा ठराव पारीत केलेला आहे.

बी.एस.ई.एस.कं. यांनी मुंबई महानगरपालिकेत सुरु केलेल्या नविन धोरणानुसार १५० HPSV व २५० HPSV स्ट्रीट लाईट पोल करिता नविन सुधारित दर लागू केलेले आहेत. व पोलचे मासिक रु.१५/- प्रति पोल प्रदान करण्याचे मान्य केलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ६००० पोल असून सदर पोलचे रु.१५/- प्रतिपोल जादा दराने सुमारे ९०,०००/- एवढे मासिक देयक होणार आहे. सदर देयक प्रदान केल्यास बी.एस.ई.एस.मागील सर्व शिफटींग कामाचे व यापुढे सुध्दा होणारी सर्व शिफ्टींग कामे मोफत करुन देणार आहे. तसेच श्री.गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, मोहरम या सणानिमित्त मोफत तात्पुरत्या स्वरुपात स्ट्रीट लाईटची व्यवस्था करुन देणार आहे. सध्या मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुमारे ६००० पोलचे मासिक देयक सुमारे २७.०० लक्ष महानगरपालिका भरणा करीत असते. बी.एस.ई.एस.कं.ने सुचविलेली वाढीनुसार दि.१.४.९८ ते दि.३१.३.२००३ पर्यत सुमारे ६५ लक्ष देयक प्रदान करावयाचे आहे. मुंबई महानगरपालिके प्रमाणे सदर वाढ व दर मान्य केल्यास सर्व शिफ्टींग कामी होणारा खर्च वाचणार आहे. तरी बी.एस.ई.एस. कंपनीस प्रदान करावयाची रक्कम ३६ मासिक हप्त्यात प्रत्येक महिन्याच्या स्ट्रींट लाईट देयका सोबत प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर इकडे सुद्धा बी.एस.ई.एस कं.ने सेवेत सुधारणा करून चांगल्या प्रकारे सेवा पुरविण्यात यावी

सुचक :- श्री.मिलन म्हात्रे   अनुमोदन :- श्री.दिनेश नलावडे

Milan व.म्हात्रे   Nalawade

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२७ /०२ /२००३.

प्रकरण क्र. १११ :- उत्तन देवतलाव विकसित करण्याकरीता कुंपण भिंत, कॉक्रीट पायवाटा, ग्रिल बांधणे कामाच्या निविदांस मंजूरी देणे.

ठराव क्र. ११४ :-

दि. ११/१/२००३ रोजी दै. नवशक्ती वर्तमान पत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव /ठेकेदारांचे नांव	अंदाजित रक्कम
१	उत्तन देवतलाव सुशोभिकरणां करीता बाहेरील बाजूस कुंपन भिंत, पायवाटा, ग्रील, गेट बसविणे	रु. ११,०५,९६९/-
अ	मे. अनायडा इंटरप्राइझेस	९.९०% जास्त दराने
ब	मे. अपुर्व कन्स्ट्रक्शन	१३.००% जास्त दराने
क	मे. प्रशांत सी. नाईक	१२.००% जास्त दराने
ड	मे. बैजू कन्स्ट्रक्शन	१२.५% जास्त दराने

वरील पैकी ठेकेदार मे. अनायडा इंटरप्राईझेस यांची निविदा सर्वात कमी दराची असून सदरचे दर जास्त असल्याने सदर ठेकेदारास दर वाटाघाटीकरीता बोलाविले असतांना सदर ठेकेदाराने अंदाजपत्रकातील दरापेक्षा ९.९०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.४०% कमी दराने काम करण्यांस पत्र देऊन तयारी दर्शविलेली आहे. सदरचे दर वाटाघाटीनंतरची निविदा मंजुरीस मुंबई प्रांतिक नियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतुदी अन्वये व सदर कामे ठेकेदारांची वेळोवेळी येणाऱ्या देयकांचा प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. लिओ कोलासो.

अनुमोदन :- श्री. जेम्स कोलासो.

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२००३

प्रकरण क्र. ११२ :- **खासदार/आमदार फंडातून बांधलेली व्यायामशाळा / समाजमंदिर खाजगी संस्थांना भाडे तत्वावर चालविर्णेस देणे बाबत विचार विनिमय करणे.**

ठराव क्र. ११५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा रोड शांतीपार्क येथे मा. तत्कालिन आमदार श्री. गणेश नाईक यांच्या आमदार निधीतून व्यायाम शाळा बांधण्यांत आलेली आहे. सदर व्यायाम शाळेचे क्षेत्र ४५०.०० चौ. फुट एवढे आहे. सदर व्यायाम शाळा बांधण्यांत आलेली आहे. सदर व्यायाम शाळा भाडेतत्वावर चालविण्यास मे. शिवसमर्थ क्रिडा मंडळ (रजि) यांनी मागणी केलेली आहे. सदर इमारतीचे वार्षिक भाडे अनामत रक्कम आकारावी लागणार आहे.

परंतु सदर विषय हा महत्वाचा असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतीत असलेल्या सर्व व्यायामशाळा, समाजमंदिरे, वाचनालय यांचा सर्व्हे करुन संपूर्ण तपशिलासह विषय स्थायी समितीपुढे आणण्यांत यावा.

सुचक :- श्री. हरेश गावंड. **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती सभा
दि. २८/२/०३
ठराव

प्रकरण क्र. (११३) सन २००२/०३ चे सुधारित व सन २००३/०४ चा मूळ अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत

ठराव क्र. ११६

सन २००२/०३ चे सुधारित व सन २००३/०४ चा मूळ अर्थसंकल्प मा. स्थायी समितीने सूचविलेल्या सुधारणा विचारात घेवून मंजूरी देण्यात येत आहे. मा. सर्वसाधारण महासभेपुढे पुढील मंजूरीस शिफारस आहे.

सूचक

१) (श्री. चंद्रकांत वैती)

अनुमोदक

(श्री. लिओ कोलासो)

ठराव सर्वानुमते मंजूर

२)

Milan ...

(श्री मिलन म्हात्रे)

सभापती
मा. स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३।३।२००३

प्रकरण क्र.:- ११४ :- दि. २३।१।२००३, दि. ३१।१।२००३ व दि. ७।२।२००३ रोजीचे स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. :- ११७

दि. २३।१।२००३, दि. ३१।१।२००३ व दि. ७।२।०३ रोजीचे मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह कायम करण्यात येत आहे.

सूचक :- श्री. शशीकांत शाह   अनुमोदक :- श्री. हरेश गावंड.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.

प्रकरण क्रमांक ११५ :- मा.स्थायी समिती सभेच्या कामकाजाचे टेपिंग करणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ११८

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा प्रत्येक गुरुवारी मा.स्थायी समिती सभागृहामध्ये होते. या सभेमध्ये निरनिराळया प्रश्नांवर घेतलेले निर्णय तसेच सभेच्या कामकाजाची नोंद शॉर्टहॅन्ड स्टेनो (लघुलेखक) द्वारे घेण्यात येते. सभागृहात होत असलेली चर्चा नोंदवून घेण्याकरीता जरी लघूलेखकाची नेमणूक करण्यांत आलेली असली तरी इतिवृत्तांतामध्ये ब-याचशा उणिवा,चुका राहतात अशी तक्रार मा.सदस्य स्थायी समिती हे करीत असतात. तसेच प्रत्येक गुरुवारी सभा होत असल्याने सभा झाल्यानंतर सभेचे इतिवृत्तांत मा.सदस्यांना मुदतीत देणे आवश्यक आहे. परंतू कामकाजाची लघुलेखक यांनी घेतलेली नोंद कायम करणेंस पुरेसा अवधी मिळत नाही व वेळही जास्त प्रमाणात जात आहे. पुढील गुरुवारच्या सभेकरीता इतिवृत्तांत तीन दिवस अगोदर देणे कायदेशिर बंधनकारक आहे. त्यामुळे शुक्रवारी इतिवृत्तांत तयार करणे आवश्यक आहे. व रविवारी साप्ताहीक सुट्टी असल्याने शनिवारीच इतिवृत्तांत वाटप करणे आवश्यक आहे. महासभेचे कामकाज ज्याप्रकारे टेपिंग केले जाते त्याचप्रमाणे स्थायी समिती सभेच्या कामकाजाचे टेपिंग केलेल तर लघुलेखकासह कॅसेट ऐकुण तात्काळ इतिवृत्तांत कायम करण्यास पुरेसा अवधी मिळणार आहे व सोयीचे जाणार आहे. तसेच इतिवृत्तांतामध्ये उणिवा,चुका राहणार नाहीत.

तरी स्थायी समिती सभेच्या कामकाजाचे टेपिंग करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे   अनुमोदन :- श्री शशिकांत शहा

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

१२८

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.१३/३/२००२

प्रकरण क्रमांक११६ मा.आयुक्त सो यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. ११८

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त सो यांनी खालील कामे मंजूर केलेली आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित खर्च
१.	घोडबंदर व चेणागांव येथील स्मशानाची दुरुस्ती करणे	रु.४,९९,२८६/-
२.	भाईंदर जेसल पार्क येथे रविराज कॉम्प्लेक्स,जेसल पार्क जी-२ सागर कॉमप्लेक्स येथे गटार दुरुस्ती करणे व लोखंडी जाळ्या बसविणे	रु.४४,३०८/-
	ठेकेदाराचे नांव	दर
अ.	मे.एस.के.कंन्स्ट्रक्शन	५.६ %. जास्त दराने
ब.	मे.क्रोम कन्स्ट्रक्शन	१.०० %. कमी दराने
क.	मे.एकता कन्स्ट्रक्शन	२.५ %. जास्त दराने
३.	बांधकाम विभागात स्ट्रीट लाईट पाहणी करणा-या कर्मचा-यांकरीता नामांकित कंपनीच्या सायकल पुरवठा करणे (०४ नग) हरक्यूलस कंपनी	रु.११,४८०/-
	ठेकेदाराचे नांव	दर
अ.	मे.एम.एस.इंटरप्राईजेस	रु.२८७०/- प्रति नग दर
ब.	मे.निलेश इंटरप्राईजेस	रु.४९५०/- प्रति नग दर
क.	मे.राजेश्री इंटरप्राईजेस	रु.४२००/- प्रति नग दर
४.	ऑटोमॅटीक लेव्हल,अेपी-०२२, पेनटॅक्स (कॅटेगरी २ नग क्र.एल.एम.११२२९)	रु.३४०००/-
अ.	मे.अमित ट्रेंडींग कार्पोरेशन	रु.२२,०००/- प्रति नग
ब.	मे.निशा साईटिफीक को.	रु.२०००/- प्रति नग
क.	मे.लॉरेन्स ॲन्ड मायो (इंडिया) प्रा.लि.	रु.१७,०००/- प्रति नग
५.	ॲल्युमिनियम डेलेस्कोपिक स्टॅन्ड हेवी डयुटी (कॅटेगरी २ नग क्र.एल.एम.११२२१२)	रु.३६००/-
अ.	मे.अमित ट्रेडींग कार्पोरेशन	रु.१,८००/- प्रति नग
ब.	मे.निशा साईटिफीक को.	रु.३,१००/- प्रति नग
क.	मे.लॉरेन्स ॲन्ड मायो (इंडिया)प्रा.लि.	रु.२,८००/- प्रति नग

६.	एम.वाय.एम.एक्स.ॲल्युमिनियम लेव्हलिंग स्टाफ (२ नग) टेलिस्कोप ४ मिटर	रु.२४००/-
अ.	अमित ट्रेडींग कार्पोरेशन	रु.१,५००/- प्रति नग
ब.	मे.निशा साईटिफीक को.	रु.१,४००/- प्रति नग
क.	मे.लॉरेन्स ॲन्ड मायो (इंडीया) प्रा.लि.	रु.१,२००/- प्रति नग
७.	एम.वाय.एम.एक्स.ॲल्युमिनियम लेव्हलिंग स्टाफ (२ नग) टेलिस्कोप ६ मिटर	रु.२८००/-
अ.	अमित ट्रेडींग कार्पोरेशन	रु.३,१००/- प्रति नग
ब.	मे.निशा साईटिफीक को.	रु.१,६००/- प्रति नग
क.	मे.लॉरेन्स ॲन्ड मायो (इंडीया) प्रा.लि.	रु.१,६००/- प्रति नग

वरील प्रस्ताव अवलोकनार्थ करण्यात आले.

सुचक :- श्री हरेश गावड

अनुमोदन :- श्री. ज्योत्सना हसनाळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.

प्रकरण क्रमांक ११७ :- मिरा रोड नियोजित स्मशानभूमी ब्युरल ग्राऊण्डपर्यंतचा रस्ता खडीकरण/डांबरीकरण करणे कामाच्या निविदास मंजूरी देणे.

ठराव क्रं : १२०

दिनांक २८/१/२००३ रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील कामांकरिता ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत. सदर कामाकरिता सन २००३-०४ या वर्षाकरिता तरतूद उपलब्ध आहे असे प्रमाणित करण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित खर्च
१.	मिरा रोड नियोजित स्मशानभूमी ब्युरल ग्राऊंड पर्यंतचा रस्ता खडीकरण /डांबरीकरण करणे.	२७,७६,०००/-

१.	मे.साई दत्त इंटरप्राईजेस	४.०० टक्के जास्त दराने
२.	मे.नारायणसिंग गुलाबसिंग	३.०० टक्के जास्त दराने
३.	मे.असफाल्ट इंडिया कार्पो.	१.३० टक्के जास्त दराने
४.	मे.श्री.जी.कंन्स्ट्रक्शन	०.५० टक्के कमी दराने

वरील पैकी ठेकेदार मे श्री.जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराची निविदा वाजवी असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतूदी अन्वये मंजूर करण्यात येत आहे. सदर कामाचा कार्यादेश अर्थसंकल्प मंजूरी नंतर देण्यात यावा।

सदर कामी ठेकेदाराची वेळोवेळी येणा-या देयक प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे

सूचक :- श्री चंद्रकांत वैती   अनुमोदन :- श्री निलेश गलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.

प्रकरण क्रमांक ११८ :- मिरा रोड नियोजित स्मशानभूमी ब्युरल ग्राऊण्डपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारे बांधणे कामाच्या निविदास मंजूरी देणे.

ठराव क्र. ९२९

दिनांक २८/१/२००३ रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील कामांकरिता ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत. सदर कामाकरिता सन २००३-०४ या वर्षाकरिता तरतूद उपलब्ध आहे असे प्रमाणित करण्यांत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित खर्च
२.	मिरा रोड नियोजित स्मशानभूमी ब्युरल ग्राऊंड पर्यंत दोन्ही बाजूस गटार बांधणे	२५,०३,४०३/-

१.	मे.पारस कंन्स्ट्रक्शन	०.५० टक्के कमी दराने
२.	मे.असफाल्ट इंडिया कार्पो	१.३० टक्के जास्त दराने
३.	मे.श्री.जी.कंन्स्ट्रक्शन	०.१ टक्के कमी दराने
४.	मे.एम.डी.नेमाणे	२.०० टक्के जास्त दराने

रील पैकी ठेकेदार मे पारस कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराची निविदा वाजवी असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतूदी अन्वये मंजूर करण्यात येत आहे. सदर कामाचा कार्यादेश अर्थसंकल्प मंजुरीनंतर देण्यात यावा.
सदर कामी ठेकेदाराची वेळोवेळी येणा-या देयक प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे

सूचक :- श्री चंद्रकांत वैती

अनुमोदन :- श्री दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.

प्रकरण क्रमांक११९ :- भाईंदर पूर्व फाटक (पाण्याच्या टाकीच्या बाजूने) ते काशिमिरा रोड झुणका भाकर केंद्र उघाडीपर्यंत नाका बांधणे कामाच्या निविदास मंजूरी देणे.

ठराव क्र. १२२

दिनांक २८/१/२००३ रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील कामांकरिता ठेकेदारानी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित खर्च
१.	भाईंदर (पूर्व) फाटक (पाण्याच्या टाकीच्या बाजूने) ते काशिमिरा रोड झुणका भाकर केंद्र उघाडीपर्यंत नाला बांधणे.	४३,१०,०००/-
	ठेकेदाराचे नांव	दर
१.	मे.एम.डी.नेमाणे	७.०० टक्के जास्त दराने
२.	मे.जय अंबिका कंन्स्ट्रक्शन	४.०० टक्के जास्त दराने
३.	मे.गुरुजी कंन्स्ट्रक्शन	०.७५ टक्के कमी दराने
४.	मे.जिनेश्वर इंजिनीअरींग	निविदेमध्ये दराचा उल्लेख केलेला नाही.

वरील पैकी ठेकेदार मे गुरुजी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.७५ टक्के कमी दराची निविदा वाजवी असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतूदी अन्वये मंजूर करण्यात येत आहे. सदर कामाच्या कार्यादेश अर्थसंकल्प तरतुदीनंतर देण्यात यावा

सदर कामी ठेकेदाराची वेळोवेळी येणा-या देयक प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री हरेश गावंड

अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.

प्रकरण क्र.१२० :- दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत करावयाच्या कामांच्या निविदांना मंजूरी देणे.

ठराव क्र. १२३

दिनांक ११/२/२००३ रोजीच्या दैनिक सामना या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील कामांकरिता ठेकेदारानी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव /ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च
१.	राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर बाबळीची भाट येथे नॅशनल प्लास्टीक ते ते सविता मोरे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे खडीकरण डांबरीकरण करणे.	९,६७,८४१/-
१.	मे.साईदत्त इंटरप्राईजेस	४.०० टक्के जास्त दराने
२.	मे.असफास्ट इंडिया कार्पोरेशन	३.०० टक्के जास्त दराने
३.	मे.श्रीजी कंन्स्ट्रक्शन	०.२० टक्के कमी दराने
२.	माशाचा पाडा रोडवर डिसोझा वाडी ते मीनाक्षी नगरपर्यंत रस्ता रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे.	१०,२३,५९५/-
१.	मे.साईदत्त इंटरप्राईजेस	४.०० टक्के जास्त दराने
२.	मे.श्रीजी कंन्स्ट्रक्शन	०.२० टक्के कमी दराने
३.	मे.असफास्ट इंडिया कार्पो	३.०० टक्के जास्त दराने

वरील काम हे दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत करावयाचे असून मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. क्र.१ व क्र.२ च्या कामाकरिता मे श्री.जी. कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.२० टक्के कमी दराची निविदा वाजवी असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधील तरतूदी अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

सदर कामी ठेकेदाराची वेळोवेळी येणा-या देयक प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे

सूचक :- श्री हरेश गार्डी

अनुमोदन :- श्री दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. १३/३/२००३

प्रकरण क्र.१२१ :- भाईंदर पूर्व आर.एन.पी.पार्क अक्षिता अपार्टमेंट ते मलनि:सारण केंद्र पाठीमागून गटार बांधणे ऐवजी जागा बदलून भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथे गटार बांधणे कामास मंजूरी देणे.

ठराव क्र. १२४

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पूर्व आर.एन.पी.पार्क अक्षिता अपार्टमेंट ते मलनि:सारण केंद्र पाठीमागून गटार बांधण्याचे कामास मा.प्रशासकीय ठराव क्र.१२९ , दि.४.७.२००२ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामाचा अंदाजित खर्च रु.३,६३,९५८/- एवढा आहे. सदरचे काम हे मा.जिल्हा उपनिबंधक ठाणे जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था लि. यांच्या शिफारशीनुसार अंदाजपत्रक दराने दि.२९.८.२००२ च्या कार्यादेशान्वये मे.श्रीमजूर कामगार सहकारी संस्था लि. यांना देण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात कामास सुरुवात करते वेळी स्थानिक नगरसेवक मा.श्री.रोहिदास पाटील व नगरसेविका मा.सौ.शानू गोहिल यांनी सदर गटार ही सोसायटी मार्फत बांधून घेण्याचे स्थानिक नागरिकांकडून मान्य करुन घेतल्याने सदर गटार महानगरपालिकेमार्फत आवश्यकता नाही.

भाईंदर (पूर्व) बंदरवाडी झोपडपट्टी येथे सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता गटार नसल्याने व सांडपाणी इतरत्र पसरुन दुर्गंधी पसरल्याने अक्षिता अपार्टमेंट ते मलनि:सारण केंद्र येथे गटार बांधण्याऐवजी त्याच मंजूर प्राकलन, आरखडयानुसार संकल्प चित्रात बदल न करता सदर जागा बदलून बंदरवाडी ~~वाडी~~ येथे गटार बांधण्याबाबत नगरसेवक मा.श्री.रोहिदास पाटील व नगसेविका मा.सौ.शानू गोहिल यांनी मागणी केलेली आहे. तरी सदर प्रस्तावानुसार जागा बदल करण्यास मंजूरी देण्यात येत आहे..

सुचक :- श्री. दिनेश नलावडे   अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३।३।०३.

Cancel 12-2

प्रकरण क्र १२२:- महानगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये नविन दुरध्वनी व्यवस्था करणेकरिता ई.पी.ए.बी.एक्स दुरध्वनी यंत्रणा, टेलिफोन इस्ट्रुमेंट खरेदी करणे व संपूर्ण कार्यालयामध्ये वायरींग करणेकामी फेरनिविदा स्विकारणेस मंजुरी देणे.

ठराव क्र. १२५.

महानगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये नविन दुरध्वनी व्यवस्था करणेकरिता ई.पी.ए.बी. एक्स. दुरध्वनी यंत्रणा टेलिफोन इस्ट्रुमेंट खरेदी करणे व संपूर्ण कार्यालयामध्ये वायरींग करणेकामाबाबतची निविदा मागील सभेत ठरल्याप्रमाणे त्याची फेरनिविदा काढण्यात यावी.

सुचक :- श्री. चंद्रकांत वैती (Vaity)

अनुमोदन :- श्री. धनराज अग्रवाल (Dhanraj ...)

सभापति
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.१३/३/२००३

प्रकरण क्र.१२३ :- निवडणूक कालावधीतील अतिकालीन भत्ता देणे बाबत.

ठराव क्र. १२६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २००२ मध्ये दि.१०/६/२००२ ते १३/७/२००२ या कालावधीत व निवडणूक सुरु होण्यापूर्वी व निवडणूक कार्यक्रम पार पाडल्यानंतर ही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी निवडणूकीचे काम समय मर्यादेचे संवेदनशील, जिकीरीचे आणि दगदगीचे काम अत्यंत परिश्रमपूर्वक व जबाबदारीने सार्वजनिक सुट्टीचे दिवशी व त्यांचे नित्य दैनंदिन कार्यालयीन कामकाज सांभाळून कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त वेळ थांबून निवडणूकीचे काम अत्यंत चोख पार पाडले आहे. परंतु महानगरपालिकेने त्यांना कोणत्याही प्रकारे अतिरिक्त भत्ते अद्याप दिलेले नाहीत.

शासन निर्णय व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दि.१.११.१९९९, दि.२७/११/२००१ व दि.८/१०/२००२ अनुसार ज्या महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी निवडणूकीचे काम केले आहे. त्यांना निवडणूक कामाबाबत अतिकालिन भत्ता देण्याची तरतूद असलयाने शासन निर्णयास अनुसरुन नियमानुसार अतिकालीन भत्ता रु.४,६५,०००/- मंजूर करणेस येत असून येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. शिवप्रसाद भुंडेकर अनुमोदन :- श्री. हरेश गावड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.२१/०३/२००३

प्रकरण क्र.१२४:- दि.२१/०२/२००३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.१२५:-

दि.२१ / ०२ /२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. शशीकांत शहा   अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०३/२००३

प्रकरण क्र. १२५ :- **अग्निशमन विभागाकरिता साहित्य खरेदी करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.**

ठराव क्र. १२८ :-

सदर विषय हा पुढील स्थायी समिती सभेत सविस्तर माहितीसह सादर करण्यांत यावा.

सुचक :- ज्योत्स्ना हसनाळे. **अनुमोदन :- अशोक पाटील.**

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०३/२००३

प्रकरण क्र. १२६ :- **काशि मिरा रस्त्यास समांतर ३०० मी.मी. व्यासाची बिडाची जलवाहिनी टाकणे (एस.के. स्टोन ते काशी मिरा जंक्शन).**

ठराव क्र. १२९ :-

सदर विषय हा पुढील स्थायी समिती सभेत सविस्तर माहितीसह सादर करण्यांत यावा.

सुचक :- **धनराज अग्रवाल.** **अनुमोदन :-** **शिवप्रकाश भुदेका.**

ठराव सर्वानुमते मंजुर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०३/२००३

प्रकरण क्र. १२७ :- **मिरा भाईंदर शहरातील विविधी विभागातील पाण्याच्या टाक्यांसाठी कंपाऊंड वॉल (संरक्षक भिंत) बांधणे.**

ठराव क्र. १३० :-

सदर विषय हा पुढील स्थायी समिती मा. आयुक्तांशी सविस्तर चर्चा करुन सादर करण्यांत यावा.

मा. सभापतींच्या आदेशानुसार

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा. स्थायी समिती दिनांक :- २१/३/२००३

* ~~प्रशासकीय ठराव~~ *

प्रकरण क्र. १२८ :- आर. एन. पी. पार्क व नवघर येथील टँकर पॉईंट बंद करून कनकिया पार्क येथे हलविणेबाबत

ठराव क्रमांक:- 939

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील आर. एन. पी. पार्क, कस्तुरी पार्क व जवळील परिसर यांना महानगरपालिकेची जलवाहिनी तथा नळ जोडणी झालेली नसल्या कारणाने आर. एन. पी. पार्क येथे टँकर पॉईंट काढण्यात आला होता. टँकरच्या ध्वनी व वायुप्रदुषनाने संबंधित विभागातील रहिवाश्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत असल्याने रहिवाश्यांच्या अनेक तक्रारी आल्या होत्या, सदर रहिवाश्यांच्या तक्रारींचा विचार करता, आर. एन. पी. पार्क येथील टँकर पॉईंट बंद करून कनकिया पार्क येथील टँकर पॉईंट सुरु करण्यांस या ठरावाद्वारे मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

सूचक :- श्री. चंद्रकांत वैती,

अनुमोदन :- श्री. शशिकांत शाह,

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

९६३

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.२१/०३/२००३

प्रकरण क्र.१२८ :- सचिव कार्यालयाकरिता विशेष कार्यकारी अधिकारी मानधनावर नेमणेबाबत.

ठराव क्र. १३२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८/२/२००२ रोजी झाली असून महानगरपालिकेच्या सचिव कार्यालयात कर्मचारी वर्ग अपूरा आहे. तसेच महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे शिक्षण समिती, परिवहन समिती व प्रभाग समित्या इत्यादी स्थापन करावयाच्या आहेत. तसेच महानगरपालिकेच्या मा.महासभा व मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत तयार करणे, कायदेशीर बाबी पाहणेकरिता वाढीव कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

ठाणे महानगरपालिकेचे उपसचिव श्री. बी.एस.माळी हे दि. २८/२/२००३ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. व त्यांनी दि. १२/३/२००३ रोजी अर्ज करुन मानधनावर नेमणूक करणेबाबत विनंती केलेली आहे. तरी त्यांचा कामाचा अनुभव पाहता त्यांना तात्पुरत्या स्वरुपात * ५ (पाच) महिन्यांकरिता मानधनावर सचिव कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करणेबाबत मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यांत येत आहे.

* व रु. १०,०००/- च्या आतमध्येच मानधन ठरविण्यात यावे या अटीशर्तीस अधिन राहून

सुचक :- श्री. लिओ कोलासो अनुमोदन :- श्री. शशीकांत शाह.

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०३/२००३

प्रकरण क्र. १३० :- **जकात नाक्यांकरिता कॅबीन खरेदी करणेंस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. १३३ :-

सदरचा विषय हा पुढील स्थायी समिती सभेत सविस्तर माहितीसह सादर करण्यांत यावा.

मा. सभापतींचे आदेशानुसार

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.२१/०३/२००३

प्रकरण क्र.१३१ :- जकात अभिकर्त्यांची बी.एस.ई.एस.कडून जमा झालेली जकातीची रक्कम परतावा करणेबाबत

ठराव क्र. १३४

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन होणेपूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात असताना सन १९९८/९९ मध्ये जकात वसुलीचा ठेका मे. मॅस्कोट ॲटोमेशन लि., मुंबई यांना देण्यात आला होता. सदर ठेक्याची विहित रक्कम रु.१७,२५,००,५०५/- इतक्या रक्कमेचा १० महिन्याच्या करारावर जकात वसुलीचा ठेका दिला होता व ती रक्कम त्यांनी पूर्ण भरणा केलेली आहे. सदर ठेकेदाराच्या मुदतीमध्ये बी.एस.ई.एस. या कंपनीकडून मालाची आयात नगरपालिका क्षेत्रात केलेली होती. सदर कंपनीला धनादेशाद्वारे रक्कम भरण्याची मुभा दिलेली होती. त्यामुळे सदर कंपनीने आयात केलेल्या मालाची जकातीची रक्कम रु. १०,७७,३२५.३४ इतकी धनादेशाद्वारे जमा केलेली आहे. परंतु सदरची रक्कम ठेका संपल्यानंतर नगरपालिकेत जमा झाल्याने व मालाची आयात ही ठेक्याच्या मुदतीत झाली असल्याने मे. मॅस्कोट ॲटोमेशन लि., मुंबई यांनी बी.एस.ई.एस.कडून ठेक्याच्या मुदतीत जमा झालेली रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे. जमा झालेल्या रक्कमेचा धनादेश न वटल्याने रक्कम रु.१,५०,०००/- कमी भरणा केलेला आहे. तरी रक्कम रु. १०,७७,३२५.३४ मधून रक्कम रु.१,५०,०००/- इतकी कमी करुन उर्वरीत रक्कम रु.९,२७,३२५.३४ इतकी त्यांना अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. हरेश लक्ष्मण गावंड   अनुमोदन :- श्री. शशीकांत आर. शहा

ठराव सर्वानुमते मंजुर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २१/०३/२००३

प्रकरण क्र. १३२ :- **मा. महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती व पदाधिकारी यांना शासकिय दौऱ्यांवर जाणेकामी येणाऱ्या खर्चाबाबत धोरण ठरविणे.**

ठराव क्र. १३५ :-

सदरचा विषय पुढील स्थायी समिती सभेत सविस्तर माहितीसह सादर करण्यांत यावा.

मा. सभापतींचे आदेशानुसार

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/०३/२००३

अभिनंदन ठराव क्र. १३६ :-

विशेष कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक झालेबाबत.

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.२८/३/२००३

प्रकरण क्र.१३३:- दि.१३/०३/२००३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.१३८:-

दि. १३/०३/२००३ रोजीच्या मा स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी अनुमोदन :- श्री. शिवप्रकाश बुदेका

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.२८/३/२००३

प्रकरण क्र.१३४:- सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देवून नविन निविदा मागविणेबाबत.

ठराव क्र. १३८

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महत्वाचे ठिकाणी मिरारोड पोलिस स्टेशन यांनी माहे एप्रिल २००० मध्ये अतिरेकी हल्यापासून दक्षता/सावधानता बाळगण्याचे दृष्टीने दिलेल्या इशाऱ्यानुसार तत्कालिन नगरपालिकेने वृत्तपत्रात बंदुकधारी सुरक्षा रक्षक कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत जाहिर निविदा प्रसिध्द करुन प्राप्त निविदा मधून सर्वात कमी दराची निविदा मे. बॉम्बे इंन्टेलिजंट सिक्युरिटी (इ) लि. यांची मंजूर केली होती. त्या अनुषंगाने दि. १/६/२००० ते दि. ३१/५/२००१ अशा प्रथम कंत्राटी पध्दतीने बंदुकधारी सुरक्षा रक्षक पुरविण्याचा ठेका दिलेला आहे. त्यानंतर दि.१/६/२००१ ते दि. ३१/५/२००२ व दि.१/६/२००२ ते दि.३१/३/२००३ या कालावधीत पूर्वीच्याच मंजुर दराने पुरवठा करण्यास तयार असल्याने त्यांना दोन वेळा मुदतवाढ देण्यांत आली होती. त्याचप्रमाणे त्यांनी दि. १३/३/२००३ रोजीचे पत्रा अन्वये पूर्वीच्याच दराने बंदुकधारी सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यास तयार असल्याने पुन्हा दि.१/४/२००३ पासुन एक वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. परंतु एकाच ठेकेदारास वारंवार मुदतवाढ देणे संयुक्तीक नसल्याने व पोलिसानी दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्यास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महत्वाचे ठिकाणी जसे मुख्य कार्यालय, पाणी पुरवठा करणाऱ्या टाक्या, पंपींग स्टेशन, येथे बंदुकधारी सुरक्षा रक्षकाची आवश्यकता आहे. करिता सध्याच्या कंत्राटदाराची मुदत ~~दि. ३०/४/२००३ पर्यंत एक महिन्याकरीता~~ पुढील कार्यादेश देईपर्यंत वाढविण्यास यावी. व * नविन सुरक्षा रक्षक ठेका (कंत्राटी) पध्दतीने मागविण्याबाबत निविदा काढणेस मंजूरी देण्यांत येते. तसेच महापालिकेतील काही सफाई कामगारांमधून सुशिक्षीत, सुदृढ अशा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देवून महापालिकेचा सुरक्षा विभाग भविष्यात कार्यरत करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

सूचक :- श्री याकुब कुरेशी   अनुमोदन :- श्री. मेहेंद्रसिंग चौहान

ठराव सर्वानुमते मंजूर

* मे. बॉम्बे इंटेलिजन्स सेक्युरिटी (इंडिया) लि. अंतिम देयकातून मनपा जुने कार्यालय वापर/ वीज वापर/पाणी वापर इत्यादीची वसुली करुन घेवूनच अंतिम देयक प्रदान करावे.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८. ३. २००३

प्रकरण क्र. १३५ :- महानगरपालिका मुख्य कार्यालय मध्ये मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स्थायी समीती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, समिती सभागृह या ठिकाणी कारपेट पुरवठा करुन, बसविणेबाबत निविदांना मंजूरी देणे.

ठराव क्र. :- ९३९

महानगरपालिकेने दि. ७/१/२००३ रोजी " दै. आपला वार्ताहर, व सुरजप्रकाश " या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुंसार मा. महापौर, मा. उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, समिती सभागृह आयुक्त केबिनला कारपेट पुरवठा करुन, बसविणे बाबत खालील ठेकेदारांनी आपल्या निविद मुदतीत सादर केल्या आहेत.

अ. क्र.	तपशिल	मे. वोरा कंस्ट्रक्शन	मे. पारस इंटरप्राईज	मे. किर्ती पी व्होरा
१]	महानगरपालिका कार्यालयामध्ये महापौर, उपमहापौर, सभापती, स्थायी समिती सभागृह नेता विरोधी पक्ष नेता, समिती सभागृह कारपेट पुरवठा बसविणे.			
अ]	एल. जी/मिलीयम कारपेट टाईल्स.	रु. ११८/- प्रति स्के. फुट	रु. १२०/- प्रति स्के. फुट	रु. १३०/- प्रति स्के. फुट
ब]	सनफेलक्स वुलन कारपेट	रु. ७४/- प्रति स्के. फुट	रु. ७६. ५०पै. प्रति स्के. फुट	रु. ७९/- प्रति स्के. फुट

वरील तुलनात्मक तक्ता पाहता " मे. वोरा कंस्ट्रक्शन " यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. या कामी दि. ६. २. २००३ रोजी सर्वात कमी निविदाधारक यांना चर्चेला बोलाविले असता, झालेल्या चर्चेनुंसार त्यांनी निविदेतील प्रत्येकी [अ] रु. १०/- व [ब] रु. ४/- कमी करण्याचे मान्य करुन लेखी पत्र दिलेले आहे. त्यानुंसार त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	तपशिल.	निबिदेतील दर	कमी केलेले दर
१]	एल. जी. /मिलीयम कारपेट टाईल्स	रु. १९८/- प्रति स्के. फुट	रु. ११०/- प्रति स्के. फुट
२]	सनफेल्क्स बुलन कारपेट	रु. ७४/- प्रति स्के. फुट	रु. ७०/- प्राति स्के. फुट

वरील प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस व येणारे देयक अदा - करणेस ही सभा " मुबंई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ [५] नुसार - मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. लिओ कोलासो. अनुमोदन :- श्री. गावंड हरेश लक्ष्मण.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. २८/३/२००३

प्रकरण क्र.१३६ :- महापौर चषकाच्या वाढीव खर्चास मंजूरी देणे

ठराव क्रं. :- ~~१३६~~ १४०

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.१४.२.२००३ ते १६.२.२००३ या कालावधीत महापौर चषक सामने आयोजित करण्यात आलेले होते. सदर कामी होणा-या खर्चाकरिता रु.७.०० लक्ष मंजूर करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेकरिता खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.क्र	तपशिल	रक्कम
१)	कॅटरींग सर्व्हिसेस	२,४०,०००/-
२)	बक्षीसे	१,५०,०००/-
३)	प्रवासभत्ता व मानधन	२,७१,०००/-
४)	टीशर्ट, टोपी, पॅन्ट	१,००,०००/-
५)	मंडप,स्टेज,लाईटस,टेबल,खुर्च्या व इतर	३,५०,०००/-
६)	मैदान लेव्हल करणे	५०,०००/-
७)	स्पोर्ट सामान	५०,०००/-
८)	बॅनर्स, झेंडे	१,००,०००/-

वरील प्रमाणे एकूण रु.१३,६१,०००/- एवढा खर्च झालेला असून देयके प्रदान करावयाची बाकी आहे. रु.७.०० लक्ष मंजूर करण्यात आलेले होते. तरी वाढीव खर्च रु.६,११,०००/- सह रु.१३,६१,०००/- एवढया खर्चाचे समायोजन करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- याकुब कुरेशी

अनुमोदन :- हरेश गावंड

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.०५/०४/२००३

प्रकरण क्र.१३७:- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सार्व. रस्त्यावर संरक्षण जाळ्यासह झाडे लावून तीन वर्षे देखभाल करणे बाबत निविदा मागविणे.

ठराव क्र. ९३५ ९४१

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात ठेका पध्दतीने झाडे लावणेबाबत फेर निविदा मार्गावणे विषयावर विचार विनिमय होऊन मागील दोन वर्षात कमी प्रमाणात झाडे लागवड झालेली असल्याने झाडे ठेका पध्दतीने लावून न घेता झाडे महानगरपालिकेने स्वतः झाडाची रोपे, संरक्षण जाळया, लालमाती शेणखत व अन्य झाडे लावण्यास आवश्यक साहित्य व मजूर घेऊन काम करावे. प्रत्येक प्रभागात किमान ५० झाडे याप्रमाणे सर्व मिरा भाईंदर परिसरात झाडे लावण्यात यावीत. फेर निविदा मागवून भाईंदर (प) भाईंदर (पूर्व) मिरा रोड, काशिमिरा ते घोडबंदर, मुर्धा ते उत्तन, चौक अशा पाच विविध विभागात १५०००/- झाडे लावण्याचा ठेका निविदा मागवून देण्यांत यावा. तसेच मे. दिप डेव्हलपर्स मुंबई यांची निविदा नामंजूर करुन त्यांची बयाणा रक्कम त्यांना परत करण्यात यावी. व महानगरपालिकेच्यावतीने सर्व प्रभागात झाडे लावण्यास येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

सूचक :- श्री. मिलन वसंत म्हात्रे
मिलन व.म्हात्रे

अनुमोदन :- श्री. हरेश गावंड
(सही)

ठराव सर्वानुमते मंजूर

(सही)
अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. ५/४/२००३

प्रकरण क्र.१३८ :- मिरा गावठण सर्व्हे नं.७७ महाविष्णू मंदिराच्या मागील तलावातील गाळ काढणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ९४२

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा गावठण महाविष्णू मंदिराच्या मागे सार्वजनिक तलाव असून महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर तलाव अजून पर्यंत विकसित करण्यात आलेला नाही. सदर तलाव यापूर्वी महानगरपालिकेने (तत्कालिन नगरपरिषदेने) खाजगी मालकांकडून खोदून घेतलेला होता. परंतु सदर तलावाची खोली कमी असल्याने पाणी लवकरच आटते. सदर तलाव खोदून सुशोभिकरण करणे बाबत स्थानिक नगरसेवकांनी मागणी केलेली आहे. सदर तलाव स्वखर्चाने खोदून माती काढणेबाबत दि.१२.३.२००३ च्या पत्रान्वये मे. मयूरी मटेरियल सप्लायर्स यांनी परवानगी मागितलेली आहे. सदर तलाव व्यवस्थितरित्या महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार खोदून घेतल्यास महानगरपालिकेचा खर्च वाचणार आहे. तरी मे.मयूर मटेरियल सप्लायर्स यांना महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार तलाव खोदण्यास तसेच सक्षम विभागाची रॉयल्टी घेऊन अटीशर्तीसह परवानगी देण्यास मंजूरी देण्यात येत आहे..

सूचक :- सौ.ज्योत्स्ना हसनाळे

अनुमोदन :- श्री.हरेश गावंड

ठराव सर्वानमुते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.५/४/२००३

प्रकरण क्र.१३९ :- मिरा गाव येथे भाडयाने घेतलेल्या शाळेच्या वर्गाचे भाडे अदा करणेस मंजूरी देणे.

ठराव क्र. ९४३

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरा गाव येथे जुनी शाळागृह इमारतीमधील वर्ग अपुरे पडत असल्याने जुनी शाळा इमारत तोडून नविन शाळेचे काम हाती घेण्यात आलेले होते. सदर जुन्या शाळेतील एकूण ४ वर्गाकरिता मे. भोईर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांनी आपल्या इमारतीमध्ये जागा दिलेली होती. सदरचे वर्ग १ जून ९९ ते ३० जून २००१ या कालावधीत भरत होते.

सदर वर्ग (२०' ०" x २०' ०") आकाराचे असून सदर वर्गाचे सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी ठरविलेल्या भाडयानुसार रु.२.४४ चौ फुट दराने रु.९७६/- प्रतिमहिना भाडे होत आहे. परंतु मे भोईर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांनी रु. ५००/- प्रति वर्ग प्रति महिना भाडयाची मागणी केलेली आहे. त्यानुसार ४ वर्गाचे २४ महिन्याकरिता एकूण रु.४८,०००/- भाडे होत आहे. तरी सदर भाडे प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- श्री.हरेश गावंड

अनुमोदन :- श्री.दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०४/२००३

प्रकरण क्र. १४० :- **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे काढून टाकणेकरिता पोकलन मशिन, जे.सी.बी., क्रेन, डंपर, गॅसकटर इ. भाड्याने घेणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत.**

ठराव क्र. ७४४ **:-**

सदरचा विषय पुढील सभेत सर्व माहितीसह घेण्यांत यावा असे सुचित करण्यांत आले.

मा. स्थायी समिती सभापती यांचे आदेशानुसार.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

॥ प्रशासकीय ठराव ॥

प्रकरण क्र: १२१:- डोंगरी व पाली येथील पंपिंग मशिनरी ठेका पद्धतीने चालविण्याच्या कामास मुदतवाढ मिळणेबाबत...

ठराव क्र. १४५ दिनांक

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पंप चालकांची पुरेशी पदे उपलब्ध नसल्याने डोंगरी व पाली येथील पंपिंग मशिनरी ठेका पद्धतीने चालविणेचे काम मे. साई विना एन्टरप्रायजेस, भाईंदर (प.) यांना दि. १/१०/२००१ ते दि. ३०/९/०२ या कालावधीकरिता देण्यात आलेले होते. उपरोक्त ठेका खालील दराने देण्यात आला होता.

१) डोंगरी येथील पंपींग स्टेशन :- रू. २४,०००/- प्रति महिना

२) पाली येथील पंपींग स्टेशन :- रू. १७,३००/- प्रति महिना

तद्नंतर सदर कामाची मुदत प्रशासकीय ठराव क्र. १५९ दि. ०४/०७/२००२ अन्वये दि. ३१/३/२००३ पर्यंत वाढविणेत आलेली आहे.

डोंगरी येथील संप, पंप हाऊस व पंपींग मशिनरीची नवीन कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केल्यानंतर डोंगरी येथील पंपींग मशिनरी तीन पाळ्यात चालवावी लागणार आहेत. त्यासाठी सदरची कामे पूर्ण झाल्यावर ठेका पद्धतीने पंपींग मशिनरी चालविणेच्या कामाचा विस्तार होणार आहे. सद्यस्थितीत १६-१७ वर्षे जुनी असलेली डोंगरी येथील मशिनरीवर आणखी एक वर्षे तरी अवलंबुन रहाणार असल्याने व उपरोक्त ठेकेदारास अस्तित्वात असलेली जुनी पंपींग मशिनरी चालविण्याचा अनुभव असल्याने तत्कालिन न.प. आदेश क्र. नपा/पापु/२१६५/४७७२/०१-०२ दि. २९/९/२००१ अन्वये दिलेल्या कार्यादेशास या प्रशासकीय ठरावाद्वारे दि. ३१ मार्च २००४ पर्यंत मुदत वाढीस स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक श्री. लिओ कोलासो अनुमोदक श्री. कुरेशी याकुब इस्माईल

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

॥ प्रशासकीय ठराव ॥

प्रकरण क्र. १४२:- जेसल पार्क संकुलनातील मलनिस्साऱ्या केंद्राची देखभाल करणे तसेच सदर केंद्राची आवश्यक दुरुस्ती करणेच्या कामास मुदतवाढ देणेबाबत...

ठराव क्र. १४६ दिनांक

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) जेसेल पार्क येथे मलःनिस्सारण केंद्राचा कार्यभार दि. १८/२/२००३ पासून पाणी पुरवठा विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. मे. सैनिक एन्टरप्रायजेस यांना विषयांकित काम तत्कालिन नगरपरिषदेतर्फे देण्यात आलेले होते. तद्नंतर उपरोक्त कामास दिनांक ३१/३/२००३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरहु काम पाणी पुरवठा विभागाकडे नव्याने आलेले आहे. नविन निविदा मागविण्याच्या प्रक्रियेकरिता किमान दोन महिन्यांचा कालावधी आवश्यक आहे. मे. सैनिक एन्टरप्रायजेस यांचे काम समाधानकारक आहे. तरी पुढील वर्षाकरिता नविन निविदा मागविणे व सन २००२-०३ च्या आर्थिक प्रशासकिय खर्चास ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक श्री. सुरेश गावंड अनुमोदक श्री. दिनेश द. नलावडे

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

९७८

मिरा भाईंदर महानगरपालिका

॥ ~~प्रशासकीय~~ ठराव ॥

प्रकरण क्र: १४३:- खाजगी टँकरने पाणी पुरवठा करणेचे कामास मुदतवाढ देणे.

ठराव क्र. १४७ दिनांक

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ज्या संकुलांना, झोपडपट्टी इ. ठिकाणी महानगरपालिकेची जलवाहिनी तथा नळ जोडणी नाही, अशा विभागात व धार्मिक कार्यक्रम, समारंभासाठी महानगरपालिकेतर्फे रू. २७५/- या माफक दराने मागणीनुसार व गरजेनुसार टँकरने पाणी पुरवठा केला जातो. सदरच्या कामासाठी मे. सागर वॉटर सप्लाय यांना दि. १६/६/२००१ अन्वये ठेका देण्यात आला होता. तथापि सदरहु कालावधी पुर्ण झाल्यावर ठेकेदारास पुन्हा एका वर्षाची मुदत वाढ देण्यात आली होती.

तथापी सदरची मुदतवाढ दि. ३१/३/२००३ पर्यंत असून, व ३१/७/२००३ पर्यंत मुदतवाढ देऊन पुढील वर्षाकरिता नविन निविदा मागविणे व सन २००२-०३ च्या आर्थिक व प्रशासकीय खर्चास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

सुचक श्री. महेंद्रसिंग चव्हाण अनुमोदक श्री. जेम्स डिसिल्वेर कोलासो

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

॥ प्रशासकीय ठराव ॥

प्रकरण:- १४४:- नवघर येथील संप व पंप हाऊस बांधणेसाठी भुखंड विकसित करणे.

ठराव क्र. १४८ दिनांक

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत नवघर येथे ५० द.ल.लि. योजने अंतर्गत २०५ द.ल.लि. क्षमतेची उंच जलकुंभ पुर्णत्वाच्या मार्गावर आहे. सदरहु जलकुंभा शेजारी ४.५० द.ल.लि. क्षमतेचा संप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे बांधण्यात येत असून नियोजीत जागेत बारमाही पाणी साठलेले असते. संपाच्या बांधकामाच्या दृष्टीने व तांत्रिक दृष्ट्या संपाची जागा जमीन पातळीपर्यंत समतल करणे जरूरी आहे. तरी उपरोक्त ठिकाणी मुरमाने भराव करावयाचे असल्याने त्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे व अंदाजीत रक्कम रू. ७,६६,३६१/- इतकी आहे. तसेच सन २००२-०३ अर्थ संकल्पात विघ्नन विहीर व बोरवेल या कामासाठी रक्कम रू. १०,००,०००/- एवढी तरतूद असून आज मितीस रक्कम रू. १०,००,०००/- एवढी शिल्लक आहे. भुखंड विकसीत झाल्यावर नियोजीत संप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे त्वरित हाती घेण्यात येणार आहे. तरी निविदा मागविणे व सन २००२-०३ च्या आर्थिक व प्रशासकीय खर्चास ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक श्री. तुळशीदास म्हात्रे अनुमोदक श्री. मिलन वसंत म्हात्रे.

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

॥ प्रशासकीय ठराव ॥

प्रकरण क्र.:- १७५ :- अनधिकृत नळ जोडण्या दंडात्मक रक्कम घेऊन नियमित करणे.

ठराव क्र. १४९ दिनांक

मिरा भाईंदर शहरामध्ये सन १९९३ पासून अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नविन नळजोडण्या देण्याचे काम बंद करणेत आले होते. मिरा भाईंदर शहरास ५० द.ल.लि. योजनेमुळे पाणी पुरवठ्यात वाढ होऊन शासनाच्या निर्देशानुसार नविन नळ जोडण्या देण्याचे काम सुरू करणेत आले आहे.

तसेच दरम्यानच्या काळात मालमत्ता धारकांनी विना परवाना / अनधिकृत नळजोडण्या घेतल्या. बहुतांशी नळजोडण्या दंडात्मक रक्कम घेऊन नियमित करणेत आल्या. गावठण भाग व दलित वस्ती या विभागातील रहिवाश्यांनी दंडात्मक रक्कम आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने अद्याप अदा केलेली नाही. दंडात्मक रक्कम भरणा करावा यासाठी संबंधितांना मनपाने नोटीसाही नियमित केल्या. तथापी आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने अद्याप रक्कम भरणेत आली नसून संबंधित नळजोडणी धारकांनी दंडात्मक रक्कम टप्पा टप्प्याने भरण्यासाठी विनंती केली आहे.

तरी दंडात्मक रक्कम सहा महिन्यांमध्ये चार टप्यात भरणेसाठी सवलत दिल्यास निर्धारित वेळेत ठराविक महसुल जमा होईल. तथापी या प्रशासकीय ठरावाद्वारे टप्पा टप्प्याने दंडात्मक रक्कम भरणा करणेस ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक श्री. अशोक पाटील अनुमोदक श्री. हरेश गावंड ~~श्रीम. [illegible]~~

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.

प्रकरण क्र.१४६ :- बाजार फी वसुली रु.५/- ऐवजी रु.२०/- इतकी करण्यास मंजूरी देणे.

ठराव क्र. १५०. ३१०५/०३

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रतिवर्षी भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम, मिरा रोड ते चेणे मुर्धे ते उत्तन या चार विभागाचा बाजार लिलाव प्रति वर्षी करीत असते. बाजार लिलावास महानगरपालिकेस ठोस असे उत्पन्न मिळत आलेले आहे. सन २००२-०३ या वर्षी चार विभागांच्या बाजार लिलावा पासून रु.१,०८,१०,०००/-इतके उत्पन्न मिळालेले आहे. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अटीशर्तीप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात बाजार फी वसुली रु.५/- प्रति चौ.मी. याप्रमाणे वसूल केली जात आहे. सदर फी चा दर हा तात्कालिन नगरपरिषदेपासून चालू आलेला आहे. या बाजार फी मध्ये कोणत्याही प्रकारची वाढ आजपर्यंत सुचविण्यात आलेली नाही. याकरिता बाजार फी ~~रुपये १० /- प्रति चौ.मी. आकारण्यास व वाढलेल्या आकारणीनुसार देकार रक्कम वाढवून घेण्यास ही सभा शिफारस करीत आहे.~~

रुपये ५/- या प्रमाणे बाजार फी वसुली करावी.

सुचक :- [handwritten signature]

अनुमोदन :- [handwritten signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]

अध्यक्ष स्थायी समिती

अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

०२५ विभाग.

प्रकरण क्र.१४७ :- विकास आराखडयातील आरक्षण क्र.७१ शाळा/कॉलेज विस्तार या आरक्षणातील जागेचे भूसंपादन करण्यास मंजूरी देणे.

ठराव क्र. १५७

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि.१४.५.९७ रोजी मंजूर झाली असून १५.७.९७ पासून अंमलात आली आहे. मंजूर विकास योजनेत मौजे भाईंदर स.क्र.३६५ (पै) या जागेत आ.क्र.७१ माध्यमिक शाळा विस्तार क्षेत्र - ०.६६ (हे) असून विकास योजना अहवालाप्रमाणे आरक्षण विकसित करण्याचे समूचीत प्राधिकरण नगरपरिषद दर्शविले आहे. सदर आरक्षणालगत भाईंदर केळवणी मंडळ संस्थेची जे.एच. पोद्दार शाळा आहे. सदर, शाळेच्या विस्तारासाठीच, आ.क्र.७१ माध्यमिक शाळेसाठी विस्तार हे आरक्षण विकास योजनेत प्रस्तावित केले आहे परंतू समूचित प्राधीकरण नगरपरिषद दर्शविले असल्याने. त्या संस्थेस भुसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिरी ठाणे यांचेकडे सादर करता येत नाही म्हणून संस्थेने भुसंपादनासाठी लागणारा सर्व खर्च संस्था देण्यास तयार असल्याचे दि. १३/४/२००० चे शपथपत्र सादर केले आहे. त्याअनुषंगाने नगरपरिषदचे पत्र क्र. नपा/नर/०५/१३८/सन.०२ दि..१६.४.२००१ अन्वये भुसंपादनाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने भुमी संपादन अधिकारी (विषेश घटक) पत्र क्र. भुसं./विघ/भाईंदर/१९३/विध/१०.३.२००३ अन्वये तातडीचे कलम लावून भुसंपादन करण्याचा महानगरपालिकेचा सुधारीत ठराव व सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे कळविले आहे.

मंजूर विकास योजनेतील आरक्षीत जागा भूसंपादन होऊन विकसित झाल्यास विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होऊ शकतील तसेच भुसंपादनाचा खर्च संबंधीत संस्था करणार असल्याने महानगरपालिकेस आर्थिक खर्च अपेक्षित नाही. सबब भुसंपादनाचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसाठी मा.महासभेपुढे ठेवण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :-मिलन म्हात्रे

अनुमोदन :- दिनेश द. नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

१८३

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ५।४।०३

प्रकरण क्र.१४८ :- मा.आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. १५२

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा.आयुक्त सो. यांनी दि.२६.३.२००३ रोजी मंजूरी दिलेली आहे.

१) आरोग्य विभागाकरिता कचरा वाहतूकी करण्याकरिता भाडयाने वहाने घेणे.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरात घरोघरी जाऊन थेटपध्दतीने कचरा गोळा करुन वाहतूक करण्यात येत आहे.याकामी महानगरपालिकेची दहा डंपर, तीन टेम्पो अशी एकूण तेरा वाहने कार्यरत आहेत मात्र शहराचा विस्तार, लोकसंख्या, व दैनंदिन कचरा वाहतूक कामाची व्याप्ती पहाता सदरची वाहने अपूरी पडत आहेत. येत्या आर्थिक वर्षात महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागातील संपूर्ण साफसफाईची कामे उदा. गटारसाफई, रस्तेसफाई, कचरा वाहतूक इ. खाजगीकरणा मार्फत करण्याचा प्रस्ताव तयार केला असून सदर प्रस्तावास तसेच निविदांना अंतीम मंजूरी मिळेपर्यंत किमान दोन महिन्याकरिता सात वाहने भाडयाने घेणेकामी दि.२१.२.२००३ रोजी दै.लोकमत मध्ये जाहिर नोटीस प्रसिध्द करुन मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या त्यानुसार दि.४.३.२००३ रोजी महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१) मे.एन.एस.कंन्स्ट्रक्शन	-	रु.१,६००/- प्रती वाहन प्रतीदिन १२ तास
२) मे.स्टार कंन्स्ट्रक्शन	-	रु.१,५७५/- प्रती वाहन प्रतीदिन १२ तास
३) मे.गुडलक कन्स्ट्रक्शन	-	रु.१,४५५/- प्रती वाहन प्रतीदिन १२ तास

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे.गुडलक कन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदा मधील दर सर्वात कमी आहेत. अपु-या वाहनामुळे रोग निर्माण होणारा घनकचरा पूर्णपणे उचलला जात नाही. तसेच संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अंतर्गत तिस-या फेरीचे तपासणीसाठी अकोला महानगरपालिका महापौर यांची समिती मिरा भाईंदर महानगरपालिकेस भेट देणार आहेत. त्यापूर्वी सदरची वाहने भाडयाने घेणे गरजेचे आहे. याकामी मे.गुडलक कन्स्ट्रक्शन कं. यांची वरील कमी दराची निविदा स्विकारणेस व रोज सरासरी सात वाहने अंदाजे ४०.-५० दिवसासाठी भाडयाने घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजित रु.४,५८,०००/- खर्चास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ मधील तरतूदीनुसार सदरचे प्रकरण मा.स्थायी समितीचे अवलोकनार्थ सादर.

अ)-

१)	भाईंदर (पूर्व) जेसलपार्क चौपाटी खाडीपर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे	रु.९,८९,२००/-
२)	भाईंदर (पूर्व) जेसलपार्क संगीत अपार्टमेंट पासून खाडीपर्यंत स्लॅब टाकणे.	रु.९,९५,८५०/-
३)	भाईंदर (पूर्व) शिवसेना शाखा कार्यालय ते खाडीपर्यंत नाल्याच्या बाजूचा रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे.	रु.६,३२,१८९/-
४)	भाईंदर (पूर्व) जेसलपार्क येथे रिटेनिंग वॉल बाजूस मातीभराव करुन खडीकरण डांबरीकरण करणे.	रु.९,९३,१९६/-
५)	भाईंदर (पूर्व) जेसलपार्क खाडीवरील नाला दुरुस्ती करणे	रु.४,६०,३५०/-

918

ब)

१)	राई गावातील रस्ते दुरुस्ती करणे	रु.८,९०,०००/-
२)	मुर्धा गावातील रस्ते दुरुस्ती करणे	रु.८,५०,९४०/-
३)	मा.उपमहापौर,मा.विरोधी पक्षनेता यांच्या कॅबिनमध्ये सोफे तयार करणे , खुर्च्या पुरविणे चौथ्या मजल्यावर पार्टीशन करणे.	रु.२,५०,०००/-
४)	हरकेश उदयोग नगर क्रॉस रस्ता हरीया ड्रीम पार्क पर्यंत माती भराव खडीकरण , डांबरीकरण करणे.	रु.८,५०,०००/-
५)	मिरा रोड सर्वे नं.५४९ (३८) कांनुगो इस्टेट ते लोढा पार्क डी.पी रोड मातीभराव करणे.	रु.८,९१,८८३/-

क)

१) भाईंदर (प) विभागात भद्रकाली मंदिर समोर गटार व स्लॅब दुरुस्ती करणे. रु. ५०,०००/-

अ) मे.चंदना कंस्ट्रक्शन	१.०० टक्के कमी दराने
ब) मे.गौरव कंस्ट्रक्शन	१.०० टक्के जास्त दराने
क) मे.जयराम असोसिएट	०.९० टक्के जास्त दराने

वरील पैकी मे चंदना कंस्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकातील दरापेक्षा १.०० टक्के कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदर कामी रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षित आहे.

ड)

१) भाईंदर (प.) विभागात आर.सी.सी स्लॅब व जाळ्या दुरुस्ती करणे रु.५०,०००/-

अ)	मे.चंद्रा कन्स्ट्रक्शन	९.०० टक्के जास्त दराने
ब)	मे.गणेश डेव्हलपर्स	१२.५० टक्के जास्त दराने
क)	मे.आशापूरा कन्स्ट्रक्शन	११.०० टक्के जास्त दराने

वरील पैकी मे.चंद्रा कन्स्ट्रक्शन यांची निविदा वाटाघाटी नंतर अंदाज पत्रक दराने मंजूर करण्यांत आली आहे. सदर कामी रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे १ ते ११ कामाचे अवलोकन करण्यात आले.

सूचक :- दिनेश नलावडे

अनुमोदन :- अशोक पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

मिरा भाईदर महानगरपालिका

मा.स्थाई समिती सभा दिनांक ५/४/२००३.

ठराव क्र. ९५३ :-

विषय :- ९४८ **ठेकापद्धतीने मजूर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराच्या कामास मुदतवाढ देणे.**

महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन साफसफाई कामे उदा. गटार सफाई, रस्ता सफाई,, कचरा वाहतुक आदी कामे महानगरपालिकेचे २३० सफाई कामगार व ठेकेदाराचे ६७० मजुरांमार्फत करण्यात येत आहेत. मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/११/२००२. ठराव क्र. ५२ अन्वये " संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान" करिता ३०० मजूर सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारांकडून मंजुर असलेल्या दरात घेण्यात आले आहेत.

शहरातील साफसफाईची कामे बहुतांशी ठेकेदारांमार्फत करण्यात येत आहेत. सदर मजूर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराच्या कामाची मुदत दिनांक ३१ मार्च, २००३. रोजी पुर्ण होत आहे. तसेच आगामी आर्थिक वर्षात साफसफाई विषयक कामे पूर्णतः खाजगीकरणा मार्फत करण्याचे प्रस्तावित केले आहे. मार्च महिना संपण्यास काही दिवसांचाच कालावधी शिल्लक आहे. उपरोक्त कामाच्या प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी घेणे, जाहिर निविदा मागविणे, आलेल्या निविदांना मा.स्थाई समितीची मंजुरी घेणे. आदी कामास किमान एक ते दिड महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. दरम्यान काळात ठेकेदाराच्या कामाची मुदत पुर्ण झाल्यास ठेकेदारांमार्फत होणारा मजूर पुरवठा बंद होऊन शहरातील दैनंदिन साफसफाईच्या कामामध्ये अडथळा निर्माण होऊन आरोग्य विषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता होती.

वरील सर्व बाबींचा विचार करता :

१) मे. गुरुजी सॅनिटेशन

२) मे. साई गणेश कन्स्ट्रक्शन

३) राज कन्स्ट्रक्शन

४) मे. लक्ष्मी इंटरप्रायजेस

५) मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर

९८६

या मजूर पुरवठा ठेकेदारांचे ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२००३. रोजी संपलेली असुन वरील सर्व ठेकेदारांना दिनांक ०१/०४/२००३. पासुन पुढील ३ महिन्याचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ही समिती ठरवित आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाकडुन त्वरीत करण्यात यावी.

सर्वानुमते मंजूर.

सुचक :– श्री. लिओ कोलासो , अनुमोदन :– श्री. दिनेश नलावडे

सभापती,
स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

९८०

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ५/४/२००३

प्रकरण क्र. १५०:- निलंबीत कर्मचारी श्री. अजित भ. पाटील (प्र.अ.) व श्री. श्रीकांत मु. मोरे (लेखापाल) हयांना निलंबन कालातील देय भते देणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. :- ९५४

मा. आयुक्त सो. यांच्या संदर्भिय प्रकरणी टिपण्णी वाचन करण्यात आली.

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिकेत **श्री. अजित भगवान पाटील (प्र. अ.) व श्री. श्रीकांत मु. मोरे (लेखापाल)** हयांना तत्कालिन **मुख्याधिकारी यांनी नगरपालिका ठराव** क्र. १९९ दि. २७/१/९९ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली न्यायालयात खटला दाखल करण्यास मंजुरी दिली आहे. या कारणास्तव **दि. ३/५/९९ पासुन महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचांयती व ओद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७९ अतंर्गत** तरतुदीस अधिन राहून दस्तऐवज/पुरावे नष्ट करतील म्हणून निलंबीत केले हि वस्तुस्थिती असुन एकाच कारणासाठी दोनवेळा निलंबीत केले आहे. **सदर निलंबन हे महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायती व ओद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७९ खाली केले होते.** ज्या कलमाखाली निलंबन केले आहे. त्या कलमातील तरतुदीनुसार आवश्यक ती पुर्तता करण्यांत आल्याचे दिसुन येत नाही. तसेच निलंबन कालावधी मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाच्या आवश्यक त्या मंजूऱ्या देखील प्राप्त झाल्या नाहीत. अश्या प्रकारे ४५ महिने प्रदिर्ध निलंबन चालू ठेवणे नियमा विरुध्द आहे व ते कर्मचा-यावर अन्याय करणारे आहे.

तसेच तत्कालीन **नगरपालिका सभा दि. २७/१/१९९९ ठराव क्र. १९९** अन्वये दोन्ही निलंबीत कर्मचाऱ्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाखाली मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात मंजुरी दिल्याच्या कारणास्तव **दि. ३/५/९९ रोजी निलंबन केले आहे.** त्या बाबत दाखल झालेला दावा क्र. २६/२००१ संदर्भात मा. विशेष न्यायालय, ठाणे हयांनी दि. १५/२/२००३ रोजी निकाल देवून श्री. अजित पाटील व श्री. श्रीकांत मोरे हयांना **"दोषमुक्त"** केले आहे. त्यामुळे त्यांचे निलंबन रद्द करणे आवश्यक ठरते.

मा. विशेष न्यायालयात, ठाणे हयांनी श्री. अजित पाटील व श्री. श्रीकांत मोरे ह्यांना दि. १५/२/२००३ रोजीचे निकालाने दोषमुक्त केले आहे. व मा. उप-सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्रानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधिल नियम-३० अन्वये या दोन्ही निलंबीत कर्मचाऱ्यांना निलंबन कालावधीतील देय वेतन व भत्ते घेण्यास पात्र ठरत असल्याने दोन्ही कर्मचाऱ्यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यांत यावा व त्यांना निलंबन कालावधीतील देय असणारे (अनुज्ञेय) सर्व वेतन व भत्ते अदा करण्यांस आर्थिक मंजूरी देण्यांत येत आहे. [illegible] सदरच्या दोन्ही कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत प्रशासनाने हजर करुन घेण्या बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- शशिकांत शहा.   अनुमोदक :- महेंद्र सिं. चव्हाण.

5/4/03   5-4-03

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.